# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, रविवार १४ जून २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ ८+४





## कर्मचा-याच्या घरी सापडले 10 लाख

### शेणाच्या ढिगा-याखाली लपवली रोकड

**अयोध्या/वृत्तसंस्था :** श्री राम जन्मभूमी मंदिरातील देणग्यांच्या अपहाराच्या आरोपाने आता गंभीर वळण घेतले आहे. या प्रकरणाचं गांभीर्य पाहता ट्रस्टने मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याकडून विशेष तपास पथक नेमले होते. त्यानंतर स्पेशल ऑपरेशन ग्रुपने मंदिरातील कर्मचारी लवकुश मिश्रा याला ताब्यात घेउन चौकशी सुरू केली आहे. माहितीनुसार, तपासात मंदिरात आलेल्या देणगीची मोजणी करणारा कर्मचारी लवकुश मिश्रा याच्या घरातून तब्बल १० लाख रोकड जप्त करण्यात आली आहे. हा कर्मचारी मीनापूरच्या फगोली गावातील रहिवासी आहे. या कर्मचा-याच्या घरात काही रक्कम कपाटात ठेवली होती तर काही रोकड शेणाच्या ढिगा-याखाली लपवून ठेवली होती. जप्त केलेल्या रक्कमेबाबत तपास सुरू झाला आहे. अधिका-यांनी याबाबत अद्याप कुठलीही प्रतिक्रिया दिली नाही. या प्रकरणी आणखी एक कर्मचारी संशयात सापडला असून त्याचीही चौकशी केल्याचे समोर आले आहे. या दोन्ही कर्मचा-यांकडे मंदिरात दान आलेली देणगीची मोजणी आणि त्याच्याशी निगडित काम होते.

**१८ हजार पगारात दीड कोटींची जमीन खरेदी**-संशयित असलेल्या दोन्ही कर्मचा-यांना प्रत्येकी दर महिना १८ हजार ते २० हजार पगार दिला जातो. परंतु अलीकडच्या काही महिन्यात त्यांच्या संपत्तीत अचानक वाढ झाल्याने तपास यंत्रणा या उत्पन्नाचा स्त्रोत शोधत आहेत. एका कर्मचा-याने जवळपास दीड कोटींची जमीन खरेदी केली आहे तर दुस-याने ४० लाखांचा प्लॉट खरेदी केल्याचे पुढे आले. (पान २ वर)






# पहाटेपासून रांगा तरीही खताची शाश्वती नाहीच

## शेतक-यांच्या खत खरेदीला आता प्रशासनाकडून मर्यादा; सातबारा अनिवार्य नाही

**अकोला/प्रतिनिधी :**ऐन खरीप हंगामाच्या तोंडावर शेतक-यांना युरिया खतासाठी चांगलाच संघर्ष करावा लागत असल्याचे चित्र आहे. जिल्ह्यातील अकोट येथे पहाटे ३ वाजतापासूनच युरिया खरेदीसाठी शेतक-यांचा रांगा लागतात. या प्रकरणी आता प्रशासनाने शेतक-यांवर खत खरेदीसाठी मर्यादा लादल्या आहेत. जिल्ह्यात युरिया आणि डी.ए.पी. खतांच्या खरेदीसाठी प्रशासनाने नवीन सुधारित आदेश जारी केले. खतासाठी शेतक-यांची ओळख म्हणून सातबारा उतारा घेणे अनिवार्य केले नाही. मात्र, किमान एक व कमाल पाच पोते खत खरेदी करण्याची मर्यादा ठेवली आहे.



**युरिया खतासाठी प्रचंड संघर्ष-** खरीप हंगामाची लगबग सुरू झाली आहे. शेतक-यांनी शेतीची मशागत केली. आता बियाणे, खते याची जुळवाजुळव करण्यासाठी शेतक-यांची धडपड सुरू आहे. त्यातच या



खरीप हंगामामध्ये खताचा तुटवडा होणार असल्याचे कृषी विभागाकडून अगोदरच स्पष्ट केले. अकोला जिल्ह्यात त्याचे तीव्र पडसाद उमटले आहेत. अकोट येथे तर शेतक-यांना युरिया खतासाठी प्रचंड संघर्ष करावा लागतो.

**पहाटेपासून रांगा तरीही खताची शाश्वती नाहीच-**अकोट येथील कृषी बाजारपेठेत पहाटे ३ वाजतापासूनच शेतक-यांच्या रांगा लागत आहेत. प्रत्येक शेतक-याची युरिया मिळवण्यासाठी धडपड दिसून येते.

## युरिया खतासाठी प्रचंड संघर्ष

अकोट येथे युरियाचा मोठा तुटवठा निर्माण झाला आहे. मागणीच्या तुलनेत पुरवठा अत्यल्प होतो. त्यामुळे पहाटे ३ वाजता रांगेत लागून देखील युरिया मिळेल की नाही? याची शाश्वती शेतक-यांना नसते. गेल्या काही दिवसांपासून अकोटमध्ये युरिया खरेदीसाठी शेतक-यांचे अतोनात हाल होत आहेत. रात्र जागून काढावी लागते.

**प्रशासनाने मर्यादा लादल्या-** प्रतिएकरी मर्यादित खत वाटपाची मर्यादा आता जिल्हा प्रशासनाला आणली आहे. एका शेतक-याला त्याच्या गरजेनुसार पेरणीपुरते (पान २ वर)

## अन्नत्याग आंदोलनाचा दुसरा दिवस

## रोहित पवार मागण्यांवर ठाम

**पंढरपूर/प्रतिनिधी**-शेतक-यांच्या कर्जमाफीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी शुक्रवारपासून (१३ जून) अन्नत्याग आंदोलनाला सुरु वात केली. त्यांचे हे आंदोलन पंढरपुरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सुरू आहे. प्रशासकीय शिष्टमंडळ आणि रोहित पवार यांच्यामध्ये शुक्रवारी रात्री झालेल्या अनेक चर्चांनंतरही तोडगा निघाला नसल्याचेही समोर आले आहे. अशामध्ये शनिवारी (१३ जून) दुस-या दिवशीही आंदोलन सुरूच आहे. यावेळी सकाळी डॉक्टरांच्या एका पथकाने त्यांची तपासणीही केल्याचे समोर आले. अशामध्ये कृषिमंत्र्यांशी चर्चा झाल्यानंतरही ते आपल्या मागण्यांवर ठाम आहेत.शुक्रवारी रात्री अनेकदा प्रशासकीय शिष्टमंडळाने दोन ते तीनवेळा रोहित पवारांची भेट घेतली. पंढरपूरचे अतिरिक्त पोलिस



अधीक्षक स्वतः मध्यस्थी करत आहेत. त्यांनी आंदोलनस्थळावरूनच रोहित पवार यांची थेट राज्याचे कृषिमंत्री आणि सहकार मंत्र्यांशी फोनवर चर्चा घडवून आणली. राज्याच्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांनी २०१९ च्या कर्जमाफीची जाचक अट मागे घेण्याबाबत सरकार सकारात्मक असल्याचे माध्यमांसमोर जाहीर (पान २ वर)

# छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांचे आठ तळ उध्वस्त

## 23 आयईडींसह शस्त्रसाठा जप्त, मोठा हल्ला घडवून आणण्याच्या तयारीला धक्का

**गडचिरोली/प्रतिनिधी :** छत्तीसगडमधील नक्षलप्रभावित बिजापूर आणि गरियाबंद जिल्ह्यांत सुरक्षा दलांनी शुक्रवारी राबविलेल्या व्यापक शोधमोहीमेत नक्षलवाद्यांचे आठ गुप्त तळ उद्धवस्त केले. या कारवाईत २३ जिवंत आयईडी, शस्त्रास्त्रे आणि स्फोटकनिर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करण्यात आले. जंगल परिसरात सुरक्षा दलांवर मोठा हल्ला घडवून आणण्याच्या तयारीला यामुळे धक्का बसल्याचे मानले जात आहे.




बिजापूर जिल्ह्यातील अद्री, हर्रा आणि मदुमपारा परिसरातील घनदाट जंगलात नक्षलवाद्यांची उपस्थिती असल्याची माहिती सुरक्षा यंत्रणांना मिळाली होती. त्यानुसार केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या (सीआरपीएफ) १९९ व्या बटालियनने विशेष शोधमोहीम हाती घेतली. कमांडंट आनंद कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सेकंड-इन-कमांड कुमार नीरज यांच्या देखरेखीखाली संयुक्त पथकाने जंगल परिसराची सखोल तपासणी केली. बी/१९९ कंपनीचे नेतृत्व कंपनी कमांडर राजीव कुमार यांनी, तर एफ/१९९ कंपनीचे नेतृत्व निरीक्षक के. बी. पांडा यांनी केले. या मोहिमेदरम्यान जवानांनी नक्षलवाद्यांचे आठ गुप्त तळ शोधून काढत ते उद्धवस्त केले.

**शस्त्रास्त्रे, आयईडी आणि स्फोटक साहित्य जप्त-**कारवाईदरम्यान एक बॅरल ग्रेनेड लॉन्चर रायफल, एक ८ एमएम रायफल आणि एक १२-बोर रायफल जप्त करण्यात आली. तसेच २१ आयईडी, कॉर्डेक्स वायर, सेफ्टी फ्युज, इलेक्ट्रिक वायर, एअरगनच्या गोळ्या, इलेक्ट्रानिक उपकरणे आणि इतर साहित्य असा एकूण ५८ प्रकारच्या वस्तूंचा साठा हस्तगत करण्यात आला.

गरियाबंदमध्ये प्रेशर आयईडी निकामी- गरियाबंद जिल्ह्यातील दंडईपाणी जंगल परिसरातही सुरक्षा दलांनी नक्षलवाद्यांचा एक तळ उद्धवस्त केला. बॉम्ब शोधक व नाशक पथकाने घटनास्थळी सापडलेला चार किलो वजनाचा प्रेशर आयईडी आणि एक कुकर आयईडी सुरक्षितरीत्या निकामी केला. यावेळी नक्षलवादी साहित्यही जप्त करण्यात आले. या कारवाईमुळे छत्तीसगडमधील नक्षलविरोधी मोहिमेला बळ मिळाले असून सुरक्षा दलांनी नक्षलवाद्यांच्या हालचालींवर प्रभावी अंकुश ठेवण्यात आणखी एक यश मिळविले आहे.

## विनोदी कलाकार प्रणित मोरेच्या अडचणीत वाढ

**नागपूर :** ३७० रु पयांच्या बिर्याणीवरील वादग्रस्त वक्तव्यामुळे चर्चेत आलेल्या विनोदी कलाकार प्रणित मोरे यांच्या अडचणी आणखी वाढण्याची शक्यता आहे. गृह विभागाकडून प्रणित मोरे यांनी यापूर्वी समाजमाध्यमांवर प्रसिद्ध केलेल्या सर्व चित्रफितींची चौकशी केली जाणार असून सायबर पोलिसांकडून त्याची सखोल तपासणी सुरू असल्याची माहिती गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिली. नागपुरात प्रसिद्धीमाध्यमांसी ते बोलत होते. ३७० रु पयांच्या बिर्याणीवरील वादग्रस्त वक्तव्यानंतर आता केवळ त्या एका प्रकरणापुरती चौकशी मर्यादित राहणार नसल्याचे संकेत मिळाले आहेत. गृह विभागाकडून प्रणित मोरे यांच्या यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या सर्व चित्रफितींची तपासणी केली जाणार असल्याची माहिती गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिली आहे.प्रणित मोरे यांनी यापूर्वी समाजमाध्यमांवर प्रसारित केलेल्या विविध चित्रफिती आणि त्यातील आशयाची सायबर पोलिसांकडून सखोल चौकशी सुरू आहे. संबंधित आशयामध्ये कायद्याचे उल्लंघन, आक्षेपार्ह किंवा समाजात चुकीचा संदेश देणारा मजकूर आहे का, याची तपासणी केली जात आहे.



# हवाई दलाचे मालवाहू विमान क्रॅश, पायलटसह 5 ठार

**जोरहाट/वृत्तसंस्था :** आसामच्या जोरहाट येथील रौरिया एअरबेसवर शनिवारी सकाळी हवाई दलाचे एक विमान कोसळले. या अपघातात वैमानिकासह पाच जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये स्क्वाड्रन लीडर प्रशांत सिंग, फ्लाईट लेफ्टनंट शुभम कुमार, सार्जंट जितेंद्र शर्मा, अग्निवीरवायू खेमाराम कुमावत आणि अग्निवीरवायू दानिश आलम यांचा समावेश आहे. एक सह-वैमानिक जखमी झाला आहे. विमान एअरबेसवर उतरण्याचा प्रयत्न करत असताना ही दुर्घटना घडली. विमान कोसळल्यानंतर त्याला आग लागली आणि त्याचे दोन तुकडे झाले. अपघातग्रस्त 'एएन-३२' (AN-३२) हे एक मालवाहू विमान होते. त्याचा वापर सैन्य आणि मालसामान वाहून नेण्यासाठी केला जात होता. या अपघाताचे नेमके कारण अद्याप समजू शकले नाही; हवाई दलाने या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. भारतीय हवाई दलाने सांगितले की, हे विमान नियमित उड्डाणावर होते आणि प्राथमिक निष्कर्ष समोर येईपर्यंत लोकांनी कोणताही तर्क-वितर्क करू नये. या प्रकरणाच्या चौकशीसाठी 'कोर्ट ऑफ इन्क्वायरी'चे (चौकशी समितीचे) आदेश देण्यात आलेत. भारतीय वायुसेनेकडे अंदाजे १०० अँटोनोव्ह AN-३२ टॅक्टिकल ट्रान्सपोर्ट विमानांचा ताफा आहे. IAF ने सुरु वातीला सोव्हिएत-निर्मित अशी १२५ विमाने खरेदी केली होती. सध्या सेवेत सक्रिय असणा-या या विमानांचा आकडा १०० च्या आसपास आहे. AN-३२ ने १९८० पासून IAF च्या मीडियम-लिफ्ट वाहतूक क्षमतेचा कणा म्हणून काम केले आहे. उष्ण हवामान आणि हिमालयासारख्या उंच प्रदेशात ऑपरेशन दरम्यान त्याच्या मजबूतपणामुळे ते खूप महत्त्वाचे मानले जाते.



## वाशिम हादरले! एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू

**वाशिम/प्रतिनिधी :**जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. तिवळी येथे एकाच कुटुंबातील चौघांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. पत्नी आणि दोन चिमुकल्या मुलांना विहिरीत टाकल्याचा संशय आहे. त्यानंतर पतीनं आत्महत्या केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. संतोष तुकाराम बकाल (वय ३५) यांनी महावितरणच्या पावर ग्रीड टावरला गळफास घेउन जीवन संपवलं आहे. मृतांमध्ये पत्नी वर्षा बकाल (वय २८), मुलगी जान्हवी बकाल (वय ७) आणि मुलगा सोहम बकाल (वय ५) यांचा समावेश आहे. दोन्ही चिमुकल्या मुलांचे हात बांधलेल्या अवस्थेत आढळल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. कुटुंबातील वादातून ही घटना घडल्याची प्राथमिक माहिती आहे. मात्र, अधिकृत पुष्टी अद्याप मिळालेली नाही. एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाल्याने तिवळी गावासह संपूर्ण मालेगाव तालुक्यात शोककळा पसरली आहे. दरम्यान, वाशिम जिल्ह्यात घडलेल्या या घटनेनं खळबळ माजली आहे. या चौघांचा अंत नेमका कोणत्या कारणातून झाला आहे, याची माहिती अद्याप मिळालेली नाही. मात्र, कुटुंबातील वादातून ही घटना घडल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.

## भंडा-यात 'हिट अँड रन'ची घटना, दोघांचा मृत्यू

**भंडारा/प्रतिनिधी :**भंडा-यात 'हिट अँड रन'ची घटना घडली आहे. या भीषण अपघातात दोघांचा मृत्यू झाला आहे. राष्ट्रीय महामार्गावरू न पायी जाणा-या दोघांना भरधाव अज्ञात वाहनाने भीषण धडक दिली. या अपघातात दोघेही गंभीर जखमी होउन त्यांचा घटनास्थळीचं मृत्यू झाला. या भीषण अपघातानंतर अपघातास कारणीभूत असलेला अज्ञात वाहनचालक पळून गेला आहे. हा अपघात भंडारा - साकोली या राष्ट्रीय महामार्गावरील धारगाव इथं पेट्रोलपंप समोर घडला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कुंडलिक वालदे (६३) आणि भिवा बोंदले (७०) यांचा अपघातात मृत्यू झाला आहे. हे दोघेही भंडा-याच्या धारगाव येथील रहिवाशी आहेत. राष्ट्रीय महामार्गाच्या एका बाजूनं ते फिरायला निघाले असताना हा अपघात घडला. याप्रकरणी कारधा पोलिसांनी अज्ञात वाहन चालका विरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## तिहेरी अपघातात 3 जागीच ठार

**लातूर :** लातूर-नांदेड महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला आहे. आयशर ट्रकने रस्ता ओलांडणा-या मोटारसायकलला जोरदार धडक दिल्याने मोटारसायकलवरील पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाला, तर या अपघानंतर लगेच अपघात होउन आणखी एकाचा मृत्यू झाला असून दोघे जखमी आहेत. अपघातानंतर स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेत पोलिसांनाही पाचारण केले, त्यानंतर घटनेचा पंचनामा करण्यात आला आहे.जिल्ह्यातील नांदेड-लातूर महामार्गावर आलगरवाडी पाटीजवळील नांदेड-लातूर महामार्गावर सायंकाळच्या सुमारास भीषण अपघात घडला असून, या दुर्घटनेत तिघांचा मृत्यू झालाय, तर दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. आलगरवाडी पाटीजवळ नांदेड-लातूर राष्ट्रीय महामार्गावर एका भरधाव आयशर ट्रकने रस्ता ओलांडणा-या मोटारसायकलला जोरदार धडक दिल्याने मोटारसायकलवरील पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रकने समोरू न येणा-या वॅगनर कारला आयधर ट्रकने धडक दिली. या दुस-या धडकेत कारमधील एकाचा मृत्यू झाला असून, दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर चाकूरच्या ग्रामीण रु ग्णालयात सध्या उपचार सुरू आहेत.

## दुधात भेसळ करणा-यांची गय करणार नाही

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रतिबंधित गुटखा, पानमसाला याबरोबरच खाद्यपदार्थांमध्ये भेसळ करणा-यांविरोधात अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी धडक मोहीम हाती घेतली आहे. दुधात भेसळ करणा-यांची यापुढे गय केली जाणार नाही, असा सज्जड दम त्यांनी दिला आहे. त्यामुळे दुधात भेसळ करणा-यांचे धाबे दणाणले आहे.मुंबईसह राज्यात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात दुधात भेसळ केली जाते. दुधातील भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून वारंवार कारवाई करू नही दूध भेसळीला आळा घालण्यात अन्न व औषध प्रशासनाला फारसे यश येत नाही. अन्न व औषध प्रशासनाचा पदभार स्वीकारल्यानंतर तुकाराम मुंढे यांनी बनावट औषधे, गुटखा, पानमसाला आणि खाद्यपदार्थांमध्ये भेसळ करणा-यांविरोधात जोरदार मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत अवघ्या १५ दिवसांत कोट्यवधींचा माल जप्त करून जवळपास २५० हून अधिक व्यक्तींवर कारवाई करून त्यांना अटक केली आहे.

**डेअरी चालकांना इशारा-**बनावट औषधे, गुटखा, पानमसाला आणि खाद्यपदार्थांमध्ये भेसळ करणा-यांपाठोपाठ आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आपला मोर्चा दूध उत्पादक, वितरक आणि डेअरी चालकांकडे वळवला आहे. तुकाराम मुंढे यांनी शुक्रवारी मुंबईतील एफडीए मुख्यालयात महाराष्ट्रातील प्रमुख डेअरी चालकांची तातडीची बैठक घेतली. या बैठकीत दुधात पाणी किंवा इतर घातक पदार्थांची भेसळ अजिबात सहन केली जाणार नाही, असे मुंढे यांनी डेअरी चालकांना सुनावले.दुधात पाणी किंवा रासायनिक भेसळ करणा-यांनाच नव्हे, तर अस्वच्छ पद्धती आणि चुकीच्या हाताळणीमुळे ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणा-यांवरही कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. उत्पादकापासून ते अंतिम ग्राहकापर्यंत दुधाचा प्रवास संपूर्णपणे सुरक्षित, स्वच्छ आणि दर्जेदार असावा, अशा सक्त सूचना त्यांनी डेअरी चालकांना दिल्या. यामुळे दूध भेसळ करणा-यांचे धाबे दणाणले आहे.अन्नपदार्थाच्या दर्जाबाबत तक्रारीसाठी केंद्र सरकारच्या ॲपची राज्यामध्ये अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या नवीन ॲपवर नागरिकांना तक्रार नोंदविता येणार आहे. तसेच तक्रारीसाठी नागरिकांनी टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ यावर संपर्क साधावा, असे आवाहन तुकाराम मुंढे यांनी केले आहे.



## धीरज सेठ नवे लष्करप्रमुख

**नवी दिल्ली :** केंद्रीय संरक्षण मंत्रालयाने लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांनी मोठी जबाबदारी दिली असून आर्मी प्रमुख पदासाठी त्यांच्या नियुक्तीचे आदेश काढले आहेत. पीव्हीएसएम, यूवायएसएम, एव्हीएसएम आणि सध्या आर्मी स्टाफचे उपप्रमुख म्हणून कार्यरत असलेल्या धीरज सेठ यांना पुढील आर्मी स्टाफ प्रमुख म्हणून नियुक्ती देण्यात आली आहे. ३० जून २०२६ च्या दुपारपासून ही नियुक्ती प्रभावीपणे लागू केली जाईल. सध्याचे आर्मी स्टाफ प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी हे याच दिवशी सेवानिवृत्त होत आहेत, त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर लष्करप्रमुख पदावर धीरज सेठ कार्यभार सांभाळणार आहेत. लेफ्टनंट जनरल धीरज सेठ हे पुण्याच्या खडकवासला येथील नॅशनल डिफेन्स ॲकॅडमीचे माजी विद्यार्थी आहेत.

## अजितदादांप्रमाणेच एकनाथ शिंदेंचाही घातपात होणार?

**मुंबई/प्रतिनिधी :**राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांचं अन्नत्याग आंदोलन सुरू आहे. दरम्यान आतापर्यंत अनेक नेत्यांनी पंढरपूरमध्ये येउन रोहित पवार यांची भेट घेतली आहे, त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. दरम्यान त्यानंतर आता एक मोठी बातमी समोर आली आहे, ती म्हणजे पंढरपूरमध्ये रोहित पवार यांचं आंदोलन सुरू आहे, या आंदोलनाला शिवसेना शिंदे गटाचे पंचायत समितीचे सभापती दत्तात्रय मगर यांनी भेट दिली आहे, त्यांनी रोहित पवार यांची भेट घेउन या आंदोलनाला आपला पाठिंबा असल्याचं म्हटलं आहे. मात्र यावेळी बोलताना त्यांनी मोठं विधान केलं आहे. यामुळे राज्यभरात खळबळ उडाली आहे. पंढरपूरमध्ये सुरू असलेल्या रोहित पवार यांच्या आंदोलनाला शिवसेना शिंदे गटाचे पंचायत समितीचे सभापती दत्तात्रय मगर यांनी पाठिंबा जाहीर केला आहे. यावेळी बोलताना त्यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. अजितदादांप्रमाणेच एकनाथ शिंदे साहेबांचा घात होउ शकतो, असं खळबळजनक वक्तव्य मगर यांनी केलं आहे. मी सरकारमधला आहे, पण अजितदादांसोबत काय झाले ते सगळ्यांना माहिती आहे. मी शिवसेना शिंदे गटाचा पदाधिकारी आणि माळशिरस तालुका पंचायत समिती सभापती आहे.



# एल निनोमुळे पर्जन्यमानात घट; पाण्याची आवर्तने तात्काळ बंद करा

## जलसंपदा विभागाचे जिल्हाधिका-यांना निर्देश

**मुंबई/प्रतिनिधी :**भारतीय हवामान विभागाने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार यावर्षी एल निनो परिस्थितीचा प्रभाव राहण्याची शक्यता आहे. पर्जन्यमानात घट होण्याची शक्यताही वर्तविली आहे. यासर्व पार्श्वभूमीवर राज्यातील विविध धरणं, जलाशय आणि जलस्त्रोतांमध्ये उपलब्ध असलेला पाणीसाठा संरक्षित करु न, सुरु असलेली पाण्याची आवर्तन तात्काळ बंद करण्याचे निर्देश जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डौले यांनी सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिका-यांना दिले आहेत.

**पाणीसाठ्याचा तातडीने आढावा घ्यावा-**या संदर्भात शासनाने काढलेल्या परिपत्रकात सर्व जिल्हाधिकारी व संबधित जलसंपदा विभागाच्या आधिका-यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील धरणं व जलाशयांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचा तातडीने आढावा घ्यावा. अत्यावश्यक परिस्थिती वगळता पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या पाण्याचा वापर इतर कोणत्याही कारणांसाठी करु नये. दिनांक ३१ ऑगस्ट पर्यंत सर्व शहरी व ग्रामीण भागात अखंडीत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होईल यासाठी धरणांमध्ये आरक्षित करण्यात आलेला पाणीसाठा जपून वापरण्याबाबतही जिल्हास्तरावर कृती आराखडा तयार करण्याच्या सुचना प्रधान सचिवांनी दिल्या आहेत.



**अनाधिकृत व बेकायदेशिर पाणी उपसा तात्काळ थांबवण्याचे आदेश**

स्थानिक स्वराज्य संस्था, पाणी पुरवठा विभाग यांच्यात प्रभावी समन्वय ठेवून परिस्थितीचा नियमित आढावा घेण्याबाबत तसेच धरणं, कालवे, नद्या, तलाव व इतर जलस्त्रोतांमधून होणारा अनाधिकृत व बेकायदेशिर पाणी उपसा तात्काळ थांबविण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देशही शासनाने काढलेल्या परिपत्रात देण्यात आले आहेत. यासाठी महसूल, पोलिस व जलसंपदा विभागाच्या आधिका-यांच्या संयुक्त पथकांमार्फत अनधिकृत मोटारी, पाईपलाईन, पंप व इतर सामुग्रींची तपासणी करण्याकरीता गस्त आयोजित करावी व वेळप्रसंगी दिनांक १२ डिसेंबर २०१८ रोजी काढण्यात आलेल्या शासन निर्णयाप्रमाणे कारवाईच्या कडक सुचनाही शासनाने परिपत्राकत दिल्या आहेत.पाणीसाठा, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, सिंचन आवर्तने स्थगित करण्याबाबतची कार्यवाही व बेकायदेशिर पाणी उपसा रोखण्यासाठी करण्यात आलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल प्रत्येक आठवड्याला सादर करण्याच्या सुचना विभागीय आयुक्त, सर्व पाटबंधारे विकास महामंडळ, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी आधिकारी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आधिका-यांना देण्यात आल्या आहेत.

**एल निनो म्हणजे काय?**

एल निनो म्हणजे विषुववृत्तीय पॅसिफिक महासागरातील समुद्राच्या पाण्याचे तापमान नेहमीपेक्षा जास्त वाढणे. याउलट ला निनो म्हणजे याच भागातील समुद्राचे तापमान नेहमीपेक्षा कमी होणे. एल निनो आणि ला निनो या उष्णकटिबंधीय पॅसिफिक महासागरातील नैसर्गिक हवामान प्रक्रियेचा भाग असून, त्यांचा जगभरातील हवामानावर मोठा परिणाम होतो. एल निनोमुळे अनेक देशांमध्ये पाउस कमी होण्याची शक्यता असते, तर काही भागांत अतिवृष्टीही होउ शकते.



# काँग्रेसला प्रदेशाध्यक्षांच्या निर्णयाची प्रतीक्षा

## अमरावती विधान परिषद निवडणूक

**अमरावती/प्रतिनिधीः-**

विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील निवडणुकीला अवघे सहा दिवस शिल्लक असताना काँग्रेसला प्रदेशाध्यक्षांच्या निर्णयाची प्रतीक्षा आहे. एक वेगळाच प्रसंग काँग्रेससमोर या निवडणुकीतून उभा झाला आहे. सद्यस्थितीत काँग्रेसचा प्रचार ठप्प पडला आहे. काँग्रेसचे उमेदवार हर्षजित देशमुख हे नागपूर येथील रुग्णालयात आहेत. त्यांच्यात आणि काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैकी झडत असून कलगीतुरा रंगला आहे. दरम्यान, काँग्रेसच्या स्थानिक वरिष्ठ नेत्यांनी गुरूवारी एक बैठक घेऊन त्यांचे मत प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना कळविले आहे. आता प्रदेशाध्यक्ष या निवडणुकीच्या संदर्भात काय निर्णय घेतात, याची प्रतीक्षा त्यांना आहे.

खासदार बळवंत वानखडे यांच्या जनसंपर्क कार्यालयात काँग्रेसच्या नेत्यांची बैठक झाली. या बैठकीला खा. बळवंत वानखडे, माजी मंत्री यशोमती ठाकूर, माजी राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख,




काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, माजी महापौर विलास इंगोले आदी उपस्थित होते. हर्षजीत देशमुख हे रुग्णालयात दाखल झाल्याने काँग्रेसच्या नगरसेवकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. हर्षजीत देशमुख यांना रूग्णालयातून शनिवारी सुटी मिळणार असून ते प्रचारात सक्रिय होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. पण, त्यांच्यावर काँग्रेस नेत्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत.

काँग्रेसचे उमेदवार प्रत्यक्ष प्रचार करण्याच्या स्थितीत नसल्याने काँग्रेसने वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार नीलेश विश्वकर्मा यांना पाठिंबा द्यावा, या विषयावर देखील बैठकीत चर्चा झाल्याची माहिती आहे.

# कारमधून गुटका तस्करी करणारा ताब्यात, ३.५२ लाखांचा मुद्देमाल जप्त

अमरावती/प्रतिनिधीः-

कारमधून गुटखा तस्करी करणाऱ्या एका आरोपीला ब्राह्मणवाडा थडी पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून कार व गुटखा असा एकूण ३ लाख ५२ हजार २४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई शुक्रवार, १२ जून रोजी सकाळी ब्राह्मणवाडा थडी-वणी मार्गावर करण्यात आली.



एका कारमधून घाटलाडकी-ब्राह्मणवाडा थडी मार्गाने शासन प्रतिबंधित गुटख्याची तस्करी होत असल्याची माहिती ब्राह्मणवाडा थडी पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी ब्राह्मणवाडा थडी-वणी मार्गावर नाकाबंदी करून घाटलाडकीकडून आलेली संशयास्पद कार अडविली. कारची पाहणी केल्यावर त्यात १ लाख २ हजार २४० रुपयांचा गुटखा आढळून आला. पोलिसांनी सदर गुटखा व कार असा ३ लाख ५२ हजार २४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून कारचालक मोहम्मद जाबीर अब्दुल रशीद (वय ३६) व मालक मोहम्मद मुतल्लीफ सौदागर (वय ३५) दोघेही रा. ब्राह्मणवाडा थडी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. ही कारवाई ब्राह्मणवाडा थडीचे ठाणेदार प्रशांत जाधव यांच्या नेतृत्वात साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक नागोराव पवार, राजेंद्र पवार, शेषराव कोकरे, अमोल राऊत, राजू मरसकोल्हे, अजय नंद, हेमंत येरखेडे, सुशील गुल्हाणे, अनुप मानकर, प्रमेश राऊत, अंकुश दाभाडे, वैष्णवी खेतकर यांनी केली.

# अंधश्रद्धाविरोधी लढ्याला अधिक बळ देण्याचा निर्धार

## -महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची पाक्षिक सभा उत्साहात

**अमरावती/प्रतिनिधीः-**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, अमरावती जिल्हा व शहर शाखेची पाक्षिक सभा शनिवारी गुरुदेव सेवाश्रम, राधा नगर येथे उत्साहपूर्ण व विचारमंथनात्मक वातावरणात संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हाउपाध्यक्ष डॉ. सतीश तराळ होते. मार्गदर्शक म्हणून राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार, प्रमुख अतिथी म्हणून रामदास सदार (कोषाध्यक्ष, गुरुदेव सेवा मंडळ) तसेच ज्येष्ठ सदस्य लक्ष्मण तडस उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभी विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीतील निर्णय, अहवाल व आगामी दिशा यांचे सविस्तर वाचन करण्यात आले. त्यानंतर जिल्हा व शहर शाखेच्या विविध उपक्रमांचा आढावा घेऊन आगामी कार्यक्रमांबाबत सखोल चर्चा करण्यात आली.

बैठकीत जादूटोणा प्रतिबंधक कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशासनाशी समन्वय वाढविणे, अंधश्रद्धाविरोधी मोहिमा अधिक व्यापक स्वरूपात राबविणे, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करणे आणि जनजागृती उपक्रम गावागावात पोहोचविणे याबाबत ठोस भूमिका घेण्यात आली. तसेच नवीन शाखा बांधणी, संघटन विस्तार, बुवाबाजी विरोधी संघर्ष परिषद, लेखन-वाचन कार्यशाळा आणि विविध जनजागृती उपक्रमांचे नियोजन करण्यात आले.

यावेळी अमरावती जिल्हा शाखेला प्राप्त झालेल्या 'लक्ष्यवेधी शाखा पुरस्कार' निमित्त जिल्हा उपाध्यक्ष डॉ. सतीश तराळ यांचा सत्कार करण्यात आला. राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांच्या हस्ते हा पुरस्कार शाखेला प्रदान



करण्यात आला. तसेच 'लक्ष्यवेधी कार्यकर्ता पुरस्कार' प्राप्त झाल्याबद्दल जिल्हाकार्याध्यक्ष प्रफुल्ल मंदा श्रीधर यांचाही जिल्हा व शहर शाखेच्या वतीने गौरव करण्यात आला. सभेत उपस्थित सर्व कार्यकर्त्यांना प्रेरणादायी पुस्तके भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी वक्त्यांनी अंधश्रद्धा, बुवाबाजी व अवैज्ञानिक प्रथांविरोधातील लढा अधिक व्यापक करण्यासाठी कार्यकर्त्यांनी गावपातळीपर्यंत संघटन बळकट करण्याचे आवाहन केले. 'वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकवाद आणि मानवता' या मूल्यांवर आधारित समाजनिर्मितीसाठी संघटित प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन करण्यात आले.

सभेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी विविध उपक्रम विभागाचे जिल्हा कार्यवाह आशिष देशमुख यांनी विशेष संपर्क व समन्वय साधला. कार्यक्रमाचे प्रभावी संचालन सचिन खोब्रागडे यांनी केले, तर मंजू वासनिक यांनी आभार प्रदर्शन केले. शेवटी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे गीत सादर करून सभेची सांगता करण्यात आली.

या प्रसंगी अफसरभाई (जिल्हाकार्यवाह, बुवाबाजी संघर्ष विभाग), महेश देशमुख, प्रफुल्ल मंदा श्रीधर, विजय डवरे, सचिन खोब्रागडे, मंजू वासनिक, दिलीप लाडे, सौरभ देशमुख यांच्यासह जिल्हा व शहर शाखेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'अंधश्रद्धा हटवा – विवेक वाढवा' आणि 'वैज्ञानिक दृष्टिकोन – मानवतेचा पाया' या घोषणांनी सभेचा उत्साहपूर्ण समारोप झाला.

# १ व १० वरिल उर्वरित

## कर्मचा-याच्या घरी सापडले

मात्र लवकुशचे वडील बच्चूलाल यांनी मुलाचा बचाव करत माझा मुलगा निर्दोष आहे असं सांगितले. तपास यंत्रणेला घरात १० लाख मिळाले याची कबुली त्यांनी दिली परंतु घराच्या बांधकामासाठी वडिलोपार्जित जमीन गहाण ठेवली होती त्याचे हे पैसे असल्याचा दावा केला.

अफाट संपत्ती पाहून तपास यंत्रणा थक्क

दरम्यान, तपास यंत्रणेत ६ सदस्यांचा समावेश आहे. ज्यात २ गणवेशातील पोलीस आणि इतर ४ सिव्हिल ड्रेसमध्ये होते. तपासावेळी घरातील कपाटात रोकड आणि अन्य ठिकाणी लपवलेली रक्कम सापडली. मंदिरात नोकरी लागल्यापासून लवकुशच्या आर्थिक परिस्थितीत वेगाने बदल झाला अशी गावक-यांमध्ये चर्चा होती. श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या विनंतीवरून उत्तर प्रदेश सरकारने देणगी चोरीच्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक विशेष तपास पथक स्थापन केले. त्याचे नेतृत्व लखनौचे आयएएस आयुक्त विजय विश्वास पंत यांच्याकडे दिले. एसआयटीला सात दिवसांच्या आत आपला प्राथमिक अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच त्यांना १५ दिवसांच्या आत अंतिम तपास अहवालही सरकारला सादर करावा लागेल.

## पहाटेपासून रांगा तरीही खताची

किमान एक पोते आणि कमाल पाच पोते युरिया व डी.ए.पी. खताचे वाटप केले जाणार आहे. कोणत्याही व्यक्तीला ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा जास्त खताचा साठा दिला जाणार नाही, असे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले.

**खत विक्रीची नोंद अद्ययावत ठेवणे बंधनकारक-** सर्व घाउक व किरकोळ खत विक्रेत्यांनी प्रत्येक विक्रीची नोंद योग्य कागदपत्रांसह आपल्या नोंदवहीत अद्ययावत ठेवणे बंधनकारक आहे. खतांचा तुटवडा रोखण्यासाठी आणि गरजू शेतक-यांना वेळेवर खत मिळवून देण्यासाठी हे पाउल उचलण्यात आले आहे. या आदेशाचे उल्लंघन करून खतांचा काळाबाजार किंवा साठेबाजी केल्यास संबंधित कृषी सेवा केंद्रावर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा देखील जिल्हा प्रशासनाने दिला.

## अन्नत्याग आंदोलनाचा दुसरा

करावे, तरच आम्ही हे अन्नत्याग आंदोलन स्थगित करण्याचा विचार करू, अशी भूमिका रोहित पवारांनी घेतली होती. त्यानंतरही ते आपल्या आंदोलनावर ठाम राहिले आहेत.

सरकारने काढलेल्या कर्जमाफीच्या परिपत्रकामध्ये २०१९ चा लाभ घेतलेल्या शेतक-यांना केवळ ५० हजारांपर्यंत लाभ देण्याची अट आणि प्रोत्साहन अनुदान देताना २०२५-२०२६ आणि २०२६-२०२७ चे पीक कर्ज भरणे अनिवार्य केल्याची अट आहे. या दोनच अटींमुळे सुमारे ३७ लाखांहून अधिक शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहणार आहेत. त्यामुळे या दोन जाचक अटी आधी काढा, एवढीच आमची साधी सरळ मागणी आहे. तोपर्यंत अन्नत्याग आंदोलनातून माघार नाही, अशी भूमिका आमदार रोहित पवार यांनी दुस-यादिवशी मांडली आहे. माझे वडील, पत्नी आणि मुले भावूक झाली आहेत. माझी मुले बाबा लवकर घरी या, असा निरोप देत आहेत. पण अन्नदात्याच्या न्यायासाठीचा हा लढा आता थांबणार नाही. असे रोहित पवार म्हणाले. मनोज जरांगे यांच्यासह विविध शेतकरी संघटनांचे नेते आणि इतर पक्षांचे नेते आंदोलनस्थळी येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. शक्तिपीठ महामार्गासाठी हजारो कोटी रुपये खर्च करता, मग शेतक-यांच्या कर्जमाफीवर अटी का? असा सवाल करत त्यांनी सरकारवर निशाणा साधला. दरम्यान, दुस-या दिवशीही विविध भागांतून शेतकरी संघटना आणि नागरिकांचा पाठिंबा मिळत असून सरकारने शेतक-यांच्या भावना समजून घ्याव्यात, अशी मागणी आंदोलनकर्त्यांकडून करण्यात येत आहे.

## बिबट्याची कातडी बाळगणाऱ्या

व्यापार किंवा ताबा हा गंभीर व दंडनीय गुन्हा आहे. अशा प्रकारच्या कोणत्याही संशयास्पद हालचालींची माहिती नागरिकांनी तात्काळ वन विभागास द्यावी, असे आवाहन गुगामल वन्यजीव विभागामार्फत करण्यात आले आहे.

## श्रोती हॉस्पिटल खून प्रकरणातील

मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सतीश चावरे, स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांचे पथक तसेच पोलीस निरीक्षक अजित कदम, अवधूतवाडी पोलीस स्टेशन व डी.बी. पथक यांनी संयुक्तरीत्या पार पाडली. सदर प्रकरणाचा पुढील तपास अवधूतवाडी पोलीस स्टेशनमार्फत सुरू असून आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

## तीन सराईत वाहनचोर

तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे राहुल संतोष सोळंके (वय २४, कारंजा लाड, जि. वाशिम), लखम उत्तमराव चव्हाण (वय २६) आणि महादेव उत्तमराव चव्हाण (वय २८, अलणगाव, ता. भातकुली) यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान आरोपींनी अमरावतीसह इतर ठिकाणीही वाहन चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. तपासात सिटी कोतवाली, राजापेठ, गाडगेनगर, दर्यापूर तसेच चंद्रपूर शहर पोलीस ठाण्यांमध्ये नोंद असलेल्या एकूण ९ वाहन चोरीच्या गुन्ह्यांचा छडा लावण्यात आला. आरोपींकडून होंडा युनिकॉर्न, स्प्लेंडर, शाईन, ॲक्टिव्हा, टीव्हीएस व्हिक्टर आदी मिळून १० दुचाकी वाहने जप्त करण्यात आली. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली सिटी कोतवालीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रोशन शिरसाट व पोलीस निरीक्षक रामदास पालवे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या मोहिमेत डीबी पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक तुषार गावंडे, रंगराव जाधव यांच्यासह पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

## चेनुष्ठा परिसरात बिबट्याची

माहिती समोर आली आहे. सकाळी आणि सायंकाळी ८ ते ९ वाजताच्या दरम्यान किंवा शेतात जाणाऱ्या नागरिकांना, शेतमजुरांना तसेच गावाबाहेर जाणाऱ्या येणाऱ्या प्रवाशांना बिबट्या दिसल्याच्या घटना घडल्याने परिसरात दहशतीचे वातावरण पसरले आहे.

या प्रकरणी नागरिकांनी वनविभागाकडे लेखी व तोंडी तक्रारी केल्या आहेत. तक्रारीची गंभीर दखल घेत वनविभागाचे अधिकारी आणि कर्मचारी संबंधित परिसरात पाहणी करीत असून बिबट्याच्या हालचालींचा मागोवा घेण्यासाठी ट्रॅप कॅमेरे बसविण्यात आले आहेत. बिबट्याचा वावर निश्चित झाल्यानंतर पुढील आवश्यक उपाययोजना करण्यात येणार असल्याची माहिती वनविभागाकडून देण्यात आली आहे. दरम्यान, कोणतीही अप्रिय घटना घडण्यापूर्वी वनविभागाने परिसरात पिंजरे लावून बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. मानवी जीविताला धोका निर्माण होण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. चेनुष्ठा परिसरातील बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे सध्या गावात दहशत असून वनविभागाच्या पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मोदी सरकारच्या १२ वर्षांचा

देशातील सुमारे २५ कोटी नागरिक गरिबीतून बाहेर आल्याचे, ८१ कोटी नागरिकांना मोफत धान्य, तर जनधन योजनेअंतर्गत ५८ कोटींहून अधिक बँक खाती उघडण्यात आल्याची माहिती देण्यात आली. आयुष्मान भारत, प्रधानमंत्री आवास, उज्ज्वला, किसान सन्मान निधी, स्वनिधी, विश्वकर्मा योजना आणि 'लखपती दीदी' अभियानाच्या माध्यमातून सर्वसामान्यांपर्यंत थेट लाभ पोहोचल्याचा दावा भाजपने केला.

महिला सक्षमीकरण, ग्रामीण पाणीपुरवठा, शौचालय उभारणी, महामार्ग, रेल्वे, मेट्रो, विमानतळ, वंदे भारत आणि भारतनेटसारख्या पायाभूत सुविधांमुळे देशात विकासाची नवी क्रांती घडल्याचे सांगण्यात आले. आर्थिक क्षेत्रात भारत जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था बनल्याचा तसेच जीएसटी, यूपीआय, स्टार्टअप आणि उत्पादन क्षेत्रात विक्रमी प्रगती झाल्याचा दावा करण्यात आला.

पत्रकार परिषदेला प्रफुल चव्हाण (भाजप जिल्हाध्यक्ष), राजू पडगीलवार, रेखा कोठेकर, देवानंद पवार, शतनू शेटे, दत्ता राहणे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## कार वॉशिंग सेंटरमध्ये

नियमित काम सुरू असताना ३ ते ४ दुचाकींवरून आलेल्या युवकांच्या गटाने अचानक सेंटरमध्ये प्रवेश केला. सुरुवातीला वाद घालत त्यांनी तेथील कर्मचाऱ्याला लक्ष्य केले. त्यानंतर मारहाण करत चाकू सारखे शस्त्र दाखवून धमकावल्या चा आरोप आहे. या प्रकारामुळे तेथे उपस्थित ग्राहकांमध्ये एकच गोंधळ उडाला आणि अनेकांनी सुरक्षिततेसाठी परिसर सोडला. घटनेची माहिती मिळताच राजापेठ पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक माहिती आणि स्थानिक चौकशीच्या आधारे पोलिसांनी काही तासांतच सहा आरोपींना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्यांमध्ये लवकेश विरेंद्र चौधरी (वय २६), जय दिगंबर चौधरी (वय २१), धनराज सुधरी ढोंगळे (वय२५), रोहित धवस, प्रेम बगाडे आणि राम जाधव यांचा समावेश आहे. या प्रकरणी राजापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून साहिल गवाळे, आदित्य देशमुख, यश कडू यांच्यासह इतर संशयित आरोपींचा शोध सुरू आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली राजापेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली.

## सीसीटीव्हीच्या आधारे कारवाई

घटना घडल्यानंतर आरोपी पसार झाले होते. मात्र परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी त्यांची ओळख निश्चित केली. जलद तपासामुळे सहा आरोपींना अटक करण्यात यश आले असून उर्वरित आरोपींनाही लवकरच अटक केली जाईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

## शहरातील प्रमुख भागांत

अतिक्रमणे हटविण्यात आली असून संबंधितांना राजुरा बेडा येथे स्थलांतरित करण्यात आले. यावेळी अतिक्रमणधारकांनी सार्वजनिक जागांवर साठवून ठेवलेले मोठ्या प्रमाणातील भंगार साहित्यही जप्त करण्यात आले. सुमारे एक ट्रक भंगार साहित्य जप्त करून ते कंपोस्ट डेपो येथे जमा करण्यात आले आहे.

शहरातील रस्ते, चौक व पदपथ अतिक्रमणमुक्त ठेवून वाहतूक सुरळीत करणे तसेच नागरिकांना सुरक्षित व स्वच्छ वातावरण उपलब्ध करून देणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश असल्याचे प्रशासनाने सांगितले.

महानगरपालिका प्रशासनाने अतिक्रमणांविरोधात कठोर भूमिका घेतली असून सायंकाळीही अशाच प्रकारची विशेष कारवाई सुरू राहणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे अतिक्रमण करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून शहर अतिक्रमणमुक्त करण्यासाठी प्रशासनाचा निर्धार अधिक दृढ झाल्याचे दिसून येत आहे.

नागरिकांनी सार्वजनिक जागांवर अतिक्रमण करू नये व महानगरपालिकेच्या मोहिमेला सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## नेहरू चौकातील पानपट्टीवर

मंडलिक (वय ४९ वर्ष) याच्या ताब्यातून शासनाने प्रतिबंधित केलेला एकूण १९ हजार २७० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यामध्ये विविध कंपन्यांचा सुगंधित तंबाखू आणि आरोग्यास घातक ठरू शकणाऱ्या स्वीट सुपारीचा समावेश आहे. अन्न सुरक्षा अधिकारी घनश्याम दंडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात आरोपी जितेंद्र मंडलिक याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त केलेला माल पोलिसांनी आपल्या ताब्यात घेतला असून, या प्रकरणाचा पुढील तपास अंजनगाव पोलीस करीत आहेत. अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कडक धोरणांमुळे सध्या भेसळयुक्त खाद्यपदार्थ आणि गुटखा विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. शहरात ठिकठिकाणी होणाऱ्या या कारवाईमुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या अशा विक्रेत्यांविरुद्ध यापुढेही कठोर कारवाई सुरूच राहील, असे संकेत प्रशासनाकडून मिळत आहेत.

## शिराळ्यात चोरट्यांचा धुमाकूळ

सोन्या-चांदीचे दागिने चोरट्यांनी चोरून नेल्याचे उघड झाले. या घटनेची माहिती घेत असतानाच गावातीलच आसीम मुल्ला हाफीज अली मुल्ला (वय २९) यांच्या घरातही चोरी झाल्याचे समोर आले. चोरट्यांनी त्यांच्या घरातून १ लाख २६ हजार रुपयांची रोख रक्कम लंपास केल्याचे आढळून आले. सलग दोन घरांमध्ये झालेल्या चोरीच्या प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये खळबळ उडाली आहे. दोन्ही घटनांची माहिती मिळताच वलगाव पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. निकेश इंगोले यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून आरोपींचा शोध सुरू आहे.

शिराळा गावात एका रात्रीत दोन घरांमध्ये घरफोडी झाल्याने ग्रामीण भागातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. चोरट्यांनी बंदिस्त घरे हेरून घरफोडी केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात असून, पोलिसांनी परिसरातील संशयितांची माहिती संकलित करण्यास सुरुवात केली आहे.

## श्री हव्याप्र मंडळाच्या समर्थ

मीटर सेंटर फायर (.३२ बोअर) पिस्टोल शूटिंग प्रकारात मंडळाचा नेमबाज समर्थ सुनील वारे याने ३०० पैकी २६९ गुणांची उत्कृष्ट नोंद करत रौप्यपदक पटकाविले. राज्यस्तरीय स्पर्धेत मिळविलेल्या या यशामुळे त्याचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. याशिवाय मंडळाच्या अन्य खेळाडूंनीही दमदार कामगिरी करत पुढे होणाऱ्या पूर्व राष्ट्रीय शूटिंग स्पर्धेसाठी पात्रता मिळविली आहे. २५ मीटर स्पोर्ट पिस्टोल प्रकारात अभिषेक सिंघ, १० मीटर एअर रायफल प्रकारात अर्पिता दुबे व हर्षुल हाडले तसेच १० मीटर एअर पिस्टोल प्रकारात पायल कुरवाडे, बिशाखा देवी आणि सोनाली शर्मा यांची पूर्व राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

खेळाडूंच्या व शूटिंग विभाग प्रमुख प्रा. राहुल उगले यांच्या यशाबद्दल मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, कार्याध्यक्ष एड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव प्रा. डॉ. माधुरी चेंडके, सचिव प्रा. विकास कोळेश्वर, सचिव प्रा. रवींद्र खांडेकर यांचेसह पदाधिकारी, प्रशिक्षक व क्रीडाप्रेमींनी त्यांचे अभिनंदन केले असून आगामी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्येही हे खेळाडू उज्ज्वल कामगिरी करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

## स्मशानभूमी परिसरातून सराईत

युनिट-२चे पथक तत्काळ घटनास्थळी रवाना झाले. पथकाने परिसरात सापळा रचून संशयिताला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याची ओळख महेश कृष्णा खोब्रागडे (वय २२, रा. लुबिनी नगर, अमरावती) अशी पटली. अंगझडतीत त्याच्याकडून सुमारे एक हजार रुपये किमतीचा लोखंडी चाकू आढळून आला. शस्त्र बाळगण्याबाबत समाधानकारक उत्तर देता न आल्याने पोलिसांनी चाकू जप्त करून आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाई केली. या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात आर्म्स ॲक्टच्या कलम ४/२५ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (मुख्यालय व गुन्हे) रमेश धुमाळ आणि सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा) शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. गुन्हे शाखा युनिट-२चे पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई यशस्वी केली.

## ७० हजारांची लाच घेताना

न घेण्यासाठी प्रत्येकी १५ हजार रुपये अशी एकूण ७० हजार रुपयांची मागणी झाल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर एसीबीने नियोजनबद्ध सापळा रचला. शुक्रवारी आरोपी विराग आनंदराव देशमुख, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, यांनी तक्रारदाराकडून त्यांच्या खाजगी वाहनात लाचेची रक्कम स्वीकारताच पथकाने त्यांना रंगेहात पकडले. कारवाईनंतर आरोपीविरुद्ध गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. ही कारवाई पोलीस अधीक्षक बापू बांगर, अपर पोलीस अधीक्षक सचिंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपअधीक्षक सुनील किनगे यांच्या नेतृत्वात पार पडली. पोलीस निरीक्षक रविंद्र सहारे तसेच एसीबीच्या पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सापळा यशस्वी केला.

शासकीय कामासाठी कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी कायदेशीर शुल्काव्यतिरिक्त पैशांची मागणी करत असल्यास त्याला बळी न पडता त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन एसीबीने केले आहे. अमरावती परिक्षेत्रातील अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ आणि बुलढाणा जिल्ह्यांतील नागरिकांच्या तक्रारींवर गोपनीयतेने आणि तत्काळ कारवाई केली जाईल, असेही विभागाने स्पष्ट केले आहे.

## शिवमंदिरातील पंचमुखी नागमूर्ती

दर्शनासाठी आलेल्या भाविकांना ती जागेवर दिसून न आल्याने चोरीचा प्रकार समोर आला. याबाबत मंदिराचे सचिव अरविंद केशवराव डबरे (वय ५०) यांनी खोलापुरी गेट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रार मिळताच पोलिसांनी परिसरातील हालचालींची माहिती संकलित करून संशयितांचा शोध सुरू केला. तपासादरम्यान दीपक शंकरराव मारवाडी (वय ३४, मूळ रा. हातगाव, जि. अकोला, सध्या रा. पुष्पक कॉलनी, अमरावती) याच्यावर संशय बळावला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने चोरीची कबुली दिली. त्यानंतर आरोपीच्या ताब्यातून चोरीस गेलेली पंचमुखी नागमूर्ती जप्त करण्यात आली. धार्मिक स्थळातील चोरीच्या या घटनेमुळे परिसरात नाराजी व्यक्त होत असताना पोलिसांनी जलद तपास करत गुन्ह्याचा उलगडा केल्याने नागरिकांनी पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक केले. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक सीमा दाताळकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

**भाविकांच्या चिंतेला पूर्णविराम-** मंदिरातील धार्मिक महत्त्व असलेली नागमूर्ती चोरीला गेल्याचे समोर आल्यानंतर भाविकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली होती. मात्र पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवत आरोपीला अटक केली आणि मूर्ती सुरक्षितपण हस्तगत केली. त्यामुळे परिसरातील भाविक आणि नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे.

## हरवलेले १३३ मोबाईल मालकांना

मिळाल्याने अनेक नागरिकांनी पोलिसांचे आभार व्यक्त केले. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या मोहिमेत सायबर शाखेसह जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांनी समन्वयाने काम केले. तांत्रिक कौशल्य, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यामुळे ही मोहीम यशस्वी ठरल्याचे पोलिसांनी सांगितले. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम व अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात पार पडली.

## हरवलेला मोबाईल परत मिळू शकतो!

मोबाईल हरवल्यानंतर अनेक नागरिक तक्रार करण्याचे टाळतात. मात्र वेळेत पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविल्यास किंवा पोर्टलवर माहिती भरल्यास मोबाईल ब्लॉक करणे व त्याचा मागोवा घेणे शक्य होते. त्यामुळे मोबाईल हरवल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन अमरावती ग्रामीण पोलिसांनी केले आहे.

# जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ रविवार, १४ जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# प्रसिद्ध हॉटेल्स, मिठाई दुकाने आणि डेअरींमध्ये भेसळीचा शिरकाव ?

## जनतेच्या आरोग्याशी खेळ करणा–यांवर कठोर कारवाईची जोरदार मागणी

■ प्रशांत ठाकरे ■

***कारंजा :** शहरासह परिसरातील प्रसिद्ध हॉटेल्स, मिठाई दुकाने, डेअरी आणि अन्य खाद्यपदार्थ विक्री केंद्रांमध्ये विक्री होणाऱ्या अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत नागरिकांमध्ये गंभीर चिंता व्यक्त होत आहे. वाढत्या भेसळीच्या घटनांमुळे सर्वसामान्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेता, अन्न व औषध प्रशासनाने विशेष मोहीम राबवून सर्व आस्थापनांची निष्पक्ष तपासणी करावी, अशी मागणी आता अधिक तीव्र झाली आहे.*



दररोज हजारो नागरिक विविध हॉटेल्स, मिठाई दुकाने आणि डेअरीमधून अन्नपदार्थ खरेदी करतात. सण-उत्सव, लग्नसमारंभ तसेच इतर सामाजिक कार्यक्रमांमध्ये या पदार्थांची मोठ्या प्रमाणावर मागणी असते. मात्र काही ठिकाणी नफ्याच्या हव्यासापोटी निकृष्ट दर्जाचा कच्चा माल, कृत्रिम रंग, रासायनिक मिश्रणे, बनावट तूप, कृत्रिम दूध किंवा इतर भेसळयुक्त घटकांचा वापर होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे.

विशेषतः मावा, पेढे, बर्फी, गुलाबजाम, रसगुल्ले, तूप, पनीर, दूध, दही, तेल, मसाले तसेच विविध दुग्धजन्य पदार्थांमध्ये भेसळ होण्याची शक्यता अधिक असल्याचे अन्नतज्ज्ञांचे मत आहे. अशा पदार्थांचे दीर्घकाळ सेवन केल्यास अन्नविषबाधा, पचनाचे विकार, यकृत व मूत्रपिंडाचे आजार, त्वचारोग तसेच इतर गंभीर आरोग्य समस्या निर्माण होऊ शकतात. नागरिकांचे म्हणणे आहे की, अनेकदा केवळ छोट्या विक्रेत्यांवर कारवाई केली जाते, मात्र मोठ्या आणि प्रसिद्ध आस्थापनांकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे कोणताही भेदभाव न करता शहरातील सर्व हॉटेल्स, मिठाई दुकाने, डेअरी आणि खाद्यपदार्थ उत्पादकांच्या ठिकाणी अचानक छापे टाकून नमुने गोळा करावेत आणि ते मान्यताप्राप्त प्रयोगशाळांमध्ये तपासणीसाठी पाठवावेत. दोषी आढळणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाईसह परवाने रद्द करण्याची प्रक्रिया राबवावी, अशी मागणी जोर धरत आहे.

अन्न सुरक्षा व मानके कायद्यांतर्गत संबंधित विभागाने नियमित तपासणीबरोबरच अचानक तपासणी मोहिमा राबविण्याची आवश्यकता असल्याचे मत सामाजिक कार्यकर्ते आणि ग्राहक संघटनांनी व्यक्त केले आहे. नागरिकांच्या मते, तपासणी प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक असावी आणि तपासणीचे अहवाल सार्वजनिक करण्यात यावेत, जेणेकरून ग्राहकांना सुरक्षित अन्नपदार्थांची निवड करता येईल. शहरात अनेक प्रसिद्ध मिठाई दुकाने आणि मोठी हॉटेल्स असल्याने दररोज मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते. त्यामुळे या ठिकाणी स्वच्छता, अन्न साठवणूक, उत्पादन प्रक्रिया आणि वापरल्या जाणाऱ्या कच्च्या मालाची गुणवत्ता यांची नियमित पडताळणी होणे अत्यंत गरजेचे आहे. संबंधित यंत्रणांनी वेळोवेळी जनजागृती मोहीम राबवून ग्राहकांमध्येही अन्नभेसळीविषयी जागरूकता निर्माण करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

राज्य शासनाने या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन विशेष पथके नियुक्त करावीत आणि कारंज्यासह संपूर्ण राज्यात व्यापक तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी विविध सामाजिक संघटना, ग्राहक आणि जागरूक नागरिकांकडून करण्यात येत आहे. 'जनतेच्या ताटात शुद्ध, सुरक्षित आणि दर्जेदार अन्न पोहोचले पाहिजे; भेसळखोरांना कोणतीही सवलत न देता कठोर शिक्षा झाली पाहिजे,' अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली असून, संबंधित प्रशासनाने तातडीने प्रभावी पावले उचलण्याची आवश्यकता अधोरेखित केली आहे.

## पीएम-कुसुम सौर कृषी पंप लाभार्थ्यांसाठी महाऊर्जाच्या कार्यशाळांचे आयोजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जागतिक पर्यावरण दिन अभियानांतर्गत ५ जुलै २०२६ पर्यंत महाउर्जामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अभियानादरम्यान पीएम-कुसुम योजना घटक-ब अंतर्गत प्रलंबित सौर कृषी पंप आस्थापनेला गती देण्यासाठी तसेच आस्थापित सौर कृषी पंपांबाबतच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी महाऊर्जामार्फत विशेष कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे.

वाशिम जिल्ह्यात तालुका व ग्रामपंचायत स्तरावर या कार्यशाळा आयोजित करण्यात येणार असून दि. १६ जून २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता वाशिम तालुक्यातील तामसी येथील ग्रामपंचायत कार्यालयात, दुपारी १२ वाजता मालेगाव तालुक्यातील पांगरी नवघरे येथील ग्रामपंचायत कार्यालयात तसेच दि. १७ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता रिसोड तालुक्यातील केनवड येथील ग्रामपंचायत कार्यालयात कार्यशाळा होणार आहेत. पीएम-कुसुम योजना घटक-ब अंतर्गत सौर कृषी पंप प्राप्त लाभार्थ्यांच्या पंप दुरुस्तीविषयक तक्रारी, तांत्रिक अडचणी तसेच प्रलंबित सौर कृषी पंप आस्थापनेबाबतच्या समस्यांची नोंदणी या कार्यशाळांमध्ये करण्यात येणार आहे. संबंधित शेतकऱ्यांनी कार्यशाळांना उपस्थित राहून आपल्या तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

> 'वाशिम जिल्ह्यातील पीएम-कुसुम योजनेतील सर्व सौर कृषी पंप लाभार्थ्यांनी या शिबिरांना व कार्यशाळांना उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन उपलब्ध सुविधांचा लाभ घ्यावा'.
>
> **विजय काळे,** जिल्हा व्यवस्थापक, महाऊर्जा, यवतमाळ.

## अनसिंग शहर व परिसरात जिओ नेटवर्क कोलमडले
### यश चव्हाण यांचा कायदेशीर कारवाईचा इशारा



■ प्रतिनिधी | वाशिम ■

अनसिंग शहर व लगतच्या परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून (रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेड) या दूरसंचार कंपनीचे मोबाईल जाळे अत्यंत कमकुवत, विस्कळीत व अनियमित स्वरूपाचे झाले असून त्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. जाळे वारंवार बंद पडणे, दूरध्वनी संपर्क होत नसणे, सुरू असलेले कॉल मध्येच खंडित होणे तसेच इंटरनेट सेवा पूर्णपणे बंद राहणे किंवा अत्यंत मंद गतीने सुरू राहणे, अशा गंभीर अडचणी सातत्याने निर्माण होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.अनसिंग शहर हे व्यापारी, शैक्षणिक, सामाजिक व प्रशासकीय दृष्ट्या महत्त्वाचे शहर असून येथे जिओ कंपनीचे हजारो ग्राहक आहेत. मात्र गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या या नेटवर्क समस्येमुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाले आहे. विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिक्षण, परीक्षा व अभ्यासावर प्रतिकूल परिणाम होत असून व्यापाऱ्यांचे डिजिटल व्यवहार, युपीआय पेमेंट तसेच बँकिंग सेवा मोठ्या प्रमाणावर ठप्प झाल्या आहेत. शेतकऱ्यांना शासकीय योजना, हवामानाचा अंदाज व बाजारभावाची माहिती मिळण्यात अडचणी येत आहेत. तसेच आरोग्य सेवा, रुग्णवाहिका व आपत्कालीन संपर्क साधताना अडथळे निर्माण होत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे.या संदर्भात अनसिंग येथील सामाजिक कार्यकर्ते यश सतीश चव्हाण यांनी दिनांक १२ जून रोजी वाशिम जिल्ह्यातील जिओ कंपनीच्या विभागीय व्यवस्थापकांना लेखी निवेदन सादर करून सदर नेटवर्क समस्येकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ही समस्या तात्पुरत्या स्वरूपाची नसून गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने सुरू आहे. याबाबत नागरिकांनी व ग्राहकांनी वारंवार जिओच्या ग्राहक सेवा केंद्राशी संपर्क साधून तक्रारी नोंदवूनही अद्याप कोणतीही ठोस व कायमस्वरूपी सुधारणा करण्यात आलेली नाही.निवेदनात जिओ प्रशासनाकडे अनसिंग शहर व परिसरातील मोबाईल जाळ्याच्या समस्या तातडीने सोडविण्यासाठी आवश्यक तांत्रिक उपाययोजना करण्याची ठाम मागणी करण्यात आली आहे. विद्यमान नेटवर्क टॉवरची क्षमता वाढविणे, आवश्यक असल्यास नवीन टॉवर उभारणे तसेच नागरिकांना सुरळीत, स्थिर व दर्जेदार दूरसंचार सेवा उपलब्ध करून देण्याची स्पष्ट मागणी करण्यात आली आहे.यश चव्हाण यांनी इशारा दिला आहे .

## बोगस कामगार नोंदणीचा संशय ; पुनर्तपासणी करून अपात्रांवर कारवाईची मागणी

■ प्रतिनिधी | कारंजा ■

**राज्य शासनाच्या कामगार कल्याण मंडळामार्फत नोंदणीकृत बांधकाम कामगारांना विविध शासकीय योजना, आर्थिक सहाय्य, शैक्षणिक सुविधा, आरोग्यविषयक लाभ तसेच अन्य कल्याणकारी योजनांचा लाभ दिला जातो. मात्र या योजनांचा लाभ घेण्यासाठी काही अपात्र व्यक्तींनीही कामगार म्हणून नोंदणी केल्याची चर्चा सध्या कारंजा लाडसह वाशिम जिल्ह्यात जोर धरत असून, त्यामुळे पात्र कामगारांवर अन्याय होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.**



सध्या कामगार कल्याण मंडळामार्फत भेटवस्तू वाटपाच्या अनुषंगाने सुरू असलेल्या वादंगामुळे या प्रकरणाकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले आहे. अनेक खऱ्या कामगारांना लाभ मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, पडताळणी व इतर प्रक्रियांना सामोरे जावे लागत असताना, प्रत्यक्षात कामगार नसलेल्या व्यक्तींनी नोंदणी करून योजनांचा लाभ घेतल्याचा आरोप विविध स्तरांतून केला जात आहे.

विशेष म्हणजे, पात्र कामगारांच्या नोंदणीसोबतच अपात्र व्यक्तींनाही नियमबाह्य पद्धतीने नोंदणी करून देण्यासाठी काही दलाल किंवा रॅकेट कार्यरत असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याची चर्चा स्थानिक स्तरावर सुरू आहे. जर अशा प्रकारचे जाळे अस्तित्वात असेल, तर ते केवळ शासनाची फसवणूक नसून खऱ्या श्रमिकांच्या हक्कांवर गदा आणणारे गंभीर प्रकरण ठरू शकते.

यामुळे जिल्ह्यातील सर्व नोंदणीकृत कामगारांची व्यापक आणि निष्पक्ष पुनर्तपासणी करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे. प्रत्येक लाभार्थी प्रत्यक्षात बांधकाम किंवा संबंधित क्षेत्रात कार्यरत आहे का, त्याने सादर केलेली कागदपत्रे खरी आहेत का आणि नियमांनुसार तो पात्र आहे का, याची सखोल पडताळणी करण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे.

पुनर्तपासणीत अपात्र किंवा खोटी माहिती देऊन नोंदणी केल्याचे आढळल्यास अशा व्यक्तींची नोंदणी तत्काळ रद्द करून त्यांच्याकडून घेतलेल्या लाभांची वसुली करावी तसेच संबंधितांवर दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी कामगार व नागरिकांकडून होत आहे. त्याचबरोबर अशा बोगस नोंदणींना मदत करणाऱ्या संबंधित अधिकारी, कर्मचारी किंवा मध्यस्थांचीही चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.कामगार कल्याण मंडळाच्या योजना या समाजातील कष्टकरी व गरजू कामगारांच्या जीवनमानात सुधारणा घडविण्यासाठी राबविल्या जातात. त्यामुळे या योजनांचा लाभ केवळ पात्र लाभार्थ्यांनाच मिळावा, शासनाच्या निधीचा गैरवापर थांबावा आणि कामगार व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास कायम राहावा यासाठी संपूर्ण जिल्ह्यात विशेष पडताळणी मोहीम राबविण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

## नूतन स्वरदा भजनी मंडळाची बालाजी चरणी सेवा अर्पण



**वाशिम :** वाशिमचे आराध्य दैवत श्री बालासाहेब चरणी अकोला येथील नूतन स्वरदा भजनी मंडळाच्या सदस्यांनी पुरुषोत्तम मास निमित्त भक्ती गीतांची सेवा अर्पण केली.. संस्थांचे विश्वस्त वहिवाटदार एडवोकेट भवानीपंत काळू यांनी सर्व भक्त मंडळीचे स्वागत केले. नूतन स्वरदा भजनी मंडळाचे अध्यक्ष सो अनुजा गोंधळेकर, प्रणाली शास्त्री ,शिल्पा दलाल, सीमा सरदेशपांडे, विद्या हातावडणे, गार्गी कुलकर्णी, विभा कुलकर्णी अनिता नगरे, दीपा साळपेकर, रूपाली चोपडे, मंजूरी कुलकर्णी आदि भक्तानी विविध भक्ति गीत द्वारे श्री बालाजी चरणी आपली सेवा अर्पण केली.

## शासकीय दरापेक्षा अधिक पैसे आकारणे आले अंगलट
### प्रवीण गावंडे यांचे सेतू बंद करण्याचे महसूल प्रशासनाचे आदेश

**मानोरा :** शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा नागरिकांकडून अधिक शुल्क आकारणी करणाऱ्या प्रवीण शालिग्राम गावंडे यांच्या तहसील परिसरातील 'आपले सरकार सेतू सुविधा केंद्रा'चा परवाना उपविभागीय अधिकारी कारंजा रवी महाले यांनी तात्काळ रद्द केला आहे.

९ जून रोजी नायब तहसीलदार यांच्या अचानक तपासणीत करारनाम्याची प्रत उपलब्ध नसणे व अर्जदारांकडून अवाजवी वसुली निदर्शनास आली. या अहवालानुसार १० जून रोजी कारवाई करण्यात आली.

अधिकृत सेतू सुविधा केंद्रांवर शैक्षणिक वर्ष सुरू होण्याच्या कालावधीमध्ये शैक्षणिक दाखले मिळवण्यासाठी मोठी गर्दी असते याचा गैरफायदा मागील अनेक वर्षांपासून सेतू सुविधा केंद्र धारकांपासून उचलल्या जात असल्याचे बोलले जाते मात्र अधिक पैसे देऊन आपल्याला जर लवकर शैक्षणिक दाखले मिळत असतील तर ही बाब अर्जदार उघडकीस आणत नव्हते. संजय गांधी निराधार योजना असो, दिव्यांगांच्या योजना असो अथवा शेतकरी, कष्टकरी बेरोजगार सध्या सगळ्या योजनांचे लाभ मिळवण्यासाठी लाभार्थ्यांना सेतू सुविधा केंद्रांवर जावेच लागते ज्याचा मनमानी लाभ काही सेतू सुविधा धारकांकडून उचलल्या गेला बसण्याची शक्यता सुद्धा उपविभागीय अधिकारी यांच्याकडून करण्यात आलेल्या कडक कारवाईने स्पष्ट झाले आहे.

> विशेष म्हणजे प्रवीण गावंडे यांच्यावर आर्थिक अनियमिततेचा प्रकरण प्रशासनाकडून पुराव्यानिशी सिद्ध करण्यात आले आहे. मात्र काही वर्षांपूर्वी मंगरूळनाथ येथील नागरिकांचे बनावट आधार कार्ड याच केंद्रातून शेगी येथील मूळ निवासी व मानोरा येथे अर्जनवीस (वाईंडर) चे काम करणाऱ्या व्यक्ती सोबत संगणमत करून आर्थिक व्यवहारापोटी तयार केल्याप्रकरणी त्यांची तक्रार महसूल व पोलीस प्रशासनाकडे झाली होती. ते प्रकरणही त्यावेळी मोठ्या प्रमाणात गाजले होते.

# गोपाला गोपाला...! एसीबीच्या सापळ्यातून वारंवार सुटणारा 'कृष्णावतार' कोण ?

## अकोट ग्रामीणमधील चर्चांना नवे वळण ; कथित सापळे, गोवंश प्रकरण आणि 'तोडीबहाद्दर' साथीदाराचीही चर्चा

■ ॲड. समीर ठाकूर ■

***अकोला :** अकोट ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांना कथित संरक्षण, हप्तेखोरी आणि वादग्रस्त कार्यपद्धतीच्या चर्चांनी आधीच धुरळा उडविला असताना आता आणखी एक गंभीर बाब समोर येत आहे. श्रीकृष्णाच्या नावाशी साधर्म्य असलेल्या एका कर्मचाऱ्याविषयी स्थानिक पातळीवर अशी चर्चा रंगली आहे की, त्याच्याविरुद्ध यापूर्वी दोन ते तीन वेळा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) सापळे रचले; मात्र प्रत्येक वेळी कारवाईची कुणकुण लागताच त्याने मोठ्या शिताफीने काढता पाय घेतला असल्याची चर्चा रंगली आहे.*

### सापळ्यांपूर्वीच माहिती फुटते कुठून?

या संपूर्ण प्रकरणातील सर्वात गंभीर प्रश्न म्हणजे कारवाईपूर्वीच माहिती बाहेर कशी जाते? एसीबीसारखी विशेष यंत्रणा अत्यंत गोपनीयतेने कारवाया राबवत असताना संबंधित व्यक्तींना आधीच सावध होण्याची संधी कशी मिळते, हा प्रश्न उपस्थित केला जात आहे. स्थानिक स्तरावर सुरू असलेल्या चर्चांमध्ये काही जण याला 'मजबूत माहिती जाळे' असे संबोधत आहेत, तर काहींच्या मते हा केवळ योगायोग असू शकत नाही. मात्र या सर्व बाबींची अधिकृत पुष्टी झालेली नसून, निष्पक्ष चौकशी झाल्यासच वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकते.

### 'तोडीबहाद्दर' साथीदाराची 'रुग्णालयवारी' चर्चेत

या कथित गोवंश प्रकरणात महादेवाच्या नावे साधर्म्य असलेल्या आणखी एका व्यक्तीची चर्चा जोरात सुरू आहे. संबंधित कर्मचाऱ्याचा निकटवर्तीय आणि कथित व्यवहारांमध्ये मध्यस्थी म्हणून ओळखला जाणारा एक साथीदार कारवाईच्या चर्चेदरम्यान अचानक आजारी पडल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे कारवाईची शक्यता निर्माण होताच या व्यक्तीने उच्च रक्तदाबाचा त्रास असल्याचे कारण देत थेट रुग्णालयाचा रस्ता धरल्याची चर्चा परिसरात आहे. त्यामुळे 'कारवाईपासून दूर राहण्यासाठी हा योगायोग होता की नियोजन?' असा सवाल अनेकांकडून उपस्थित केला जात आहे. स्थानिक नागरिकांमध्ये तर याबाबत उपरोधिक चर्चाही सुरू असून, 'सापळा आला की तब्येत बिघडते आणि परिस्थिती निवळली की सर्व काही सुरळीत होते,' अशा प्रतिक्रिया व्यक्त होत असल्याचे सांगितले जात आहे.

### चर्चांचा केंद्रबिंदू बनलेला कर्मचारी

अवैध रेती वाहतूक, गौण खनिज व्यवहार, गोवंश वाहतूक, गुटखा, दारू, वेश्याव्यवसाय आणि कथित हप्तेखोरी या विविध विषयांशी संबंधित चर्चांमध्ये एकाच नावाचा वारंवार उल्लेख होत असल्याने पोलिस विभागातील काही वर्तुळांतही अस्वस्थता निर्माण झाल्याचे बोलले जाते. विशेष म्हणजे या सर्व चर्चा अधिकृत आरोपांच्या स्वरूपात अद्याप सिद्ध झालेल्या नसल्या, तरी एका कर्मचाऱ्याभोवती सातत्याने निर्माण होणारे वाद आणि त्यासंदर्भातील कुजबुज यामुळे विभागाच्या प्रतिमेवर परिणाम होत असल्याचे मत जाणकार व्यक्त करीत आहेत.

### वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भूमिकेकडे लक्ष

अकोट ग्रामीण परिसरात सुरू असलेल्या या चर्चांमुळे आता वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी वस्तुस्थितीची पडताळणी करावी, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे. कथित एसीबी सापळ्यांच्या चर्चांपासून गोवंश प्रकरणातील आर्थिक मागणीच्या आरोपांपर्यंत सर्व बाबींची निष्पक्ष चौकशी झाल्यास सत्य समोर येऊ शकते, असे मत व्यक्त केले जात आहे. सध्या उपलब्ध माहिती ही स्थानिक स्तरावर सुरू असलेल्या चर्चांवर आणि विविध दाव्यांवर आधारित असल्याने कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचणे उचित ठरणार नाही. मात्र एक गोष्ट स्पष्ट आहे की, अकोट ग्रामीणमध्ये सुरू असलेल्या या चर्चांनी पोलिस विभागासमोर अनेक अनुत्तरित प्रश्न उभे केले आहेत.

स्थानिक पातळीवर व्यक्त होत असलेल्या दाव्यांनुसार, संबंधित कर्मचाऱ्याविरुद्ध भूतकाळात दोन ते तीन वेळा एसीबीकडून सापळा रचण्यात आल्याची चर्चा आहे. मात्र प्रत्येक वेळी कारवाईची कुणकुण लागताच संबंधिताने स्वतःला त्या परिस्थितीपासून दूर ठेवत संभाव्य कारवाई टाळल्याचे बोलले जात आहे. या चर्चांमुळे संबंधित कर्मचाऱ्याच्या संपर्कजाळ्याबाबत आणि त्याला आगाऊ माहिती कशी मिळते, याबाबतही विविध तर्कवितर्क व्यक्त होत आहेत.

यातील सर्वात चर्चेचा विषय ठरलेले प्रकरण म्हणजे सुमारे दोन महिन्यांपूर्वी समोर आलेले कथित गोवंश व्यवहाराशी संबंधित प्रकरण. स्थानिक स्तरावर सुरू असलेल्या चर्चेनुसार, गोवंश विक्रीशी संबंधित एका व्यक्तीला आरोपी करण्याची भीती दाखवून आर्थिक मागणी करण्यात आल्याचा आरोप झाला होता. या प्रकरणाची माहिती संबंधित व्यक्तीने एसीबीपर्यंत पोहोचवल्यानंतर कारवाईची तयारी सुरू झाल्याची चर्चा आहे. मात्र नेहमीप्रमाणेच या कारवाईचीही कुणकुण संबंधितांपर्यंत पोहोचली आणि नियोजित सापळ्यापूर्वीच परिस्थिती बदलल्याचे बोलले जाते. त्यामुळे पुन्हा एकदा संभाव्य कारवाई निष्फळ ठरल्याची चर्चा आता अकोट तालुक्यात रंगू लागली आहे.

### 'गोपाला गोपाला... एसीबीच्या सापळ्यातून वाचलो रे गोपाला...!'

अकोट ग्रामीणमध्ये सध्या सर्वाधिक चर्चेत असलेला उपरोधिक सवाल म्हणजे, 'गोपाला गोपाला... एसीबीच्या सापळ्यातून वाचलो रे गोपाला!' कथितपणे दोन-तीन वेळा सापळ्याची चाहूल लागताच संबंधित कर्मचारी हात झटकून बाजूला झाल्याची चर्चा आहे. त्यामुळे नेमके सापळे अपयशी ठरले की कुणीतरी आधीच खबर पोहोचवत होते, याबाबत जनमानसात प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता या चर्चांची सत्यता पडताळण्यासाठी सक्षम यंत्रणेकडून चौकशी होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १९७ ■ रविवार, १४ जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


### बंद घाटातून रेती माफियांचा हैदोस

# समृद्धीवर रेती तस्करीचा पर्दाफाश-दोन टिप्परसह ४१ लाखांचा मुद्देमाल जप्त, तिघे ताब्यात

## जनमाध्यम'च्या बातमीचा दणका; महसूल-पोलिसांची धडक कारवाई

**विरूळ आकाजी । जनमाध्यम :** 'बंद घाटातून रेती माफियांचा धुमाकूळ' या मथळ्याखाली शनिवारी प्रकाशित झालेल्या 'जनमाध्यम'च्या वृत्ताची प्रशासनाने गंभीर दखल घेत अखेर रेती माफियांवर धडक कारवाई केली. समृद्धी महामार्गावरील विरुळ आकाजी टोल नाक्याजवळ पोलिसांनी सापळा रचत अवैध रेती वाहतुकीचा मोठा पर्दाफाश केला. या कारवाईत दोन टिप्परसह तब्बल ४१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून तिघांना ताब्यात घेण्यात आले आहे.

समृद्धी महामार्ग परिसरात पुलगाव पोलिसांचे पथक नियमित गस्त घालत असताना विरुळ आकाजी टोल नाक्याजवळ संशयितरीत्या धावणारे दोन टिप्पर पोलिसांच्या नजरेस पडले. पोलिसांनी तत्काळ दोन्ही वाहनांना अडवून चौकशी केली असता, कोणतीही वैध परवानगी अथवा रॉयल्टी न भरता रेतीची अवैध वाहतूक सुरू असल्याचे उघड झाले. यानंतर पोलिसांनी एमएच २७ बीएक्स ७५७६ व एमएच २७–६१५५ क्रमांकाचे रेतीने भरलेले टिप्पर ताब्यात घेतले.

या प्रकरणी चालक रिझवान खान अन्वर खान (३१, रा. यासमीन नगर, अमरावती), सय्यद अन्सार सय्यद मोबीन (३२, रा. धर्मकाटा, तुधियाना नगर-२, अमरावती) तसेच अलीम पटेल सलीम पटेल (२९, रा. कुर्दा, ता. तिवसा, जि. अमरावती) यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. कारवाईदरम्यान सुमारे



दहा ब्रास रेती आणि दोन टिप्पर असा एकूण ४१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दरम्यान, बंद घाटातून सुरू असलेल्या अवैध रेती उपशामुळे महसूल विभागाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. मात्र 'जनमाध्यम'ने हा प्रकार उघडकीस आणताच प्रशासन खडबडून जागे झाले आणि महसूल विभागासह पोलिसांनी संयुक्त कारवाईचा बडगा उगारला. त्यामुळे रेती माफियांचे धाबे दणाणले असून समृद्धी महामार्ग परिसरातील अवैध रेती तस्करीचे मोठे रॅकेट उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

ही कारवाई पोलिस निरीक्षक सदाशिव ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकातील विनोद रघाटाटे, संदीप बोरबन, अजय अनंतवार आणि सोमेश गंथाडे यांनी पार पाडली.

### वर्ध्यात थरार

# उड्डाण पुलावरील होर्डिंगचा भाग कोसळला; थोडक्यात टळली मोठी दुर्घटना

## वाऱ्याच्या तडाख्यात फलकाचा काही भाग रस्त्यावर; वाहतूक ठप्प, पोलिसांच्या सतर्कतेमुळे अनर्थ टळला



**वर्धा । जनमाध्यम :** शनिवारी सायंकाळी अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह पावसाने वर्धेकरांची धांदल उडवली. विनोबा भावे उड्डाण पुलावरील महाकाय होर्डिंग बोर्डाचा काही भाग जोरदार वाऱ्यामुळे तुटून थेट वाहत्या रस्त्यावर पडल्याने काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. सुदैवाने त्या क्षणी पुलावरून कोणतेही वाहन जात नसल्याने मोठी जीवितहानी टळली.

सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास आलेल्या वादळी पावसामुळे बजाज चौक रेल्वे पुल परिसरात अचानक गोंधळ उडाला. पुलावरील होर्डिंगच्या लोखंडी संरचनेचा काही भाग तुटून रस्त्यावर कोसळल्याने वाहनचालकांमध्ये घबराट पसरली. मोठा आवाज झाल्याने नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. काही काळ वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती.

मुंबईत काही वर्षांपूर्वी होर्डिंग दुर्घटनेत अनेकांचा बळी गेल्याची घटना अद्याप ताजी असतानाच वर्ध्यातही तसाच प्रकार घडण्याची भीती निर्माण झाली होती. मात्र पावसामुळे नागरिक रस्त्याच्या कडेला थांबले होते आणि त्याचमुळे संभाव्य मोठा अनर्थ टळल्याची चर्चा परिसरात सुरू होती. घटनेची माहिती मिळताच वाहतूक पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. एएसआय रियाज खान, एनपीसी आरिफ खान, तसेच होमगार्ड कर्मचारी शेंडे, मसराम आणि धोंगडे यांनी मुसळधार पाऊस व जोरदार वाऱ्याची पर्वा न करता तत्परता दाखवत रस्त्यावर पडलेला होर्डिंगचा भाग बाजूला केला. त्यांच्या सतर्कतेमुळे काही वेळातच वाहतूक सुरळीत करण्यात आली.

दरम्यान, शहरातील उड्डाण पूल व प्रमुख चौकांवरील होर्डिंगच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. अनेक ठिकाणी जीर्ण अवस्थेतील होर्डिंग नागरिकांच्या जीवाशी खेळ करत असल्याची संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे. प्रशासनाने तातडीने सर्व होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडिट करून धोकादायक फलक हटवावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# वादळी वाऱ्याचा तडाखा; घराचे छप्पर उडाले

## प्रेमदास जाधव यांचे दोन लाखांचे नुकसान, चांदणी गाव अंधारात

**आर्वी । जनमाध्यम :** तालुक्यात शुक्रवारी दुपारी आलेल्या जोरदार वादळी वाऱ्याने चांदणी गावात मोठे नुकसान झाले. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे प्रेमदास जाधव यांच्या घराचे छप्पर उडून संपूर्ण घर अक्षरशः जमीनदोस्त झाले. या दुर्घटनेत अंदाजे दोन ते अडीच लाख रुपयांचे नुकसान झाले असून जाधव कुटुंबीयांवर अक्षरशः उघड्यावर येण्याची वेळ आली आहे.



दि. १३ जून रोजी दुपारी चार वाजताच्या सुमारास अचानक वाऱ्याचा वेग प्रचंड वाढला. यावेळी प्रेमदास जाधव यांच्या घरावरील पत्र्याचे छप्पर उडून गेले तसेच घरातील संसारोपयोगी साहित्याचेही मोठे नुकसान झाले. घर कोसळल्याने राहण्यासाठी तसेच जेवण बनविण्यासाठीही काहीच शिल्लक राहिले नसल्याचे सांगण्यात आले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. देवाच्या कृपेने कुटुंबीयांचा जीव वाचल्याने मोठा अनर्थ टळला. वादळी वाऱ्याचा फटका गावातील वीज व्यवस्थेलाही बसला. अनेक ठिकाणी विजेचे खांब तुटल्याने चांदणी गावातील वीजपुरवठा पूर्णपणे खंडित झाला आहे. त्यामुळे नागरिकांना अंधारात रात्र काढावी लागत आहे. दरम्यान, प्रशासनाने पंचनामा करून तातडीने आर्थिक मदत द्यावी तसेच गावातील वीजपुरवठा त्वरित पूर्ववत करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# सेवाग्राम एक्स्प्रेससमोर झेप घेत वृद्धाने जीवनयात्रा संपली

**सिंदी (रेल्वे) जनमाध्यम :** स्थानिक रेल्वे स्थानकावर शुक्रवारी रात्री एका ६१ वर्षीय वृद्धाने धावत्या रेल्वेखाली येत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. शेषराव हांडे (वय ६१) रा. सिंदी, ता. सेलू असे मृत वृद्धाचे नाव असून या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

**सिंदी रेल्वे स्थानकावरील हृदयद्रावक घटना; परिसरात हळहळ**

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी रात्री सुमारे १० वाजताच्या सुमारास शेषराव हांडे हे सिंदी (रेल्वे) स्थानकावर आले होते. त्याचवेळी नागपूरकडून येणारी सेवाग्राम एक्स्प्रेस स्थानकातून भरधाव वेगाने जात होती. अचानक हांडे यांनी रेल्वे रुळावर जाऊन डोके ठेवले. धावत्या रेल्वेखाली आल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेचे भीषण स्वरूप पाहून स्थानक परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.घटनेची माहिती मिळताच आरपीएफ आणि सिंदी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठविला. या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून आत्महत्येमागील कारणांचा तपास पोलीस करीत आहेत. या घटनेमुळे सिंदी परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून रेल्वे स्थानकावरील सुरक्षेचा प्रश्नही पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# शेतकऱ्यांच्या मदतीला समाजशक्ती; सावित्रीच्या लेकींचा आज होणार सन्मान

## सोशल फोरमतर्फे आज बी-बियाणे वाटप व गौरव पुरस्कार सोहळा

**वर्धा जनमाध्यम :** आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना आधार देत सामाजिक बांधिलकीची जपणूक करणाऱ्या वर्धा सोशल फोरमतर्फे आज रविवारी 'मान्सून भेट-२०२६' अंतर्गत मोफत बी-बियाणे वाटप कार्यक्रम, शेतकरी मार्गदर्शन मेळावा तसेच 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले गौरव पुरस्कार सोहळा-२०२६' आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम आज सकाळी १० वाजता सत्यनारायण बजाज सार्वजनिक वाचनालय, वर्धा येथे संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन परतवाडा येथील सुप्रसिद्ध समाजसेवक व पद्मश्री पुरस्काराने सन्मानित शंकरबाबा पापडकर यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वर्ध्याचे पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद पंचायत विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ज्ञानदा फणसे तसेच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अरविंद उपरीकर उपस्थित राहून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मोफत बी-बियाण्यांचे वाटप करण्यात येणार असून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डॉ, चेतना सवाई, तबस्सुम आझमी, अश्विनी काळे, कु कांचन रघाटाटे या महिलांचा 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले गौरव पुरस्कार' देऊन गौरव करण्यात येणार आहे. वर्धा सोशल फोरमचे अध्यक्ष डॉ. अभ्युदय मेघे आणि सचिव अविनाश सातव यांनी जिल्ह्यातील नागरिक, शेतकरी व महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

# आभाळाचा कहर... विजेच्या तडाख्यात दोन बैल, दोन गायी जागीच ठार

**बोथलीतील दुर्घटनेने शेतकरी हवालदिल; लाखोंचे नुकसान, मदतीची मागणी**



**समुद्रपूर जनमाध्यम :** तालुक्यातील बोथली येथे शनिवारी दुपारी अचानक झालेल्या मेघगर्जनेसह वादळी पावसाने शेतकऱ्यांवर दुहेरी संकट कोसळले. गावाशेजारी चरत असलेल्या दोन बैल आणि दोन दुधाळ गायींवर वीज कोसळून त्यांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून संबंधित शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान झाले आहे.

प्राप्त माहितीनुसार, शनिवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास बोथली येथील शेतकरी किसाना डहाके यांच्या दोन दुधाळ गायी तसेच मारोती धोटे यांचे दोन बैल गावाशेजारील पडतावर चरत होते. त्याचवेळी अचानक मेघगर्जनेसह जोरदार वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. काही क्षणातच विजेचा प्रचंड कडकडाट झाला आणि चारही जनावरांवर वीज कोसळली. या भीषण तडाख्यात दोन बैल व दोन गायींचा जागीच मृत्यू झाला. या दुर्घटनेत किसाना डहाके यांच्या दोन दुधाळ गायी दगावल्याने सुमारे एक लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. तर ऐन शेतीच्या हंगामात मारोती धोटे यांच्या दीड लाख रुपये किमतीच्या दोन बैलांचा मृत्यू झाल्याने त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. घटनेची माहिती मिळताच तहसीलदार कपिल हाटकर यांनी मंडल अधिकारी व तलाठी यांना तातडीने घटनास्थळी जाऊन पंचनामा करण्याच्या सूचना दिल्या. दरम्यान, नुकसानग्रस्त शेतकरी किसाना डहाके व मारोती धोटे यांनी शासनाकडे आर्थिक मदतीची मागणी केली आहे.

# कन्नमवार ग्राममध्ये ATM फोडण्याचा थरार; पोलिसांच्या सतर्कतेने लाखोंची चोरी टळली

**कारंजा (घा) जनमाध्यम -** कारंजा-वर्धा मार्गालगत असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रच्या एटीएममध्ये चोरी करण्याचा प्रयत्न पोलिसांच्या तत्परतेमुळे आणि गावकऱ्यांच्या सतर्कतेमुळे फसला. पहाटे तीन ते चार वाजण्याच्या सुमारास काही अज्ञात चोरट्यांनी गॅस कटरच्या सहाय्याने एटीएम फोडण्याचा प्रयत्न सुरू केला होता. या घटनेची माहिती कारंजा पोलिसांना मिळताच गस्तीवरील पोलीस कर्मचारी निलेश मंडारी व अमोल मानमोडे यांना तातडीने घटनास्थळी रवाना करण्यात आले. त्याचवेळी कन्नमवार ग्रामचे पोलीस पाटील तसेच गावातील नागरिक किशोर कोहळे, टीकाराम डोंगरे, घनश्याम केकतपुरे, साहेब खा पठाण यांनीही घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांनी आरडाओरड केल्याने चोरट्यांनी अर्धवट फोडलेले एटीएम तसेच साहित्य



जागीच टाकून चारचाकी वाहनातून पळ काढला. त्यामुळे मोठी चोरी टळली. घटनेनंतर उपविभागीय पोलीस अधिकारी ढोले व कारंजा पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, एटीएममध्ये नुकतीच मोठी रक्कम जमा करण्यात आल्याची माहिती शाखा व्यवस्थापकांनी दिली. या प्रकारानंतर एटीएमसाठी सुरक्षा रक्षक नेमण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

### प्रामाणिकपणाचे दर्शन

# वर्धा बस स्थानकावरील सुरक्षा रक्षकाने हरवलेली बॅग केली परत

**वर्धा जनमाध्यम :** येथील बस स्थानकावर शनिवारी सकाळी नऊ वाजताच्या सुमारास प्रामाणिकपणाचे दर्शन घडले. बोरगाव येथील रहिवासी श्रीमती सरोज प्रदीप शिंदे या आजनसरा येथे जाण्यासाठी बसस्थानकावर आल्या असता त्यांची बॅग हरवली. ही बॅग बसस्थानक परिसरात पडलेली वाहकाच्या निदर्शनास आली. वाहकाने तत्परता दाखवत बॅग सुरक्षा रक्षकांकडे जमा केली.



सुरक्षा रक्षकांनी बॅग बसस्थानक अधिकारी वरघने यांच्याकडे सुपूर्द केली. बॅगची तपासणी केली असता त्यामध्ये दोन सोन्याचे मंगळसूत्र, मोबाईल, अंगठी तसेच १०३६ रुपये रोख रक्कम आढळून आली. त्यानंतर मोबाईलच्या माध्यमातून संबंधित महिलेशी संपर्क साधण्यात आला. श्रीमती शिंदे यांना बसस्थानकावर बोलावून त्यांची बॅग सुखरूप परत करण्यात आली. यावेळी बसस्थानक सुरक्षा रक्षक गणेश फरदे, शुभांगी चौधरी तसेच अधिकारी वर्ग उपस्थित होते. सुरक्षा रक्षकांच्या प्रामाणिकपणाबद्दल नागरिकांकडून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

# मोदी सरकारची १२ वर्षे म्हणजे विकासाचा धडाका; जनतेच्या विश्वासावर उभा नवा भारत

## पालकमंत्री डॉ.भोयर यांचा विरोधकांवर हल्लाबोल; भाजपा कार्यालयात पत्रकार परिषद

**वर्धा जनमाध्यम :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने पूर्ण केलेली १२ वर्षे ही केवळ सत्तेची नव्हे, तर जनतेच्या विश्वासावर उभारलेल्या विकासक्रांतीची सुवर्णगाथा असल्याचा जोरदार दावा पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केला. राष्ट्र प्रथम आणि विकसित भारत या ध्येयाने प्रेरित होऊन मोदी सरकारने देशाला विकास, सुरक्षा, डिजिटल क्रांती आणि आत्मनिर्भरतेच्या नव्या उंचीवर नेले आहे, असे ते म्हणाले. स्थानिक भाजपा कार्यालयात शनिवारी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.




डॉ. भोयर म्हणाले, २०१४ पूर्वी भ्रष्टाचार, अस्थिरता आणि निर्णयशून्यतेत अडकलेल्या देशाला मोदी सरकारने नवी दिशा दिली. ग्रामीण रस्ते, राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे, मेट्रो, विमानतळ, डिजिटल कनेक्टिव्हिटी आणि सिंचन क्षेत्रात अभूतपूर्व गुंतवणूक करण्यात आली. देशातील राष्ट्रीय महामार्गांचे जाळे ९१ हजार किमीवरून तब्बल १.४६ लाख किमीपर्यंत पोहोचले असून ग्रामीण भागात लाखो किलोमीटर रस्त्यांची उभारणी झाली आहे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बोलताना त्यांनी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, पीएम-किसान, पीक विमा योजना यांचा उल्लेख करत मोदी सरकारने शेतकऱ्यांच्या खात्यात थेट मदत पोहोचवली असल्याचे सांगितले. बळीराजाच्या सन्मानासाठी सरकार कटिबद्ध आहे, असेही त्यांनी ठणकावले. डिजिटल भारत अभियानामुळे भारत आज जगातील सर्वात मोठी डिजिटल पेमेंट अर्थव्यवस्था बनल्याचे त्यांनी सांगितले.


संरक्षण क्षेत्रात भारत आत्मनिर्भर होत असून स्वदेशी उत्पादनामुळे देश जागतिक स्तरावर मजबूत उभा राहत असल्याचा दावाही त्यांनी केला. भाजपातर्फे ५ जूनपासून प्रत्येक बूथवर २५ झाडे लावण्याचा संकल्प करण्यात आला असून २१ जूनला योगदिनानिमित्त विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. पत्रकार परिषदेला जिल्हाध्यक्ष संजय गाते, आ. राजेश बकाने, माजी खासदार रामदास तडस, माजी आमदार दादाराव केचे, माजी जिल्हाध्यक्ष सुनील गफाट यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# समृद्धी महामार्ग की मृत्यूमार्ग, विरूळजवळ पुन्हा भीषण अपघात

## भरधाव वेगाचा कहर - कार ट्रकवर आदळली; सहाजण जखमी

**विरूळ (आकाजी) जनमाध्यम :** समृद्धी महामार्गावरील भीषण अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नसतानाच शनिवारी पुन्हा एक गंभीर अपघात घडला. विरूळ परिसरातील निजामपूर गावाजवळ भरधाव कार आणि ट्रक यांच्यात झालेल्या जबर धडकेत सहा जण जखमी झाले असून एकाची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. या अपघातामुळे काही काळ समृद्धी महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईच्या दिशेने जाणारी एमएच ४९ बीआर ७०४७ क्रमांकाची कार भरधाव वेगात असताना चालकाचा वाहनावरील ताबा सुटला आणि समोरून जात असलेल्या ट्रकवर जोरदार धडकली. धडकेचा आवाज इतका भीषण होता की ट्रक चालकाचाही वाहनावरील ताबा सुटून ट्रक रस्त्यावर उलटला. अपघातानंतर घटनास्थळी एकच गोंधळ उडाला.



घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलिसांचे बचाव पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जखमींना बाहेर काढून तात्काळ सावंगी येथील रुग्णालयात हलविण्यात आले. जखमींमध्ये अफजल हुसेन (३८), सिराज हुसेन (३३), अवेज उर्फ पाशु प्यारे खान (२१), दानिश प्यारे खान (३०) आणि परवेज खान यांचा समावेश असून सर्वजण नागपूर येथील एकता कॉलनी परिसरातील रहिवासी असल्याचे सांगण्यात आले. ट्रक चालकही या अपघातात जखमी झाला आहे.

दरम्यान, पुलगाव पोलिस ठाण्यातील सिद्धार्थ सोमकुवर, गणेश इंगळे तसेच महाराष्ट्र सुरक्षा बलाचे अरविंद वाडेकर, संतोष मग्गीडवार आणि विजेंद्र कैलाकर यांनी घटनास्थळी धाव घेत मदत व बचावकार्य राबविले.

विशेष म्हणजे, विरूळ परिसरात गेल्या काही दिवसांपासून समृद्धी महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच आहे. विरूळ समृद्धी पुलाखाली तसेच मारडा परिसरात झालेल्या वेगवेगळ्या अपघातांत चार युवकांचा मृत्यू झाला होता. त्यामुळे समृद्धी महामार्ग आता मृत्यूचा सापळा ठरत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत आहे. या भागात वाहतूक पोलिसांची नियमित गस्त वाढवून कठोर सुरक्षा उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# नवीन अभ्यासक्रम शिकविण्यासाठी शिक्षक होणार सज्ज

## प्रशिक्षणाचे विविध टप्पे निश्चित; तज्ज्ञांचा समावेश करण्यावर भर

**अमरावती/का.प्र.**

राज्यात यंदा इयत्ता,दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीचा अभ्यासक्रम बदलण्यात आला असून नवी पाठ्यपुस्तके लागू केली आहेत. दरम्यान, शाळा सुरू झाल्यानंतर नवीन अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांच्या हातातही पडतील, परंतु तो अभ्यासक्रम शिकविणाऱ्या शिक्षकांचे प्रशिक्षण अद्यापही अपूर्णच आहे. हे प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) नियोजन केले असून सर्व प्रशिक्षणे १० जुलैपर्यंत पूर्ण करण्याचा परिषदेचा मानस आहे.

शिक्षकांना दिलेल्या जनगणनेच्या कामांमुळे हे प्रशिक्षण पुढे ढकलावे लागले असल्याचे ‘एससीईआरटी’ने स्पष्ट केले असून शिक्षक प्रशिक्षणाचे नवे वेळापत्रक जाहीर केले आहे. ‘एससीईआरटी’चे सहसंचालक डॉ. कमलादेवी आवटे यांनी प्रशिक्षण वेळापत्रक आणि सूचनांचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. ‘राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०’ नुसार राज्यातील राज्य मंडळाच्या शाळांमध्ये २०२५-२६ शैक्षणिक वर्षापासून नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी सुरू झाली आहे.यानुसार इयत्ता दुसरी, तिसरी आणि चौथीच्या शिक्षकांचे राज्यस्तरीय प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. तर सहावीच्या शिक्षकांचे प्रशिक्षण बाकी आहे. जनगणनेच्या कामामध्ये शिक्षकांचा सहभाग असल्याने प्रशिक्षणाचे वेळापत्रक पुढे ढकलावे लागले होते.

**विशेष शिक्षक, सधन व्यक्तींचाही समावेश**

इयत्ता सहावीच्या राज्यस्तरीय प्रशिक्षक प्रशिक्षणासाठी मराठी माध्यमातील २४४ आणि उर्दू माध्यमातील २४० प्रशिक्षक अपेक्षित आहेत. संबंधितांचा तपशील १५ जूनपर्यंत सादर करावा. प्रत्येक वर्गाच्या प्रशिक्षणात जिल्ह्यात कार्यरत विशेष शिक्षक,साधन व्यक्तींचाही समावेश करावा. त्यांना नवीन अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षण देण्याची दक्षता घ्यावी. जिल्ह्यांनी अनुभवी शिक्षक, व्याख्याते, पर्यवेक्षकीय अधिकारी आणि अभ्यासक्रम निर्मितीत सहभागी तज्ज्ञांचा समावेश करण्याबाबत सूचना केल्या आहेत.



**असे आहे वेळापत्रक**

इयत्ता सहावीचे शिक्षक-१७ आणि १८ जूनला पूर्वतयारी कार्यशाळा होणार. त्यानंतर राज्यस्तरीय प्रशिक्षण २२ ते २५ जून या कालावधीत होईल. जिल्हास्तरीय प्रशिक्षण २९ जून ते २ जुलै, तर तालुकास्तरीय प्रशिक्षण ४ ते १० जुलैदरम्यान होईल.

इयत्ता दुसरीचे शिक्षक-जिल्हास्तरीय प्रशिक्षण १८ ते ३० जून तर तालुकास्तरीय प्रशिक्षण २२ जून ते २ जुलै या कालावधीत होईल.

इयत्ता तिसरी आणि चौथीचे शिक्षक-१८ ते ३० जून या कालावधीत जिल्हास्तरीय प्रशिक्षण, तर २४ जून ते ४ जुलै या कालावधीत तालुकास्तरीय प्रशिक्षण होईल.

या प्रशिक्षणाची जबाबदारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेकडे (डाएट) सोपविण्यात आली आहे.

> नवीन अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण सुट्टीच्या कालावधीत आयोजित करण्याचे नियोजन होते. त्यासाठी प्रयत्नही करण्यात आले. मात्र, जनगणनेच्या कामामुळे प्रशिक्षण पुढे ढकलावे लागले. आता १० जुलैपर्यंत चार इयत्तांचे तालुकास्तरापर्यंतचे प्रशिक्षण पुर्ण करण्यात येईल.
>
> **डॉ. हेमंत वसेकर,**
> संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

## संक्षिप्त

### जागतिक योग दिनानिमित्त ठिकठिकाणी योगाभ्यासाचे प्रात्यक्षिक



**अमरावती-** जागतिक योग दिनाचे औचित्य साधून योगाचा प्रचार व प्रसार व्हावा, यासाठी दस्तुरनगर येथील सोहम योगाभ्यासी मंडळाच्या वतीने शहरातील विविध भागात योगाभ्यासाचे प्रात्यक्षिक देणे सुरू केले आहे.आरोग्य ज्ञान आणि जागतिक शांततेसाठी स्थानिक छत्री तलाव परिसराच्या खुल्या मैदानात सोहम योगाभ्यासी मंडळाच्यावतीने योगाभ्यासाचे प्रात्याक्षिक केले. तसेच शहराच्या मध्यभागी असलेल्या शिवटेकडी येथे योगाचे प्रात्याक्षिक केले जाणार आहे. त्यानंतर १६ जून रोजी सकाळी ६ ते ७ या वेळात यशोदानगर परिसरातील भीमटेकडी येथे योग महोत्सव साजरा होणार आहे. २१ जून रोजी जागतिक योग दिन असून या दिवसापर्यंत ठिकठिकाणी योगाभ्याचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच उपक्रमाचा समारोप जागतिक योगदिनी स्थानिक दस्तुरनगर येथील कमल प्लाझा मंगल कार्यालयालगत गजानन महाराज मंदिराच्या सभागृहात होणार आहे. आरोग्य ज्ञान आणि जागतिक शांततेसाठी योगाभ्यासात सहभागी होण्याचे आवाहन सोहम योगाभ्यासी मंडळाचे अध्यक्ष तथा मनपा स्थायी समिति सभापती अविनाश मार्डीकर, योग प्रशिक्षक दिलीप शेलोटकर यांनी केले आहे.

### शहरात प्रतिबंधात्मक कलम ३७ (१) व (३) लागू

**अमरावती-**शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम ३७ (१) व (३) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. प्रतिबंधात्मक आदेश पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला असून सदर आदेश ११ ते २५ जून २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्ती विरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी कळविले आहे.

### मिनी ट्रॅक्टर योजनेचा लाभ घेण्यासाठी १९ जूनपर्यंत मुदत

**अमरावती-**सन २०२६-२७ या वर्षाकरिता अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना 'मिनी ट्रॅक्टर व त्यांची उपसाधने' पुरवण्याच्या योजनेअंतर्गत ऑफलाइन पद्धतीने अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत शुक्रवार १९ जून २०२६ पर्यंत आहे. तरी जिल्ह्यातील पात्र बचत गटांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी केले आहे.

### पेन्शन समस्या निवारणासाठी सोमवारी विशेष शिबीर

**अमरावती-**मुंबई येथील ‘आयएनएस त्राता, नेव्हल युनिट’कडून नौदलाचे माजी सैनिक आणि त्यांच्या विधवा यांच्या पेन्शन तसेच इतर दस्तऐवजांशी संबंधित प्रलंबित समस्यांचे निवारण करण्यासाठी ‘आयएनएस त्राता, नेव्हल युनिट’ची एक विशेष चमू येत आहे. ज्या नौदल माजी सैनिक आणि त्यांच्या विधवा भगिनींच्या पेन्शन किंवा इतर कागदपत्रांबाबत काही तक्रारी अथवा समस्या असतील, त्यांनी सोमवार १५ जून २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजेपर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अमरावती येथे आपल्या आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर आनंद पाथरकर यांनी केले आहे.

## लग्न समारंभात आपसी वादामध्ये मारहाण

**बेलोरा-**जुन्या वैमनस्यावरून इसमाला लग्न समारंभात मारहाण केल्याची घटना चांदुरबाजार येथे घडली. मोहम्मद शफीक अब्दुल शहीद रा. कुहा देशमुख व शेख जब्बार शेख शब्बीर (३५) रा. चांदूरबाजार अशी आरोपींची नावे आहेत. चांदुरबाजार येथील लंगोटे मंगल कार्यालयात दोघेही लग्नाला आले होते. जुन्या वैमनस्यावरून त्यांनी मोहम्मद शहीद अब्दुल वकील रा. भैंसदही यांना लोखंडी सळाखीने मारहाण केली. त्यांचे वडील अब्दुल वकील अब्दुल बशीर यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## पायदळ दिंडीमधील भाविकांना आवाहन

**कुऱ्हा-**विदर्भाची पंढरी आई रूख्मीणी मातेचे माहेरची पालखी श्रीतिर्थक्षेत्र कौंडण्यपूर येथून श्रीतिर्थक्षेत्र पंढरपूर आषाढी यात्रेसाठी १९ जून रोजी पायदळ दिंडासह दरवर्षी प्रमाणे निघणार आहे.ज्या भाविक भक्तांना दिंडीत सहभागी होवून पंढरपूर वारीला जायचे आहे. त्यांनी दिंडीत प्रवेश मिळण्यासाठी खालील कागद पत्रासह मंदीरात कार्यालयीन वेळी आपणास नावाची नोंद करता येईल.याकरिता आधार कार्डाची सत्यप्रत, दोन फोटो, रूपये ११००/- नोंदणी फी, ६५ वर्षा खालील सशक्त व सुदृढ व्यक्तीसच प्रवेश मिळू शकते याची कृपया नोंद असू द्यावी. असे अध्यक्ष व सचिव, विश्वस्त मंडळ व अधिकृत पायदळ पालखी सोहळा संचालन समिती, श्री विठ्ठल रुख्मीणी संस्थान श्री तिर्थक्षेत्र कौंडण्यपूर यांनी केली आहे.

## ‘कोणार्क’ला स्वच्छतेचे ५० टक्के देयक मिळणार

### प्रशासनाचा निर्णय

**अमरावती/का.प्र.**

कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीच्या कामकाजाबाबत कितीही वादंग उठले असले आणि कंपनीला तूर्तास देयक अदा न करण्याचा निर्णय गतवेळी आमसभेत मी झाला असला, तरीही कंपनीला निम्मे देयक देण्यास आयुक्त वर्षा लड्डा यांनी मंजुरी दिली आहे. त्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून रखडलेले देयक काही प्रमाणात निघण्याचा कंपनीचा मार्ग मोकळा झाला आहे. दरम्यान, देयकांसाठी सफाई कामगार सातत्याने कामबंद करीत असल्याने समस्या गंभीर झाली आहे. त्यामुळेच हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

कोणार्ककडे दैनंदिन साफसफाई व कचरा वहनाचाही कंत्राट असून, दरमहा सुमारे ४० लाख रुपये किमतीचा हा कंत्राट आहे; मात्र अनेकदा काही प्रभागांत काम बंद झाल्याने कंपनीच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह लागले आहे. नुकताच बडनेरातील प्रभाग क्र.२१ व प्रभाग क्र. २२ मध्येही सध्या कामगारांनी वेतनासाठी कामबंद ठेवले होते. स्वच्छतेच्या कामात हयगय केल्याप्रकरणी कंपनीला दंडही करण्यात आला आहे. आमसभेत या विषयावर बराच गदारोळ झाला होता.

त्यावेळी कोणार्कचे देयक थांबविण्यात आले होते; मात्र आता कंपनीला एकूण देयकापैकी निम्मे देयक देण्यास मंजुरी मिळाली आहे. गत डिसेंबर २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीतील ३ कोटी २४ लाख रुपयांपैकी १ कोटी ६२ लाख रुपये कंपनीला देण्यात येणार आहे.

## दिव्यांग विद्यार्थ्यांच्या न्याय हक्कांसाठी १५ जूनपासून ‘अन्नत्याग उपोषण’

### राज्यभरातील विद्यार्थ्यांचा सहभाग

**अमरावती/का.प्र.**

सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी लागू असलेले समांतर आरक्षण रद्द करून, केंद्र सरकारच्या कायद्यानुसार स्वतंत्र ५इ आरक्षण लागू करावे, या मुख्य मागणीसाठी आगामी सोमवार, १५ जून २०२६ रोजी सकाळी ठीक ११:०० वाजल्यापासून समाज कल्याण आयुक्तालय, पुणे च्या कार्यालयाबाहेर राज्यस्तरीय तीव्र आंदोलन आणि अन्नत्याग उपोषण करण्यात येणार आहे. दिव्यांग विद्यार्थी प्रतिनिधी गौरव मालक यांच्या नेतृत्वात हे आंदोलन होणार असून, यामध्ये राज्यभरातून असंख्य दिव्यांग विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी होणार आहेत.

सध्या सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ‘समांतर आरक्षण’ पद्धत लागू आहे. या पद्धतीमुळे प्रत्येक प्रवर्गातील अत्यंत मर्यादित जागांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणे अत्यंत कठीण झाले आहे. परिणामी, अनेक गरजू आणि पात्र दिव्यांग विद्यार्थी-विद्यार्थिनी वसतिगृहाच्या प्रवेशापासून वंचित राहत असून, त्यांना शिक्षण घेताना मोठ्या आर्थिक व मानसिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या समांतर आरक्षणामुळे राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांवर मोठा अन्याय होत आहे.शासनाच्या ‘दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६’ मधील कायदेशीर तरतुदीनुसार दिव्यांग व्यक्तींसाठी स्वतंत्र ५ इ आरक्षणाची स्पष्ट व्यवस्था करण्यात आलेली आहे. याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागानेही आपल्या वसतिगृहांमध्ये समांतर आरक्षणाची जाचक अट रद्द करून, स्वतंत्र ५ इ दिव्यांग आरक्षण तात्काळ लागू करावं ही विद्यार्थ्यांची प्रमुख मागणी आहे.या संदर्भातील सविस्तर मागण्यांचे निवेदन आणि प्रशासनाला यापूर्वी करण्यात आलेल्या पाठपुराव्याची माहिती आंदोलनादरम्यान प्रसारमाध्यमांना दिली जाईल.

## ७५३ ग्रामपंचायत क्षेत्रात उभारणार स्वयंचलित हवामान केंद्रे

**अमरावती/का.प्र.**

‘विंड्स’ प्रकल्पांतर्गत अमरावती जिल्ह्यात तब्बल ७५३ ग्रामपंचायतींमध्ये स्वयंचलित हवामान केंद्रे उभारली जाणार आहेत. यामुळे गावागावातील हवामानाचा अचूक अंदाज शेतकऱ्यांना मोबाइलवर मिळणार आहे.

जिल्ह्यात ८४३ ग्रामपंचायती आहेत. यापूर्वी ९१ ठिकाणी स्वयंचलित हवामान केंद्रे कार्यान्वित होती. मात्र, आता नवीन जागा निवडीनुसार ७५३ ग्रामपंचायतींमध्ये नवीन केंद्रे उभारण्यात येणार आहेत. प्रशासनाद्वारे ७३७ ठिकाणांची निवडप्रक्रिया पूर्ण केली असून, ५३७ग्रामपंचायतींचे ना हरकत दाखलेही प्राप्त आहेत. चिखलदरा, धारणी, तिवसा आणि वरूड तालुक्यांमध्ये सर्व जागांची निवड पूर्ण झाली असल्याचे कृषी विभागाने सांगितले. अद्याप चांदूर रेल्वे व अचलपूर तालुक्यात प्रत्येकी दोन, अंजनगाव सुर्जी तालुक्यात सात व चांदूर बाजार तालुक्यात पाच ग्रामपंचायतींमध्ये स्वयंचलित हवामान केंद्रासाठी शासकीय जागा उपलब्ध नसल्याची माहिती आहे.

या प्रकल्पामुळे पीक विम्याच्या तक्रारींचे निवारण करणे सोपे होईल.अनेकदा एका मंडळात पाऊस पडतो. दुसऱ्या भागात कोरडे हवामान असते. आता ग्रामपंचायत स्तरावर केंद्र असल्याने, ज्या गावात नुकसान झाले आहे, तिथला अचूक डेटा उपलब्ध होईल.

त्यामुळे नुकसानभरपाई मिळण्यात पारदर्शकता येईल व पेरणीपासून ते काढणीपर्यंतच्या कामांचे नियोजन हवामानाचा अंदाज पाहून करणे शेतकऱ्यांना शक्य होणार असल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी सांगितले.

विंड्स म्हणजे 'वेदर इन्फॉर्मेशन नेटवर्क डेटा सिस्टम'. हा केंद्र सरकारचा एक महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. या प्रकल्पांतर्गत गावस्तरावर अद्ययावत हवामान यंत्रणा कार्यान्वित केली जात आहे.

## अर्धवट नात्यांना पूर्णविराम:नव्या आयुष्याची गरज

**आ**ज न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या हजारो कौटुंबिक खटल्यांकडे पाहिले, तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते.यातील अनेक खटले हे प्रत्यक्षात नातं वाचवण्यासाठी नसतात,तर आधीच संपलेल्या नात्याला कृत्रिम श्वास देण्यासाठी चाललेले संघर्ष असतात.पती-पत्नी वर्षानुवर्षे वेगळे राहत असतात,संवाद संपलेला असतो,विश्वास तुटलेला असतो, प्रेमाचा ओलावा कोरडा पडलेला असतो; पण तरीही नाते कागदावर जिवंत ठेवण्यासाठी न्यायालयात लढाई सुरू असते.दुर्दैवाने या लढाईचा केंद्रबिंदू अनेकदा नाते नसतो, तर पोटगी किती मिळणार किंवा किती द्यावी लागणार हा प्रश्न असतो.

नाते जपण्याची लढाई आणि पैशाची लढाई यात खूप मोठा फरक आहे. जेव्हा दोन व्यक्ती एकमेकांपासून मनाने, विचाराने आणि आयुष्याने दूर निघून गेलेल्या असतात,तेव्हा केवळ कायद्याच्या आधारावर ते नाते टिकवण्याचा प्रयत्न अनेकदा अधिक वेदनादायक ठरतो. अशा परिस्थितीत सर्वात महत्त्वाची गोष्ट असते ती म्हणजे योग्य वेळी समुपदेशन.

वैद्यकीय शास्त्रात एक साधा नियम आहे.आजार सुरुवातीच्या अवस्थेत असेल, तर योग्य औषधांनी तो पूर्णपणे बरा होऊ शकतो.पण त्याकडे दुर्लक्ष केले, उपचार टाळले आणि आजार शेवटच्या टप्प्यावर पोहोचला, तर डॉक्टरही अनेकदा फक्त आयुष्याचे दिवस वाढवू शकतात; आरोग्य पूर्णपणे परत देऊ शकत नाहीत.नात्यांचेही तसेच असते.




गैरसमज, अहंकार, संवादाचा अभाव आणि अपेक्षांचं ओझं या गोष्टी सुरुवातीलाच समुपदेशनातून दूर झाल्या, तर अनेक संसार वाचू शकतात.पण वर्षानुवर्षे कटुता वाढत गेली,विश्वास पूर्णपणे नष्ट झाला आणि मनांचे दरवाजे कायमचे बंद झाले, तर त्या नात्याला वाचवण्याचा हट्ट अनेकदा दोघांच्याही आयुष्याची शिक्षा बनतो.

आज अनेक जोडपी न्यायालयात दहा-दहा,पंधरा-पंधरा वर्षे खटले लढताना दिसतात.तारखा पडत राहतात, वकील बदलतात, अर्ज दाखल होतात,अपील होतात; पण आयुष्य मात्र थांबत नाही.तरुणपण निघून जाते,मुलांचे बालपण संपते,पालक वृद्ध होतात आणि दोन माणसे एका संपलेल्या नात्याच्या सावलीत जगत राहतात.शेवटी प्रश्न पडतो की या संघर्षातून नेमके मिळते काय?पैसा?समाधान?की फक्त वाढलेला मानसिक ताण?

याचा अर्थ प्रत्येक नाते तोडावे असा अजिबात नाही. उलट, नाते वाचवण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न व्हायला हवेत. समुपदेशन, संवाद, समजूतदारपणा आणि कुटुंबीयांची सकारात्मक भूमिका यामुळे अनेक संसार पुन्हा उभे राहू शकतात. पण जेव्हा सर्व प्रयत्न निष्फळ ठरतात, जेव्हा एकत्र राहण्याची इच्छा आणि शक्यता दोन्ही संपून जातात, तेव्हा वास्तव स्वीकारण्याचे धैर्य दाखवणेही तितकेच महत्त्वाचे असते.

अशा वेळी केवळ पोटगीच्या रकमेत अडकून राहण्यापेक्षा परस्पर सन्मानाने, सुवर्णमध्य शोधून, वादाचा शेवट करणे अधिक शहाणपणाचे ठरते. कारण न्यायालयाचा निकाल नाते परत देऊ शकत नाही; तो फक्त कायदेशीर प्रश्न सोडवू शकतो. मनाचे प्रश्न मात्र मनानेच सोडवावे लागतात.

कधी कधी पूर्णविराम हा पराभव नसतो;तो नव्या अध्यायाची सुरुवात असतो. अर्धवट नात्यांच्या अवशेषांमध्ये आयुष्य घालवण्यापेक्षा, भूतकाळाचा स्वीकार करून नव्या आशेने पुढे चालणे अधिक योग्य असते. कारण आयुष्य एकदाच मिळते आणि ते न्यायालयाच्या तारखांमध्ये नव्हे, तर मनःशांतीत जगण्यासाठी असते.

अर्धवट नाते ओढत नेण्यात शहाणपण नसते; योग्य वेळी घेतलेला सन्मानजनक निर्णय अनेकदा दोघांनाही नव्याने जगण्याची संधी देतो.

**-ॲड.धनंजय देशमुख**
मो. ९२८४३८२१०२
कौटुंबिक न्यायालय,
अमरावती

## रक्तदान माणुसकीचे प्रतीक

**ऑ**स्ट्रियन जीवशास्त्रज्ञ कार्ल लँडस्टेनर यांचा जन्मदिवस १४ जून रोजी. असतो. त्यांनीच मानवी रक्ताचे ए बी एबी आणि ओ या मुख्य रक्तगटांमध्ये वर्गीकरण केले होते, ज्यासाठी त्यांना १९३० साली नोबेल पारितोषिक मिळाले. त्यांच्या या महान शोधाच्या स्मरणार्थ हा दिवस दरवर्षी जगभरात जागतिक रक्तदाता दिन (वर्ल्ड ब्लड डोनर डे) म्हणून साजरा केल्या जातो.‘रक्तदाता’ नेहमीच रुग्णांसाठी आशेचा किरण ठरला आहे.‘स्वैच्छिक रक्तदाता’ म्हणून आपण जेवढे समाजातील लोकांना जागृत कराल तेवढी माहिती जनमानसात रुजेल. यात सामाजिक बांधिलकी जोपासणारे रक्तदात्यांचा सिंहाचा वाटा आहे.आज पावतो आपल्या देशात अनेक प्रगतीच्या वाटा निर्माण झाल्या पण मानवी रक्तासाठी कोणत्याही पर्याय आजपावतो मिळाला नाही.रक्त हे कुठल्याही प्रयोगशाळेत तथा कारखान्यात तयार होत नसते,हे आजही सर्व सामान्य माणसाला माहीत आहे. पण ते तयार होते तुमच्या आमच्या मानवी शरीरात.!शासनाच्या मार्गदर्शक ध्येय धोरण तसेच शासकीय पातळीवर जनमानसात पोहोचल्यामुळे अनेक युवक रक्तदान करण्यासाठी पुढे येतात, याचे कारण ही तसेच आहे?आपल्या रुग्णांना रक्त मिळणार तरी कोठून?आपणच रक्तदान नाही केले तर रुग्णांना जीवदान मिळणार कसे?ही भावना आतापर्यंत सर्व जनमानसापर्यंत पोहचणे आपली सामाजिक बांधिलकी आहे. ज्यांच्या रुग्णांना वेळेवर रक्तपुरवठा होऊन जीव वाचलेला असतो याची जाणीव असलेल्या रुग्णांचे नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार आदी यांना स्वैच्छिक रक्तदानाचे महत्त्व पटलेले असते. त्यांनी पुढे येऊन या राष्ट्रीय कार्यात सहभागी झाले पाहिजे. रक्तदानाचे फायदे कॅन्सर, हार्टअटॅक




इत्यादीचा धोका कमी असतो. तसेच कोलेस्टेरॉलचे प्रमाण आणि रक्तदाब नियंत्रणात राहतो.

रस्त्यावर झालेला अपघातात अतिरक्तस्राव झालेला व्यक्ती,प्रसूती वेळी अथवा प्रसूतीनंतर अतिरक्तस्राव झालेल्या महिलेला वेळीच रक्त मिळाले तर नक्कीच त्यांचे प्राण वाचविल्याचे ‘रक्तदाता’ म्हणून समाधान मिळते. या व्यतिरिक्त ॲनेमिया, शस्त्रक्रिया,कर्करोग आदी रुग्णांना रक्ताची गरज भासते. यासाठी स्वैच्छिक रक्तदाता म्हणून रक्तदान करणे महत्त्वाचे आहे.याच बरोबर थॅलेसेमिया, सिकलसेल यासारख्या दुर्मिळ आजाराने ग्रासलेल्या काही बालकांमध्ये जन्मजात रक्त तयार होण्याचे प्रमाण अत्यल्प कमी असते. त्यामुळे त्यांचे योग्य निदान करून वैद्यकीय सल्लानुसार रक्तपुरवठा केला जातो. अशा रुग्णांचे प्रमाण देशात भरपूर आहे. त्यांना महिन्यातून किमान दोन वेळेस तरी वैद्यकीय सल्ल्यानुसार रक्तपुरवठा केला जातो.अशा रुग्णांना वेळो वेळी रक्त द्यावे लागते,यासाठी आपली सर्वांची सामाजिक बांधिलकी नात्याने नैतिक जबाबदारी आहे.यासाठी आपण रक्तदान शिबिर अथवा रक्तकेंद्रात जावून शासन मान्यता प्राप्त रक्तपेढी/रक्तकेंद्रात आपले ‘रक्तदाता’ म्हणून स्वैच्छिक रक्तदान महत्त्वाचे ठरते. यासाठी आपण कोणत्याही शासन मान्यताप्राप्त रक्तपेढी/रक्तकेंद्र येथून रक्त घेणे कधीही फायदेशीर आहे.रक्तदाता म्हणून आपले वय १८-६० वर्षेपर्यंत व वजन ४८ किलो पेक्षा जास्त तसेच शरीरातील हिमोग्लोबिन योग्य प्रमाण (१२.५% वर) असलेल्या निरोगी व्यक्ती रक्तदान करु शकता.तसेच शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार रक्तकेंद्रात अथवा रक्तदान शिबिरात विविध तपासणी करून रक्तसंकलन केले जाते.रक्ताच्या दिशानिर्देश नुसार सर्व चाचणी(एड्स, कावीळ अ,ब आणि गुप्तरोग,मलेरिया, रक्तगट, क्रासमॅंच इ.)केल्यानंतरच रुग्णांना सुरक्षित रक्तपुरवठा केला जातो.आपण केलेले स्वैच्छिक रक्तदान यासाठी शासन नियमानुसार दोन वर्षातून एकदा मोफत रक्त मिळते.याचा लाभ आपण घेऊ शकता. रक्त हे जास्त काळ साठवून ठेवू शकत नाही (रक्तदान केल्यापासून फक्त ३५ दिवस) यासाठी रुग्णांना सतत रक्ताची गरज भासते. रक्तदानानंतर शासनाच्या मार्गदर्शक सूचना नूसार रक्त व रक्ताचे विघटन करून प्लाझ्मा, लाल रक्तपेशी, पांढऱ्या रक्तपेशी आणि प्लेटलेट्स ,क्रायोप्रेसिपिटेड आदी विघटन तयार करुन वैद्यकीय सल्ल्यानुसार रुग्णांना पुरवठा केला जातो.यासाठी आपले स्वैच्छिक रक्तदान महत्वाचे ठरते.

१४ जून जागतिक रक्तदाता दिनानिमित्त एवढेच आपल्याला आवाहन करण्यात येते की,स्वैच्छिक रक्तदान ही काळाची गरज ओळखून आपल्या जवळच्या शासन मान्यता प्राप्त रक्तपेढीत आपण जबाबदार भारतीय नागरिक‘रक्तदाता’म्हणून सामाजिक बांधिलकी जोपासून निश्वासर्थपणे स्वैच्छिक रक्तदान करावे.निसर्गाने आपल्याला रक्त भरण्यासाठी एकच शरीर दिले आहे, पण आपण ते दुसऱ्याला देऊन अनेक जीवन वाचवू शकतो

**डॉ विनोद पवार**
जिल्हा शल्य चिकित्सक
सा.रु.अमरावती

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# असंतोषाचा ज्वालामुखी

आखातातील संघर्षाचा तिढा सुटण्याच्या टप्प्यावर असून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमध्ये यासंदर्भातील कराराची घोषणा केली. १०० दिवसांहून अधिक काळ चाललेल्या या संघर्षाचे भीषण परिणाम सोसणाऱ्या जगासाठी हा करार प्रत्यक्षात पूर्ण होईल, तो दिवस दिवाळीसम असेल. भारतासाठी या घडामोडीमध्ये एक महत्त्वाची बाब अंतर्भूत आहे. या संपूर्ण प्रक्रियेत पाकिस्तानला पूर्णतः बाजूला सारले आहे. फेब्रुवारीत अमेरिका-इराण संघर्ष टोकाला पोहोचला होता, तेव्हा पाकिस्तानने मध्यस्थाची भूमिका बजावली होती. लष्करप्रमुख असीम मुनीर आणि पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी जोरदार मोर्चेबांधणी केली होती. एप्रिल महिन्यात तात्पुरती युद्धबंदी झाली, तेव्हा या कराराची 'इस्लामाबाद अकॉर्ड' म्हणून नोंद व्हावी, अशी पाकची अपेक्षा होती; मात्र अमेरिकेने आताचा करार पाकिस्तानमध्ये न करता युरोपमधील शहरात होणार असल्याचे स्पष्ट केल्याने पाकच्या अपेक्षा धुळीस मिळाल्या.आयएमएफच्या अटींचे कडक पालन आणि या युद्धाच्या दुहेरी आर्थिक फटक्यामुळे पाकची अर्थव्यवस्था प्रचंड दबावाखाली आहे. पाकिस्तानची अर्थव्यवस्था आखाती देशांतून होणारी ऊर्जा आयात, तेथून येणारे परकीय चलन आणि आर्थिक साहाय्यावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असल्याने या संघर्षाचा सर्वाधिक फटका इस्लामाबादला बसला. तेथील महागाई उच्चांकी स्तरावर गेली. पाकमधील अनधिकृत अर्थव्यवस्थेचा विस्तार मोठा आहे. एकूण लोकसंख्येपैकी केवळ १.३ टक्के नागरिकच आयकर विवरणपत्र भरतात. वित्तीय तूट कमी करण्याच्या नादात सरकार पायाभूत सुविधा आणि आर्थिक विकासावरील खर्च कपात करत असून, संरक्षण आणि अंतर्गत सुरक्षेशिवाय इतर कोणत्याही नवीन प्रकल्पांची घोषणा न करण्याचे धोरण अवलंबत आहे. नाणेनिधीच्या दबावामुळे लागू करण्यात येणाऱ्या जाचक अटींमुळे सामान्य नागरिकांमध्ये कमालीचा रोष आहे. सीमाभागातील व्यापार ठप्प झाल्यामुळे एलपीजी आणि डिझेलच्या किमती दुप्पट झाल्या. खत कारखाने बंद करावे लागल्याने शेती उत्पादन घटण्याची आणि अन्न सुरक्षेचा प्रश्न निर्माण होण्याची भीती आहे.या भीषण परिस्थितीत नागरिकांना दिलासा देण्याऐवजी पाकिस्तानी राज्यकर्ते नृशंस धोरणे राबवत आहेत. महागाई, करांमधील अनपेक्षित वाढ, पिण्याच्या पाण्याचा तुटवडा आणि पिठासारख्या जीवनावश्यक वस्तूंचे गगनाला भिडलेले भाव यामुळे पाकव्याप्त काश्मीरमध्ये मोठ्या प्रमाणावर जनक्षोभ उसळला. आंदोलकांच्या भावना समजून घेण्याऐवजी शरीफ सरकारने लष्कराकरवी हा निषेध दडपण्याचा प्रयत्न केला. वरवर पाहता हे आंदोलन आर्थिक मागण्यांसाठी असले, तरी याच्या मुळाशी पाकव्याप्त काश्मीरच्या स्वायत्ततेचा आणि पाकिस्तानच्या हुकूमशाहीचा मुद्दा कारणीभूत आहे. पाकिस्तानने जागतिक समुदायाला दाखवण्यासाठी या प्रदेशाला एक स्वतंत्र दर्जा दिला असला, तरी पडद्यामागून संपूर्ण सत्ता इस्लामाबादमधील केंद्र सरकारच्या आणि प्रामुख्याने पाकिस्तानी लष्कराच्या हातात एकवटली आहे. पाकच्या संविधानातील काही तरतुदी या प्रदेशातील स्थानिक जनतेच्या गळा घोटणाऱ्या ठरल्या आहेत. या संपूर्ण व्यवस्थेतील सर्वात मोठा अडथळा म्हणजे 'आझाद जम्मू आणि काश्मीर कौन्सिल' ही संस्था आहे. या कौन्सिलचे अध्यक्ष स्वतः पाकिस्तानचे पंतप्रधान असतात, तर पाच केंद्रीय मंत्री याचे सदस्य असतात. कर आकारणी, नैसर्गिक संसाधनांचा वापर, आर्थिक नियोजन आणि थेट परकीय गुंतवणूक यांसारख्या विषयांवर निर्णय घेण्याचा अधिकार केवळ या कौन्सिलला म्हणजेच थेट इस्लामाबादला आहे. त्यामुळे पीओकेमधील लोकनियुक्त पंतप्रधान आणि राष्ट्रपती हे केवळ नामधारी प्रमुख ठरतात, ज्यांना जनतेसाठी स्वतंत्रपणे कोणताही आर्थिक किंवा राजकीय निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नसते. तेथील कोणत्याही नागरिकाला किंवा राजकीय पक्षाला पाकिस्तानमधील विलीनीकरणाच्या कल्पनेला विरोध करण्याचा अधिकार नाही. एखाद्या व्यक्तीने किंवा पक्षाने जम्मू-काश्मीरच्या पूर्ण स्वातंत्र्याची किंवा भारतासोबत जाण्याची भूमिका घेतली, तर त्याला देशद्रोही ठरवून निवडणुकीत लढवण्यास अपात्र केले जाते. सरकारी नोकऱ्यांसाठीदेखील पाकिस्तानप्रती निष्ठा राखण्याची शपथ घेणे बंधनकारक आहे. स्थानिक जनतेला केवळ पाकिस्तानच्या इशाऱ्यावर चालणारे राजकारण करण्याचीच परवानगी असून, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणली आहे.सध्याच्या आंदोलनाचा थेट संबंध याच छुप्या शोषणाशी जोडलेला आहे. पाकव्याप्त काश्मीर हा जलसंपत्तीत अत्यंत समृद्ध आहे. येथील नीलम आणि झेलम नद्यांवरील धरणांमधून वीजनिर्मिती केली जाते; मात्र पीओकेमधील जनतेला अत्यंत महागड्या दराने वीज खरेदी करावी लागत आहे. पाक सरकारने वीज दरात आणि गव्हाच्या किमतीवर मिळणाऱ्या अनुदानात कपात केल्यामुळे स्थानिक जनतेचा संयम सुटला आणि त्यांनी 'अवामी ॲक्शन कमिटी'च्या नेतृत्वाखाली व्यापक आंदोलन सुरू केले. स्थानिक जनतेच्या मते, ज्या धरणांच्या उभारणीसाठी आमच्या पूर्वजांनी जमिनी गमावल्या, विस्थापित झाले, त्याच धरणांतून तयार होणारी वीज आम्हाला अवाजवी दराने विकणे हा अन्याय आहे. पाकच्या केंद्रीय नेतृत्वाने नेहमीच या प्रदेशाचा वापर केवळ भूराजकीय फायद्यासाठी आणि भारताच्या विरोधात एक हत्यार म्हणून केला.स्थानिक पायाभूत सुविधांचा विकास, आरोग्य यंत्रणा आणि शिक्षण याकडे सातत्याने दुर्लक्ष केले. पाकिस्तान स्वतः गंभीर आर्थिक संकटाचा सामना करत असल्याने त्याचा थेट बोजा या उपेक्षित प्रदेशावर टाकला जात आहे. एकीकडे सर्वसामान्य जनता गरिबी आणि महागाईने होरपळत असताना दुसरीकडे पाकव्याप्त काश्मीरमधील सरकारी अधिकारी, मंत्री आणि नोकरशहा यांच्या विलासी राहणीमानावर प्रचंड खर्च केला जात आहे. मोफत गाड्या, इंधन आणि इतर भत्त्यांवर स्थानिकांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. पीओकेचा ध्वज, पंतप्रधान आणि घटना हे केवळ जगाच्या डोळ्यात धूळ फेकण्यासाठीचे साधन असून, प्रत्यक्षात ते एका वसाहतीसारखे जीवन जगत आहेत, याची जाणीव झाल्याने या प्रदेशातील प्रदीर्घ असंतोष आता हिंसक आंदोलनाच्या रूपाने बाहेर पडत आहे. हा संपूर्ण प्रदेश मागासलेला असून, दहशतवाद आणि सुरक्षेच्या कारणास्तव येथे मोठ्या प्रमाणावर लष्कर तैनात आहे. लष्कराकडून होणाऱ्या शोषणाबाबतही स्थानिक जनतेतील राग पराकोटीला गेला आहे. पाकिस्तानची ढासळती अर्थव्यवस्था आणि अंतर्गत राजकीय अस्थिरता पाहता पाकव्याप्त काश्मीरमधील असंतोषाचा ज्वालामुखी पाकिस्तानसाठी येणाऱ्या काळात अत्यंत घातक ठरू शकतो.

# 'इंडिया' आघाडीचे नुसतेच हाकारे!



**तृणमूल काँग्रेस मोठ्या फुटीच्या उंबरठ्यावर उभी असून पक्षचिन्ह ममता बॅनर्जी यांच्याकडे राहील किंवा नाही अशी स्थिती आहे.**

अलिकडेच झालेल्या काही लोकसभेच्या पोट आणि विधानसभांच्या पोटनिवडणुकात भारतीय जनता पक्षाने नेत्रदीपक यश संपादन केले आहे.त्यातही पश्चिम बंगालसारख्या राज्यात भाजपने मारलेली मुसंडी तर चकित करणारी आहे.त्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या विरोधातील काँग्रेसप्रणित 'इंडिया' या आघाडीची आणखी एक बैठक नुकतीच नवी दिल्लीत पार पडली.२०१८साली ही इंडिया आघाडी कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने मिळवलेल्या विजयापासून प्रेरणा घेऊन मोठा गाजावजा करत स्थापन झाल्याची घोषणा विविध विरोधी पक्षांच्या नेत्यांनी हात उंचावून केली. ही आघाडी भारतीय जनता पक्षाला समर्थ पर्याय उभा करेल,अशी ग्वाही पहिल्याच बैठकीत देण्यात आली.पण,नंतर या आघाडीने एखादी ना विधानसभेची किंवा लोकसभेची निवडणूक एकत्र लढली किंवा ना आघाडीचा नेता जाहीर केला,ना भाजपच्या विरोधात कोणता सामायिक कार्यक्रम जाहीर केला.किमान नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधानपदाच्या १२ वर्षांचा रोखठोक आढावा जरी यावेळी घेतला गेला असता तर बैठकीचे सार्थक झाले असते पण, तेही झाले नाही.त्यामुळे इंडिया आघाडीची ही बैठक पुन्हा एकदा केवळ हाकारे उठवणारी ठरली आहे!

तमाम डावे पक्ष या इंडिया नावाच्या ऐक्याकडे ढुंकूनही बघायला तयार नसतांना या इंडिया आघाडीकडून भारतीय जनता पक्षाच्या विरोधात प्रत्यक्षात काहीच कृती/कार्यक्रम घडत काहीच नाही.आठ वर्षांपूर्वी कर्नाटक विधानसभा निवडणुकीच्या निकालाच्या निमित्ताने नवी समीकरणे आकाराला आली,अशी मांडणी मोठ्या तार स्वरात केली गेली पण, त्याच कर्नाटकात त्यावेळी सत्ता प्राप्तीसाठी दोन पक्षात इतकी रस्सीखेच झाली की,मंत्रीमंडळ स्थापन होण्यासाठी तब्बल पंधरवडा उलटावा लागला.कसेबसे मंत्रीमंडळ अस्तित्वात आले तर काँग्रेसमधल्या नाराजांनी जो कल्ला तेव्हापासून सुरु केला तो अजूनही थांबलेला नाही. कर्नाटकात काँग्रेस सरकारमध्ये नुकतेच झालेले आणखी एक सत्तांतर त्याचे जिवंत उदाहरण आहे.

प्रत्यक्षात इंडिया आघाडीत सहभागी पक्षांची अवस्था सध्या जरा जर्जर झाल्यासारखी आहे.ममता बॅनर्जी इंडिया घडीत एकदाच्या सहभागी झाल्या आणि त्यामुळे आघाडी कशी मजबूत झाली याचे दाखले देण्यात आले.प्रत्यक्षात ममता बॅनर्जी यांचा पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत धुव्वा उडाला आहे.सलग दुसऱ्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा त्यांच्याच मतदार संघात पराभव झाला,इतका त्यांचा जनाधार घटलेला आहे.विधानसभा निवडणुकीनंतर त्यांच्या तृणमूल काँग्रेसच्या आमदार आणि खासदारांत म्हणजे, विधानसभा आणि लोकसभा पातळीवर मोठी बंडखोरी झालेली आहे.अनेक आमदार आणि खासदारांनी ममता बॅनर्जी यांचे नेतृत्व साफ अमान्य केलेले आहे. तृणमूल काँग्रेस मोठ्या फुटीच्या उंबरठ्यावर उभी आहे आणि तृणमूल काँग्रेस हे नाव व पक्षचिन्ह ममता बॅनर्जी यांच्याकडे राहील किंवा नाही अशी स्थिती आहे.करिष्मा, संघटन कौशल्य,धाडस आणि संघर्षशीलता या चांगल्या गुणांसोबतच ममता यांचे नेतृत्व एकांगी आहे; त्यांचा स्वभाव महत्त्वाकांक्षी व अतिआततायी आहे. इतर कुणाचे नेतृत्व त्यांना मान्य नसते.मोदी व भाजपच्या कट्टर विरोधक असणाऱ्या ममता बॅनर्जी यांना काँग्रेसमध्ये आणून राज्यसभा सदस्यत्व देऊन त्यांना त्या सभागृहाचा विरोधी पक्ष नेता करण्याच्या प्रकाशित झालेल्या बातम्या (की हालचाली?) म्हणूनच काँग्रेस व इंडिया आघाडीसाठी धोक्याच्या आहेत. उद्या त्या सोनिया आणि राहुल गांधी यांच्यासह इंडिया आघाडीतील सर्वानाच आव्हान देऊ शकतात.

भाजपच्या विरोधात एक सशक्त आघाडी निर्माण व्हायची असेल तर अनेक अडथळे समोर उभे आहेत. मुख्य कळीचा मुद्दा आघाडीचा आणि नंतर सत्ता मिळालीच तर सरकारचा नेता कोण, यावर एकमत व्हायला हवे. सत्ता मिळाली तर पंतप्रधान व्हायला आवडेल, असे सांगून राहुल गांधी यांनी कधीचाच रुमाल टाकून जागा अडवून ठेवलेली आहे. गेल्या आठवड्यातील बैठकीत आप पक्ष सहभागी झाला नाही, द्रमुकने पाठ फिरवली.पहिल्याचा प्रयत्नात सत्तेत आलेल्या टीव्हीकेने अजून पत्ते उघड कलेले नाहीत. ओमर अब्दुल्ला आणि अखिलेश यादव यांची उपस्थिती केवळ दाखवण्यापुरती होती कारण त्याना त्यांच्याच राज्यात रस आहे, राष्ट्रीय राजकारणात नाही. उद्धव ठाकरे आणि शरद पवार प्रत्यक्ष गेले नाहीत. स्पष्ट सांगायचे तर, उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि शरद पवार यांचा राष्ट्रवादी महाराष्ट्रात गलितगात्र आहेत.हे दोघे आणि अरविंद केजरीवाल यांच्या कथित प्रभावाचा राष्ट्रीय पातळीवर तर सोडाच स्वराज्यातही संकोच झालेला आहे (पण,हे तिघेही पंतप्रधानपदाचे दावेदार आहेत) इंडिया आघाडीतील हे नेते राहुल गांधी यांचे नेतृत्व मान्य करत नाहीत ते ममता बॅनर्जी यांना नेता म्हणून (फक्त राखी बांधून घेतील!) कशी स्वीकृती देतील? आणि विरोधाभास असा की राहुल गांधी यांचा अपवाद वगळता यापैकी एकाही नेत्याकडे राज्य स्तरावरही एकहाती जनाधार आणि मान्यता मुळीच नाही, हे कटू असले तरी झोंबरे सत्य आहे; मात्र हे मान्य करुन राहुल गांधी यांचे नेतृत्व स्वीकारण्याचा उमदेपणा यापैकी एकाही नेत्यात नाही.

दुसरा संभाव्य अडथळा जागा वाटपाचा असेल आणि तो पार करायचा तर ती सर्वात वेळखाऊ प्रक्रिया असेल म्हणून ती प्रक्रिया आतापासूनच सुरु व्हायला हवी. भाजपविरोधी संभाव्य विरोधी आघाडीत काँग्रेस हा सर्वात मोठा आणि अजूनही चांगल्यापैकी जनाधार असलेला पक्ष आहे; २०१४,२१०९आणि२०२४ च्या लोकसभा आणि नंतर झालेल्या पश्चिम बंगालचा अपवाद वगळता सर्वच विधानसभा निवडणुकात मिळालेल्या मतांनी हे सिद्धही केलेले आहे. (तरी या पक्षाची जनमानस आणि संघटनेवरील पकड विसविशीत झालेली आहे.) प्रत्येक निवडणुकीत निवडणुकीत हा पक्ष सर्वात जास्त जागा लढवण्यास स्वभाविकपणे उत्सुक असणार आहे. उत्तरप्रदेश, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, तामीळनाडू अशी काही राज्ये जर ताब्यात ठेवता आली नाहीत तर काँग्रेसकडे पंतप्रधानपद येण्याची संधीच निर्माण होणार नाही. शरद पवार यांची (महा)राष्ट्रवादी काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, बहुजन समाज पार्टी, समाजवादी पक्ष,राष्ट्रीय लोकदल,जनता दलाचे सर्व गट, द्रमुक, हे म्हणायला राष्ट्रीय पक्ष असले तरी त्यांचे राज्य हेच त्यांचे शक्तीस्थळ आणि तेच त्याचे रणांगणही आहे. त्या-त्या राज्यात हे पक्ष कॉंगेसपेक्षा जास्त जागा मागणारच,त्यासाठी सर्वच बाजुंनी हटवादी भूमिका घेतली जाणार आणि या संभाव्य आघाडीला शेवटी 'मैत्रीपूर्ण' लढतीवर येण्याशिवाय पर्याय उरणार नाही.अशा मैत्रीपूर्ण लढती अर्थातच भाजपसाठी फायद्याच्या ठरणार हेही स्पष्टच आहे.

राजकारण म्हणून भाजप आणि नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्षाला विरोध योग्यच आहे पण, केवळ तो आणि तोच विरोध जनमताचा कौल मिळवण्यासाठी पुरेसा नाही.१९७१ मध्ये इंदिरा गांधी यांच्या विरोधात अनेक पक्ष एकवटले; इंदिरा गांधी व काँग्रेसच्या विरोधात खऱ्या-खोट्या आरोपांच्या फैरी झाडत अक्षरश:रान पेटवले गेले तरी काँग्रेसला साडेतीनशे पेक्षा जास्त जागा मिळाल्या होत्या. 'अनेक'विरुद्ध'एक'अशा अटीतटीच्या लढाईत मतदार 'एका'च्या बाजूला उभे राहतात,हे आजवर अनेकदा दिसलेले आहे.आणीबाणीनंतर अनेक पक्षांनी स्वत:चे अस्तिव कथितरित्या विलीन करुन जनता पक्ष नावाची मोट बांधली आणि देदीप्यमान यशही मिळवले पण,केवळ इंदिरा गांधी यांचा द्वेष आणि आपापली राजकीय अस्मिता अतिदुराग्रहीपणे कुरवाळणे,यामुळे ही मोट टिकलीच नाही; लोक पुन्हा काँग्रेसकडे वळले,हाही इतिहास लक्षात घेऊन इंडिया आघाडीची नीट नियोजन आणि बांधणी होण्याची गरज आहे.संभाव्य विरोधी आघाडीतील नेत्यांना त्यांच्या राज्यात थोडाफार जनाधार नक्कीच आहे. पण, हा जनाधार म्हणजेच जनकल्याणाचा विधायक कार्यक्रम आणि निवडणुका जिंकण्याचा फॉर्म्युला असा अहंगंड त्यांना झालेला आहे. या अहंगंडावर मात करुन,त्यांच्या प्रादेशिक अस्मिता विसरुन सर्व नेत्यांना विकासाचा एक समान किमान कार्यक्रम द्यावा लागेल; ही प्रक्रिया प्रत्यक्षात पत्थराला पाझर फोडायला लावणारी आहे.

ही आघाडी शेवटपर्यंत नीट टिकवून ठेवण्यात निर्णायक भूमिका काँग्रेसला बजावावी लागेल पण,या पक्षाकडे तितके समंजस,सहिष्णू,राजकारणाचा नेमका वेध घेण्याची नजर आणि राजकीय चातुर्य असणारे नेतृत्व नाही. नरेंद्र मोदी यांच्या विरोधात आक्रमक असणाऱ्या राहुल गांधी यांच्याकडून आशा असल्या तरी त्यांना त्या पातळीपर्यंत पोहोण्यासाठी अजूनही वेळ आहे.संभाव्य विरोधी आघाडीत सर्वांना एकत्र बांधून ठेवण्याची कामगिरी बजावणारा देशातला एकमेव नेता शरद पवार हेच आहेत पण,ते आता थकले आहेत.शिवाय काँग्रेसने शरद पवार आणि शरद पवार यांनी काँग्रेसला आजवर कधीच पूर्णपणे स्वीकारलेले नाही.

भाजप आणि नरेंद्र मोदी यांच्या विरोधातील इंडिया आघाडीसमोर कोणती आव्हाने उभी आहेत याचा हा धावता आढावा आहे. यात अर्थातच भाजपचे पारडे जड आहे. राज्य आणि मतदार संघनिहाय आणखी काही आव्हानांची त्यात भर पडणार आहे. थोडक्यात काय तर,इंडिया आघाडीची ही बैठक म्हणजे राजकीय क्षितिजावर भाजप विरोधी ऐक्याचे केवळ हाकारेच सध्या उठवले जात आहेत!

(तळटीप- शिकारीच्या वेळी सावज उठवण्यासाठी केलेला आवाज म्हणजे हाकारे. शुद्धलेखनाच्या जुन्या नियमानुसार हा शब्द 'हांकारे' असा आहे.)

**प्रवीण बर्दापूरकर**
९८२२०५५७९९

# खबरदार कोणी 'शासन' हा शब्द जरी उच्चारला तर !

खबरदार कोणी 'शासन' हा शब्द जरी उच्चारला तर !

खबरदार कोणी 'सिस्टीम' हा शब्द जरी उच्चारला तर !

शक्य आहे देशाची अर्थव्यवस्था अत्यंत नाजूक अवस्थेत पोचली आहे. बरेच अर्थतज्ञ इशारे देऊ लागले आहेत हे देखील खरे त्याचे एकमेव कारण जगामध्ये एकामागून एक युद्धे सुरू झाली, हार्मुझ मधून येणारे खनिज तेल बंद झाले हे आहे.पण,त्यासाठी शासनाला कसा दोष देणार?

'नीट' प्रवेश परीक्षा पेपर फुटीमुळे रद्द करावी लागली. परीक्षा रद्द झाल्याचा धक्का सहन न होऊन काही तरुण विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या ते वाईट झाले खरे.या सगळ्याच्या मुळाशी खाजगी ट्युशन क्लासेसवाल्या लोकांची मिली भगत आहे.पण त्यासाठी शासनाला, सिस्टीमला कसे दोषी धरणार?

स्टॉक मार्केट वरील काही कॉर्पोरेटनी हिशोब वह्यांमध्ये हेराफेरी केली. त्या कंपनीचा शेयर कोसळला. आयुर्विमा महामंडळाच्या म्हणजे जनतेच्या बचती बुडाल्या.आता, असतात काही प्रवर्तक भ्रष्टाचारी, हे काय पहिल्यांदा घडले आहे?याआधीच्या राजवटीत घडलेले नाही? आता नियामक मंडळांनी घेतली ना त्या कंपनीच्या विरुद्ध ॲक्शन, ते करत आहेत ना पुढील चौकशी? अजून काय पाहिजे.

पण जे काही घडले त्याचा दोष शासनाला, सिस्टीमला कसा देणार? शेतकरी आत्महत्या सुरूच आहेत हे खरे.पण, आम्ही केली ना कर्जमाफी, देत आहोत ना छोटी रक्कम किसान सन्मान योजनेतून. अजून काय करायचे.

शेतकरी आत्महत्या तर अनेक वर्षांचा जुना प्रॉब्लेम आहे, आजचा थोडाच आहे.एवढ्या जुन्या प्रश्नाला आताच्या शासनाला कसे जबाबदार धरणार?

झाल्या असतील जातीय, धार्मिक दंगली;त्यातर आपल्या देशात अनेक दशकांपासून होतच आल्या आहेत.झाले असतील स्त्रियांवर, लहान मुलींवर अत्याचार, बलात्कार ते तर आपल्या देशात अनेक दशकांपासून होतच आले आहेत.

समाजात, देशात घडणाऱ्या प्रत्येक दुर्दैवी घटनांचे बील तुम्ही शासनाच्या नावावर कसे काय फाडू शकता?नागरिकांनी, शेतकऱ्यांनी, विद्यार्थ्यांनी, उद्योजकांनी, अधिकाऱ्यांनी आपापली कर्तव्ये पार नकोत पाडायला ? सगळ्यांनी आपापली कर्तव्ये चोख पार पाडली की शासनाची गरजच लागणार नाहीये ना? प्रणाली/ सिस्टीम असे काहीच नसते; कारण 'समाज' असे संघटित काहीच नसते. सगळ्याच व्यक्ती असतात सुट्यासुट्या; 'अँट रँडम' एकत्र नांदणाऱ्या.

देशात अनेक एजन्सी कार्यरत असतात. त्यापैकी एक म्हणजे शासन. तिला सारखे सिंगल आउट का करता? आणि शासन आपली कामे चोख पार पाडतच असतेच की! शासनावर टीका करणे म्हणजे देश कमकुवत करणे. देश कमकुवत करणे म्हणजे शत्रुराष्ट्राला मदत करणे.

खबरदार कोणी 'शासन' हा शब्द जरी उच्चारला तर !

खबरदार कोणी 'सिस्टीम' हा शब्द जरी उच्चारला तर !

**-संजीव चांदोरकर**

# 'रहा तृणमूल तो फिर मिलेंगे'...

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या एका जाहीर सभेत ममता बॅनर्जी यांनी भाषणाचा शेवट करताना एक विधान केले होते.'रहा गुलशन तो फिर मिलेंगे' या प्रसिद्ध काव्यात्मक ओळीचा आधार घेत त्यांनी पुढे, 'रहा तृणमूल तो फिर मिलेंगे' (अर्थात: जर तृणमूल काँग्रेस उरली, तर आपण पुन्हा भेटू) असे उद्गार काढले. वरवर पाहता हे विधान केवळ भावनिक किंवा काव्यात्मक वाटले, त्यावरून एक वेगळीच राजकीय वस्तुस्थिती अधोरेखित होत होती. त्यावेळी ममता बॅनर्जी यांच्या मनात निवडणुकीतील पराभवाची आणि सत्ता गमावण्याची एक सुप्त भीती दबा धरून बसली होती का? म्हणूनच, निवडणुकीच्या अत्यंत तणावाच्या आणि घाईच्या प्रसंगात त्यांच्या सुप्त मनातील तीच भीती 'तृणमूल उरली तर...' या शब्दांच्या रूपाने नकळतपणे जाहीर सभेत बाहेर पडली. त्यावेळी भारतीय जनता पक्षाने यावर कडाडून टीका करत, 'हा ममता बॅनर्जींचा निवडणुकीपूर्वीचा पराभवाचा आणि राजकीय निरोपाचा स्वीकार आहे,' असा दावा केला होता. दुसरीकडे, तृणमूलच्या समर्थकांनी या विधानाचा बचाव करत,' हे मतदारांशी जोडलेले एक भावनिक नाते आहे,' असे म्हटले होते.

परंतु, राजकीय पडद्यामागे समर्थकांनी कितीही सारवासारव केली असली, तरी प्रत्यक्षात ममता बॅनर्जी यांच्या मनात पराभवाची जी भीती होती, तीच पुढे खरी ठरली. केवळ निवडणुकीचे निकालच त्यांच्या विरोधात गेले नाहीत, तर आज प्रत्यक्षात त्यांचा पक्षही त्यांच्या हातातून निसटत चालल्याचे चित्र दिसत आहे. निवडणुकीच्या ऐन रणधुमाळीत त्यांच्या तोंडून आलेले ते शब्द म्हणजे केवळ एक राजकीय जुमला नव्हता, तर त्यांच्या अंतर्मनातील असुरक्षिततेचा तो जाहीर कबुलीजबाब होता.

**अविनाश देशपांडे**

# कापूस उत्पादकता अभियानासमोरील आव्हाने..

आदरणीय अशोक गुलाटी
सुश्री आयुषी गुप्ता यांच्या
सुश्री रितिकाजी जुनेजा
**अभिवादन,**
**विषय:** कापूस उत्पादकता अभियानासमोरील आव्हाने..

इंडियन एक्सप्रेसमध्ये ८ जून, २०२६ रोजी प्रकाशित झालेला तुमचा या विषयावरील लेख वाचला.आणि त्यात भरपूर माहिती होती. तथापि, नेहमीप्रमाणेच, महत्त्वपूर्ण तथ्ये दडवून ठेवण्यात आली होती.

१) बीजी १ व बीजी२च्या वापरामुळे उत्पादनात वाढ झाली.याबद्दल कोणतेही मतभेद नाही. कापसाखालील क्षेत्र ७.६मिलीयन हेक्टरवरून १.१९ मिलीयन हेक्टरपर्यंत वाढले हे तुम्ही स्वतःच मान्य केले आहे. तुम्ही रासायनिक खते आणि ऊर्जा निविष्ठांमधील वाढीचा उल्लेख केला नाही. सिंचनाखालील क्षेत्रात किती वाढ झाली?

२)तुम्ही उल्लेख केला की, २००६ मध्ये, आंध्रप्रदेशाच्या हस्तक्षेपावरून बियाणांच्या किमती कमी करण्यास भाग पाडले. तथापि, २००६ पासून आजतागायत बीजी-१ बीजी-२ कंपन्या जोमात विकत असून नफा कमावत आहेत. मी अत्यंत आदराने हे स्पष्ट करू इच्छितो की, मी सुद्धा एका कंपनीसाठी संकरित कापूस बियाणांचा उत्पादक आहे.मात्र आता नाही,कारण मजूर उपलब्ध नाहीत.मजुरी जास्त असल्याची तक्रार करत नाही कारण रुपयाच्या अवमूल्यनाला एक स्थान असले पाहिजे.

महाराष्ट्रामध्ये दोन कोटी बियाणांची पाकिटे (४७५ ग्रॅम) पेरली जातात, त्यापैकी ८० टक्के बियाणे गुजरातमधून येते.अमेरिकेत संकरित कापसाचे बियाणे नाही, मग फक्त भारतातच का? कृपया याबाबत अधिक माहिती पाठवा. चॅट जीपीटीवरून मिळालेली माहिती तुम्हाला पाठविली आहे.

३)तुम्ही म्हणता की, आर आर राउंड अप रेडी, बी.जी-३ आयटी तंत्रज्ञानाच्या अभावामुळे उत्पादन वाढत नाही. पण गुजरातमध्ये, (1)Cry1ac(2)Cry2ab(3)Cb4-EPSPS(4)Vip जीन मिळुन BG4 चा उपयोग गेल्या ७ ते ८ वर्षात होत आहे. त्यामुळे उत्पादन किती वाढले आहे? कृपया सांगा.

तुम्हाला माहीत आहे की, आजही अमेरिकेत प्रति एकर ३०,००० ते ५०,००० कापसाची रोपटे आहेत. एक शेतकरी अंदाजे १० पौंडांसाठी ५ किलो बियाणे पेरतो. संकरित कापसाच्या बियांची पेरणी करणे शक्य होईल का?

आमचे पंतप्रधान सेंद्रिय शेती, पारंपरिक शेती इत्यादींबद्दल वारंवार बोलतात. तुम्हीसुद्धा रासायनिक खतांवरील अनुदान कमी करून ते शेतकऱ्यांना त्यांच्या स्वविवेकानुसार उपलब्ध करून देण्याबद्दल बोलता. आम्ही याला पाठिंबा देतो. सरकारने हा निर्णय तात्काळ घ्यावा, यासाठी आम्ही आग्रह करत आहोत. आम्हाला मार्गदर्शन करावे, अशी विनंती.

**विजय जावंधिया**
शेतकरी (किसान) संघटना
मो.९४२१७२७९९८

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# काऊचपफी मान्सून सेल
## २००+फर्निचरवर फ्लॅट ५०% सूट

**अमरावती/का.प्र.**
संपूर्ण विदर्भातील ग्राहक ज्या सेलची आतुरतेने वाट पाहत असतात, त्या काऊचपफीच्या मान्सून सेलची सुरुवात १५ जूनपासून करण्यात आली असून ग्राहकांना २०० हून अधिक फर्निचर उत्पादनांवर फ्लॅट ५०% सूट देण्यात येत आहे.

काऊचपफी हे भारतातील सर्वात मोठे प्रीमियम फर्निचर आणि गिफ्ट मॉल असून तब्बल १ लाख चौरस फूट क्षेत्रात उभारलेले आहे. विविध प्रकारचे फर्निचर, होम डेकोर, गिफ्ट आयटम्स आणि आर्टिफॅक्ट्स एकाच छताखाली उपलब्ध करून देत असल्याने ग्राहकांसाठी हे एक आकर्षणाचे केंद्र बनले आहे. दर्जेदार उत्पादने, प्रचंड व्हरायटी आणि परवडणाऱ्या किमती ही काऊचपफीची ओळख आहे.या विशेष मान्सून सेलमध्ये सोफा, डायनिंग टेबल, बेडरूम सेट, वॉर्डरोब, मॅट्रेस, ऑफिस फर्निचर, रेक्लायनर, टी-टेबल, बार टेबल, बार चेअर्स यांसह विविध प्रकारच्या फर्निचरवर आकर्षक ऑफर्स देण्यात येत आहेत. तसेच आउटडोअर फर्निचरमध्ये स्विंग, आउटडोअर सोफा आणि विविध आउटडोअर सीटिंग पर्यायांवरही विशेष सवलती उपलब्ध आहेत.होम डेकोर प्रेमींसाठी या सेलमध्ये खास Buy 1 Get 1 Free ऑफर जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे ग्राहकांना आपल्या घराच्या सजावटीसाठी अधिक आकर्षक वस्तू खरेदी करण्याची सुवर्णसंधी मिळत आहे.

यावर्षीच्या सेलचे आणखी एक मोठे आकर्षण म्हणजे डिस्प्लेमध्ये उपलब्ध असलेले प्रीमियम सोफा, आधुनिक डिझाईन्सचे फर्निचर आणि विविध लक्झरी कलेक्शन्स. आकर्षक डिझाईन्स, उत्कृष्ट गुणवत्ता आणि विशेष किमतीमुळे या उत्पादनांना ग्राहकांचा मोठा प्रतिसाद मिळत




आहे.याशिवाय २०० हून अधिक फर्निचर उत्पादनांवर फ्लॅट ५०% सूट देण्यात येत असून ग्राहकांना अत्यंत किफायतशीर दरात प्रीमियम फर्निचर खरेदीची संधी उपलब्ध झाली आहे. सोफा, बेड, डायनिंग सेट, मॅट्रेस, ऑफिस फर्निचर, बार टेबल, बार चेअर्स तसेच अनेक प्रीमियम उत्पादनांचा या ऑफरमध्ये समावेश आहे.मर्यादित कालावधीसाठी सुरू असलेल्या या विशेष सेलला ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

त्यामुळे ग्राहकांनी लवकरात लवकर खरेदी करून या आकर्षक ऑफर्सचा लाभ घ्यावा. स्टॉक उपलब्ध असेपर्यंतच ऑफर लागू राहणार असल्याने ही संधी दवडू नका, असे आवाहन करण्यात आले आहे.काऊचपफीचे संचालक अनिलकुमार अग्रवाल व अमित अग्रवाल यांनी ग्राहकांना या मान्सून सेलचा लाभघेण्याचे आवाहन केले आहे. हा सेल दररोज सकाळी ११.३० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत, रविवारसह सर्व दिवस सुरू राहणार आहे. ग्राहकांनी या विशेष सेलचा लाभ घेण्यासाठी काऊचपफी फर्निचर अँड गिफ्ट मॉल, बी-५, ड्रीमलँड सिटी, रहाटगाव रोड, अमरावती येथे भेट द्यावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# खरीपपूर्व मशागत अंतिम टप्प्यात;पेरणीच्या तोंडावर शेतमालाचे भाव दबले
## मृग नक्षत्र सुरू, मात्र पावसाची प्रतीक्षा कायम; ट्रॅक्टर मशागतीचे दर वाढल्याने शेतकरी चिंतेत

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**
खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर परिसरातील शेतकऱ्यांनी शेती मशागतीची कामे अंतिम टप्प्यात आणली आहेत. मृग नक्षत्र सुरू झाले असले तरी अद्याप समाधानकारक पाऊस झाला नसल्याने शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसले आहेत.

सध्या शेती मशागतीसाठी बैलजोडीचा वापर कमी झाला असून ट्रॅक्टरवरच बहुतांश कामे केली जात आहेत. ट्रॅक्टरमुळे



कमी वेळेत आणि दर्जेदार मशागत होत असली तरी वाढत्या इंधन दरांमुळे फंटण, व्हीपास, नांगरणी, रोटाव्हेटर आदी कामांचे दर मागील वर्षाच्या तुलनेत १०० ते २०० रुपयांनी वाढले आहेत.

दुसरीकडे खरीप हंगाम तोंडावर असतानाच शेतकऱ्यांच्या घरातील तुरीला अपेक्षित भाव मिळत नसल्याने आर्थिक अडचणी वाढल्या आहेत. सध्या तुरीचे दर ७७०० ते ७८०० रुपये प्रतिक्विंटलपर्यंत असल्याने अनेक शेतकऱ्यांना नाइलाजाने शेतमाल विकावा लागत आहे.

मशागतीची बहुतांश कामे पूर्ण झाली आहेत. आता चांगल्या पावसाची प्रतीक्षा आहे. मात्र शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याने खरीप हंगामासाठी भांडवल उभे करताना अडचणी येत आहेत.
**-अमोल लव्हाळे,** टाकरखेडा पूर्णा शेतकरी

डिझेल, सुटे भाग आणि देखभाल खर्चात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे मशागतीचे दर वाढविणे आमच्यासाठीही नाइलाजाचे झाले आहे. तरीही शेतकऱ्यांना परवडेल अशा दरात सेवा देण्याचा प्रयत्न करीत आहोत.
**-सचिन ईसळ,** ट्रॅक्टर चालक



## मनोज पुनसे यांची निवड

**अंजनगाव बारी-**भारतीय जनता पार्टी अमरावती जिल्हा ग्रामीण अंतर्गत शिक्षण आघाडीच्या तालुका अध्यक्षपदी मनोज विजय पुनसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीबद्दल पक्ष कार्यकर्ते, पदाधिकारी व शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.यावेळी भारतीय जनता पार्टीचे अमरावती जिल्हा संपर्क महामंत्री सुमित पवार, तालुका अध्यक्ष विलास राठोड, तालुका सरचिटणीस सोपन मुळे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. मनोज पुनसे यांच्या संघटन कौशल्याचा व सामाजिक कार्याचा लाभ पक्षाला मिळेल, असा विश्वास उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.मनोज पुनसे यांची शिक्षण आघाडी तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

## घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास जिल्हाधिकाऱ्यांची भेट

**तिवसा/वार्ताहर**
स्वच्छतेच्या क्षेत्रात विविध पुरस्कार प्राप्त केलेल्या तिवसा नगरपंचायतीच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास अमरावती जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी भेट देऊन प्रकल्पातील विविध उपक्रमांचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रकल्प परिसरात करण्यात आलेल्या विकासकामांचे, स्वच्छतेचे तसेच सौंदर्यीकरणाच्या उपक्रमांचे कौतुक केले. भेटी दरम्यान त्यांनी तिवसा शहराच्या पाणीपुरवठा योजनेची माहिती घेतली. पुढील महिन्यात नगराध्यक्षांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील विविध पाणीपुरवठा योजनांचा आढावा घेण्यात येणार असल्याचे त्यांनी



सांगितले.घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पावर कचरा विलगीकरणाचं काम बंद असल्या संदर्भात नगरपालिका प्रशासनाने निधीची उपलब्धता नसल्याने शासनाने निधी उपलब्ध करून दिल्यास विलगीकरणाचे काम सुरळीत सुरू राहील अशी माहिती जिल्हाधिकाऱ्यांना दिली.तसेच नमो उद्यानाच्या कामांची माहिती घेऊन विविध विकासकामांसाठी व घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या उन्नतीसाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या.यावेळी नगराध्यक्ष प्रतिभा गौरखेडे, माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक वैभव वानखडे, तहसीलदार मयूर कळसे, मुख्याधिकारी शिवदास मुसळे, नायब तहसीलदार आशिष नागरे, नरेंद्र कुरळकर, अमोल देशमुख, अधीक्षक रोहन राठोड, अभियंता दयानंद डेहनकर, पाणीपुरवठा अभियंता ऋषिकेश देशमुख, स्वच्छता निरीक्षक राहुल इमले,कर निरीक्षक विकास गावंडे, सूरज शापामोहन, स्वच्छता दूत आशिष नांदगावकर, माऊली कन्सल्टंट प्रा.लि.चे संचालक उमेश राऊत तसेच तिवसा शहरातील नागरिक उपस्थित होते.

## संक्षिप्त



### छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयात जागतिक नेत्रदान दिवस

**खल्लार-**छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय आसेगाव पूर्णा येथे जागतिक नेत्रदान दिवस कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात प्रामुख्याने नेत्र तपासणी शिबीर, नेत्रदान संकल्प, नेत्रदान नोंदणी व प्रचार प्रसार आणि नेत्र दाना बाबत सोशल मिडिया वर व्यापक प्रचार प्रसार या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुवर्णा जवंजाळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना नेत्रदानाचे महत्व, नेत्रदान नोंदनी कशी करावी, नेत्रदान विषयक समाजात जागरूकता कसी करावी या बद्दल इतंभूत माहिती दिली. उपस्थित विद्यार्थ्यांना एक विशिष्ट लक्ष्य देवून गावागावात जावून नेत्रदान विषयी जागरूकता निर्माण करुन नोंदनी करावयास सांगीतले. या कार्यक्रमास डॉ. हरीश काळे, डॉ. आशिष काळे, मुक्ता निंभोरकर, दिनेश वाटाणे, अविनाश कडु व संजय सोळंके उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्रा. विपीन लिल्हारे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. प्रविण सदार यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.



### मान्सूनची गती मंदावली; जिल्ह्यात उष्णतेचा प्रभाव कायम

**अंजनगाव बारी-**राज्यात मान्सून दाखल झाला असला तरी अपेक्षित पावसाला अद्याप जोर आलेला नाही. हवामान विभागाने अल निनोच्या प्रभावामुळे यंदा पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता व्यक्त केली असून विदर्भात उष्णतेचा प्रभाव वाढण्याचा इशारा दिला आहे.अमरावती जिल्ह्यासह विदर्भातील अनेक भागांत पुढील काही दिवस तापमानात वाढ होण्याची शक्यता असून उष्णतेची लाट (हीटवेव्ह) जाणवू शकते. ग्रामीण भागातील शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. दरम्यान, काही ठिकाणी हलक्या सरी पडत असल्या तरी सर्वदूर समाधानकारक पाऊस झालेला नाही.हवामान तज्ज्ञांच्या मते, अल निनो व इंडियन ओशन डायपोल (IOD) या हवामान घटकांचा मान्सूनवर परिणाम होत असून यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी उष्णतेपासून बचावासाठी आवश्यक खबरदारी घ्यावी तसेच शेतकऱ्यांनी हवामान विभागाच्या सूचनांवर लक्ष ठेवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### माधव धंदर यांचे निधन



**तळेगाव ठाकूर-**येथील रहिवासी श्री माधव वामनराव धंदर यांचे १३-जून ला अल्पशा आजाराने निधन झाले. त्याचे वय ८० वर्षे होते. त्याच्या पश्चात मोठा परिवार असून २ मुले,२ सुना, १ मुलगी नातवड असा मोठा परिवार असून त्याच्या आत्माला शांती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

# राजू नन्नवारे यांच्या वाढदिवस्यानिमित्त विविध कार्यक्रम

**अमरावती/का.प्र.**
राजुभाऊ कोणत्याही अपेक्षेशिवाय समाजातील सर्व घटकांसाठी अविरतपणे समाजसेवेत गुंतलेले आहेत. त्यांच्यामुळेच बाबासाहेबांची विचारधारा अमरावतीतील सामान्य लोकांपर्यंत पोहोचली आहे. त्यांच्यासारखा उत्साही, प्रभावी आणि वक्तृत्ववान वक्ता संपूर्ण दलित समाजात क्वचितच आढळतो. गेल्या ३० वर्षांत त्यांनी कमावलेली सर्वात मोठी संपत्ती म्हणजे लोकांचे प्रेम. गेल्या तीन दशकांपासून समाजभूषण राजू नन्नवारे हे एकता रॅलीच्या माध्यमातून लोकांना सातत्याने एकत्र आणत आहेत. राजूनी समाजात प्रेम, बंधुत्व आणि जातीय सलोखा निर्माण करून समाजातील सर्व घटकांना एका व्यासपीठावर एकत्र आणले आहे. त्यांनी भारतीय इतिहासाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार केवळ दलित समाजापुरते मर्यादित ठेवले नाहीत. त्यांनी ते सर्व उच्चभ्रू समाजांपर्यंत पोहोचवले,' असे राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे म्हणाले.

या कार्यक्रमाला उपस्थित असलेले दुसरे लोकसभा



खा.वानखेडे यांनीही त्यांची प्रशंसा केली. हे विशेष उल्लेखनीय आहे की, दरवर्षी १० जून रोजी त्यांचे प्रेमी मित्र मोठ्या उत्साहाने त्यांचा वाढदिवस साजरा करतात. गेल्या अनेक वर्षांपासून ते 'ऑल इंडिया किलर ऑफ द ड्रॅगन क्लब'च्या माध्यमातून शेकडो मुलींना कराटे ही आत्मसंरक्षणाची कला शिकवत आहेत. यावर्षी त्यांच्या विद्यार्थ्यांनी नवी दिल्लीत २० पदके जिंकली. राजुभाऊंच्या वाढदिवसानिमित्त या सर्व खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते पदके प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी लेडी गवर्नर आचार्य डॉ. कमल गवई यांनी भूषवले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जिल्ह्याचे खा.वानखेडे, खा. डॉ. अनिल बोंडे, सुदर्शन जैन, सुरेखा नन्नवारे, प्रदीप जैन, डॉ. गोविंद कासट, प्रा. डॉ. अरुणा वाडेकर, वीरेंद्र सहारे, रामेश्वर अभ्यंकर, सलीम मिरावले, अरुणकुमार आठवले, पी.बी. इंगळे, एल.जे. वानखेडे, प्रा. सुषमा ताजणे, नरेंद्र पकडे, माधुरी पकडे आणि इतर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान, एकता रॅलीच्या महिला सदस्य कुमुद पाचपोर यांनी एक अप्रतिम नृत्य सादर केले. मुश्ताकभाईंच्या अलबेला ऑर्केस्ट्राच्या कलाकारांनीही अनेक गाणी गायली. ऑल इंडिया किलर ऑफ द ड्रॅगन्सच्या मुलांनी त्यांच्या मनमोहक नृत्य सादरीकरणाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमात मिलिंद कांबळे, माजी जिल्हा क्रीडा अधिकारी अशोक खंडारे, राजेश फुले, अरुण बनारसे, लोभेश्वर रंगारी, मुश्तार्क, नाना रमतकर, श्रीराम डोंगरे आणि विजय पाटील यांच्यासह एकता रॅलीचे सर्व अधिकारी, तसेच कराटेचे सर्व विद्यार्थी आणि त्यांचे पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन आणि आभार सलीम मिरावाले यांनी केले.

## महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीची महत्त्वपूर्ण बैठक

**अमरावती/का.प्र.**
महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य नेते उदय शिंदे, राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर, राज्य कार्यकारिणी सचिन मदने आणि राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी अमरावती येथे सदिच्छा भेट दिली. या भेटीनंतर उपस्थित सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांसमवेत प्राथमिक शिक्षकांच्या विविध प्रलंबित आणि न्याय्य हक्कांच्या मागण्यांवर सखोल विचारविनिमय व महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली.

ही सभा १२जून ला महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती



चे राज्य नेते उदयजी शिंदे, राजनजी कोरगावक (राज्य सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती), सचिन मदने (राज्य कार्यालयीन सचिव) यांच्या उपस्थित होते.यावेळी गोकुलदासजी राऊत (जिल्हा शिक्षक नेते),अजयानंद पवार (जिल्हाध्यक्ष), राजेशजी सावरकर (राज्य प्रसिद्धी प्रमुख), संभाजी रेवाळे (जिल्हा मार्गदर्शक) शैलेंद्र स. दहातोंडे (जिल्हा सरचिटणीस ), तुळशीदास धांडे (तालुकाध्यक्ष दर्यापूर ), नितीन देशमुख (तालुकाध्यक्ष, अमरावती ), उमेश चुनकिकर (तालुकाध्यक्ष भातकुली), सुनील बोकाडे (तालुकाध्यक्ष तिवसा) संतोष राऊत (तालुका सरचिटणीस भातकुला)इलियास खान (तालुकाध्यक्ष, न्हए सेल भातकुली ), राहुल वानखडे (तालुका सरचिटणीस, तिवसा), प्रफुल होले (तालुका सरचिटणीस, अमरावती ),उपस्थित होते, यावेळी उदयजी शिंदे, राजनजी कोरेगावकर यांनी मार्गदर्शन केले, कार्यक्रमाचे संचालन शैलेंद्र स. दहातोंडे यांनी तर आभार प्रदर्शन अजयानंद पवार यांनी केले. अनेक शिक्षक आणि प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मातोश्री शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरू

**अमरावती-** यवतमाळ येथील गोदणी रोड, आकाशवाणीजवळ चालविल्या जाणाऱ्या 'मातोश्री शासकीय आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह' येथे शैक्षणिक सत्र २०२६-२७ साठी अधिकृत प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. या एकूण प्रवेश क्षमतेमध्ये उच्च माध्यमिक विभागासाठी १२ जागा, कनिष्ठ महाविद्यालयीन विभागासाठी १८ जागा, महाविद्यालयीन विभागासाठी १८ जागा आणि तंत्रशिक्षण विभागासाठी १२ जागांची विभागणी करण्यात आली आहे. या वसतिगृहात प्रवेश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांचे आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील वार्षिक उत्पन्न रुपये १,००,०००/- (एक लाख रुपये) च्या आत असणे बंधनकारक आहे. प्रवेशासाठीचे अर्ज वसतिगृहाच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत विनामूल्य उपलब्ध आहेत. इयत्ता ८ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांकरिता अर्ज करण्याची मुदत २५ जून ते १३ जुलै पर्यंत असेल, तर प्रथम वर्ष ते पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांकरिता १४ जुलै ते ३१ जुलै या कालावधीत अर्ज सादर करता येतील.

# कृषी वैज्ञानिक प्रा.राहुल घोगरे यांना राज्यस्तरीय 'राजीव गांधी कृषी रत्न पुरस्कार'
## घातखेड येथे शेतकरी संवाद कार्यक्रम व पुरस्कार वितरण सोहळा

**अमरावती/का.प्र.**
राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठान, अमरावती आणि कृषी विज्ञान केंद्र, घातखेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शेतकरी संवाद कार्यक्रम तसेच राज्यस्तरीय 'राजीव गांधी कृषी रत्न पुरस्कार' वितरण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापूर येथील कृषी वैज्ञानिक प्रा. राहुल घोगरे यांना सन २०२६ चा अत्यंत मानाचा आणि प्रतिष्ठेचा 'राजीव गांधी कृषी रत्न पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कृषी विज्ञान केंद्र, घातखेडचे सचिव अभय देशमुख यांनी भूषविले. कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांच्या हस्ते झाले. यावेळी ग्रामगीताचार्य



पौर्णिमा सवाई, राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश साबळे, संत गाडगेबाबा अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप काळे, कृषी विज्ञान केंद्र घातखेडचे व्यवस्थापक डॉ. अतुल कळसकर, निवृत्त कृषी अधिकारी अविनाश पांडे, कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावतीचे माजी सभापती प्रफुल्ल राऊत, प्रा. सुनील सावळे, राहुल तायडे, दत्तात्रय किटुकले, प्रा. अमर तायडे, अनुला खान यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी प्रा. राहुल घोगरे यांच्या कृषी संशोधन, आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार, शेतकरी मार्गदर्शन आणि कृषी क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रमांमधील भरीव योगदानाचा गौरव करण्यात आला. विशेष म्हणजे त्यांनी अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण पश्चिम विदर्भातील ग्रामीण युवक-युवतींना मोठ्या प्रमाणात प्रशिक्षण देऊन त्यांच्यामध्ये उद्योजकता विकसित करण्याचे कार्य केले आहे. लघुउद्योग, कृषी प्रक्रिया उद्योग आणि विविध व्यवसायाधारित प्रशिक्षणांच्या माध्यमातून अनेक युवकांना स्वावलंबी बनविण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली आहे.त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेतलेल्या अनेक उद्योजकांनी आपल्या व्यवसायाचा यशस्वी विस्तार केला असून त्यापैकी अनेकांना जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय तसेच केंद्र शासनाच्या विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. कृषी व ग्रामीण विकास क्षेत्रातील या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊनच त्यांना 'राजीव गांधी कृषी रत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आल्याचे मान्यवरांनी यावेळी नमूद केले. कार्यक्रमादरम्यान शेतकरी संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले. यामध्ये आधुनिक कृषी तंत्रज्ञान, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पीक व्यवस्थापन, मूल्यवर्धन, कृषी प्रक्रिया उद्योग, शाश्वत शेती पद्धती आणि ग्रामीण उद्योजकता यांसारख्या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या मार्गदर्शनाचा उपस्थित शेतकरी व कृषी क्षेत्राशी संबंधित युवकांनी लाभ घेतला. प्रा. राहुल घोगरे यांना प्राप्त झालेल्या या पुरस्काराबद्दल कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापूर येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. के. पी. सिंह, विषय विशेषज्ञ प्रतापराव जायले, डॉ. अर्चना काकडे, प्रफुल्ल महल्ले, डॉ. हर्षद ठाकूर, महेश आखूड तसेच संतोष देशमुख, आरती वर्मा, सुरेश वैद्य, कैलाश शेखावत, ऋषिकेश शिंदे, सौद अली, संजय घरडे, प्रणाली देशमुख, श्याम भुरके, सिद्धार्थ गडलिंग, स्नेहल कांबळे, महेंद्र सेंगर, डॉ. विशाखा पोहरे, अश्विनी रंगे, राहुल जगताप, उमेश तायडे, विशाखा रानोटकर, निशा राठोड, विशाल राऊत आणि आशिष रंगारी यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास परिसरातील शेतकरी, कृषी तज्ज्ञ, उद्योजक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठान आणि कृषी विज्ञान केंद्र, घातखेड यांच्या पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# ऑटोमध्ये महिला प्रवाशांचे दागिने, रोकड लांबवणारी आंतरजिल्हा टोळी जेरबंद

## एलसीबीची धडक कारवाई ; ७ आरोपी अटकेत, ४ गुन्हे उघड, २.७३ लाखांचा मुद्देमाल जप्त

■ प्रतिनिधी | अकोला ■

ऑटो रिक्षामध्ये महिला प्रवाशांना लक्ष्य करून त्यांच्या पर्समधील दागिने आणि रोकड लंपास करणाऱ्या यवतमाळस्थित आंतरजिल्हा टोळीचा अकोला स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत एका ऑटो चालकासह सहा महिला आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्या चौकशीतून अकोला शहरातील चार चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपींकडून चोरीतील रोकड, मोबाईल फोन आणि गुन्ह्यात वापरण्यात आलेला ऑटो असा एकूण २ लाख ७३ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.




गेल्या काही दिवसांपासून सिटी कोतवाली, रामदासपेठ आणि खदान पोलीस ठाण्यांच्या हद्दीत महिलांच्या पर्समधून दागिने व रोकड चोरीच्या घटना घडत होत्या. विशेष म्हणजे या चोऱ्या ऑटो प्रवासादरम्यान होत असल्याने पोलिसांसमोर या टोळीचा शोध घेण्याचे मोठे आव्हान उभे राहिले होते. ३१ मे २०२६ रोजी अशोक वाटिका ते गांधी रोड दरम्यान ऑटोने प्रवास करणाऱ्या एका महिलेच्या पर्समधून सोन्याचे दागिने चोरीला गेले होते. त्यानंतर २ जून रोजी आणखी एका महिलेच्या पिशवीतून रोकड लंपास करण्यात आली होती. या घटनांसह रामदासपेठ व खदान पोलीस ठाण्यांतील तत्सम गुन्ह्यांचा तपास सुरू असताना स्थानिक गुन्हे शाखेला महत्त्वाची माहिती मिळाली. सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश देशमुख यांना गुप्त बातमीदारामार्फत यवतमाळची एक टोळी ऑटोच्या माध्यमातून अकोल्यात येऊन महिलांना लक्ष्य करत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार एलसीबीच्या पथकाने महिला अंमलदारांसह खडकी चौक परिसरात नाकाबंदी केली. नाकाबंदीदरम्यान यवतमाळ पासिंगचा संशयास्पद ऑटो (एमएच-२९ बीडी-२७४६) भरधाव वेगाने येताना दिसला. पोलिसांनी थांबण्याचा इशारा केल्यानंतरही चालकाने वाहन न थांबवता पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी तत्काळ पाठलाग करून ऑटोला घेराव घालत ताब्यात घेतले.

ऑटोमधील संशयितांची चौकशी केली असता त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. त्यानंतर सखोल चौकशीत चालक सिद्धार्थ अर्जुन उपाळे याच्यासह भारती युवराज सकट, बानुबाई मोहन नाडे, मैना विजेंद्र उफाळे, राधा रकीरामा सकट, खुशबू प्रेम सकट आणि काजल राजा हतागळे (सर्व रा. नेताजी नगर, दारव्हा रोड, यवतमाळ) यांनी अकोला शहरातील चोरीच्या गुन्ह्यांची कबुली दिली. आरोपींनी सिटी कोतवाली पोलीस ठाण्यातील अप.क्र. २१६/२०२६ व २२२/२०२६, रामदासपेठ पोलीस ठाण्यातील अप.क्र. ३८८/२०२६ तसेच खदान पोलीस ठाण्यातील अप.क्र. १०३५/२०२६ या चार गुन्ह्यांमध्ये सहभाग असल्याचे मान्य केले. त्यांच्याकडून चोरीची रोकड, मोबाईल फोन आणि गुन्ह्यात वापरण्यात आलेला प्रवासी ऑटो असा एकूण २ लाख ७३ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

### ▶▶ आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता

प्राथमिक तपासात ही टोळी अकोल्याबरोबरच इतर जिल्ह्यांमध्येही अशाच प्रकारच्या चोऱ्या करत असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे आरोपींच्या गुन्हेगारी रेकॉर्डची पडताळणी सुरू असून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

### ▶▶ महिलांना सावध राहण्याचे आवाहन

ऑटो किंवा सार्वजनिक वाहनातून प्रवास करताना पर्स, दागिने व रोकड सुरक्षित ठेवावी, गर्दीच्या ठिकाणी विशेष दक्षता घ्यावी आणि संशयास्पद व्यक्ती दिसल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन अकोला पोलिसांनी केले आहे.

### ▶▶ या अधिकाऱ्यांनी केली कारवाई

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक व अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख प्रभारी पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश देशमुख, सहाय्यक पोलीस निरीक्षक गोपाल जाधव, पोलीस उपनिरीक्षक माजीद पठाण, पोलीस अंमलदार शेख हसन, अब्दुल माजीद, रवि खंडारे, किशोर सोनोने, मंगेश इंगळे, वसीमोद्दीन, एजाज अहमद, श्रीकांत पातोंड, अमोल दिपके, अशोक सोनवणे, पवन डंबेलकर, मनीष ठाकरे तसेच महिला अंमलदार तुळसा दुबे व भारती ठाकूर यांनी ही उल्लेखनीय कारवाई यशस्वीपणे पार पाडली.

# एकल महिला धोरणासाठी सूचना व अभिप्राय सादर करण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | अकोला ■

महाराष्ट्र शासनामार्फत राज्यातील विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, अविवाहित तसेच इतर एकल महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी स्वतंत्र 'एकल महिला धोरण' तयार करण्यात येत आहे. हे धोरण अधिक व्यापक, लोकाभिमुख व परिणामकारक व्हावे यासाठी राज्यातील एकल महिला, नागरिक, स्वयंसेवी संस्था, महिला संघटना, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक, संशोधक व विषयतज्ज्ञ यांच्याकडून सूचना व अभिप्राय मागविण्यात येत आहेत.

एकल महिलांच्या समस्या केवळ मांडण्याऐवजी त्या समस्यांवर शासनामार्फत कोणत्या ठोस उपाययोजना राबविता येतील, कोणत्या नवीन योजना सुरू करता येतील, विद्यमान योजनांमध्ये कोणते बदल आवश्यक आहेत तसेच आवश्यक असल्यास कायदे व नियमांमध्ये कोणत्या सुधारणा कराव्यात याबाबत सविस्तर सूचना पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सूचना पाठविताना केवळ संक्षिप्त मते न पाठविता संबंधित विषयाची पार्श्वभूमी, अपेक्षित उपाययोजना, संभाव्य लाभार्थी आणि अपेक्षित परिणाम यांचा समावेश असलेले सविस्तर प्रस्ताव सादर करावेत. समाजातील एकल महिला तसेच सर्व संबंधित घटकांचा सक्रिय सहभाग या धोरण निर्मिती प्रक्रियेत महत्त्वाचा असल्याने सर्वांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

सूचना व अभिप्राय पाठविण्यासाठी शासनामार्फत खालील अधिकृत व्हॉट्सअॅप क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे : अधिकृत व्हॉट्सअॅप क्रमांक : ८२०८५८९१९५ वर संपर्क साधा. प्राप्त होणाऱ्या सूचना व अभिप्रायांचा एकल महिला धोरणाचा मसुदा तयार करताना योग्य तो विचार करण्यात येणार आहे. राज्यातील सर्व नागरिक, स्वयंसेवी संस्था, महिला संघटना, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक व विषयतज्ज्ञ यांनी या महत्त्वपूर्ण उपक्रमात सहभागी होऊन शासनास सहकार्य करावे, असे आवाहन श्री लक्ष्मण हगवने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अकोला यांचे कडून करण्यात आले आहे.

**Change In Name**
I have changed
my Name from
**RAHAMUNISSA**
-To-
**RAHEEMA BI
ABDUL MAJEED**
NOOR NAGAR AKBAR
PLOT AKOT FAIL
AKOLA

**Change In Name**
I have changed
my Name from
**SAJID AHMED**
TO
**SAJID AHMAD ABDUL
MAJEED**
NOOR NAGAR AKBAR
PLOT AKOT FAIL AKOLA
PASSPORT
NO (F4C2528742)

**Change In Name**
I Have Change My Name From
**MOHD ARSHAD MOHD ASADULLAH**
- TO -
**MOHAMMED ARSHAD MOHAMMED ASADULLAH**
My Residential Address is -- Makkah Apartment flat no
402 Near Bilal Masjid Nirman Nagar Akola
Maharashtra 444002.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी यांचे कार्यालय अकोला, जि. अकोला.**

जा.क्र./तह./प्रस्तु-१/कावि-६५७/२०२६ दिनांक - ०९/०६/२०२६

**मौजे बोरगांव मंजु भाग-४ ता. जि. अकोला येथील गट क्र. २२६/२ क्षेत्र १.९४ हे. आर या शेतजमिनीचे ७/१२ मधील इतर अधिकारातील कुळाचे नाव कमी करणेबाबत.**

जाहीरनामा

सर्वत्र लोकांना याव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री. रमेश रामचंद्र देशमुख रा. डोंगरगांव ता.जि. अकोला यांनी मौजे बोरगांव मंजु भाग-४ ता. जि. अकोला येथील गट क्र. २२६ / २ क्षेत्र १.९४ हे. आर या शेतजमिनीचे ७/१२ मधील इतर अधिकारातील कुळाचे नाव कमी करणेबाबत या कार्यालयास अर्ज सादर केला आहे. अर्जदार यांनी या कार्यालयात प्रकरण सादर केल्यानुसार उपरोक्त प्रकरणात ज्यांना आक्षेप / हरकती घ्यावयाच्या असतील त्यांनी ०७ दिवसांचे आंत या कार्यालयात लेखी स्वरुपात आपले आक्षेप / हरकती सादर कराव्यात. मुदतीनंतर आलेले आक्षेप / हरकत विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

शिक्का

**(कुणाल झाल्टे)
तहसिलदार अकोला**

जाहीर सुचना

सर्व जनतेस, बँक व वित्तीय संस्थेस ह्या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, श्री अंकुश नारायण घोळवे रा. अकोला ता. जि. अकोला ह्यांनी महिंद्रा रुरल हाऊसिंग फायनान्स लि. येथे खालील वर्णनाची मालमत्ता खरेदी करण्यासाठी गृहकर्ज मिळण्याकरिता अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन :** मौजे अकोला म. न. पा., ता. जि., अकोला च्या हद्दीतील शेत स. क्र. ७ चे वि. उप-विभागीय अधिकारी, अकोला यांच्या फाईल वरील मह. प्र. क्र. एन. ए. पी.-३४ / अकोला/१५/१९८७-८८ आदेश दि. १९/१०/१९८७ नुसार पारित ले-आउट नकाशातील पूर्व-पश्चिम वाटणीचा उत्तर भागाचा प्लॉट २० ज्याचे क्षेत्रफळ ७९.०२चौ.मी. असून, ज्यास चतुर्सिमा : पुर्वेस: सर्व्हिस लाईन, पश्चिमेस : रस्ता, ऊत्तरेस : लोकरे यांचे घर व दक्षिणेस : नितीन बनसोड यांचे घर.

वर नमुद मालमत्तेचे पुर्विचे मुळ खरेदीखत दस्त क्र. १०८७ दि. २५/०३/२००८ रोजीचे जे की मालमत्तेचे साखळी मुळ दस्त आहेत ते हरविलेले / गहाळ झाले आहे. त्याकरीता पो.स्टे. खदान, अकोला येथे दि. १२/०६/२०२६ रोजी तक्रार दाखल आहे.

त्याअर्थी वरील मालमत्तेवर जर कोणाचे काही कर्ज, गहाण, बोजा, हक्क, अधिकार, ताबा अथवा आक्षेप असल्यास त्यांनी हि सुचना प्रकाशीत झाल्या पासुन ७ (सात) दिवसात खालील नमुद पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप अथवा ऊजर चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. १३/०६/२०२६

**अधिवक्ताः संजीव रा. बोचरे,**
संतोष नगर, आगाशे गुरुकुल, मलकापुर रोड,
अकोला - ४४४००४ मोबा. ८९०४४४८२४

जाहीर सुचना

सर्व जनतेस, बँक व वित्तीय संस्थेस ह्या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, मनोहर श्रीकृष्ण उमाळे रा. अकोला ता. जि. अकोला ह्यांनी चोलामंडलम इनवेस्टमेंट अँड फायनान्स कं. लि. येथे खालील वर्णनाची मालमत्ता गहाण ठेऊन कर्ज मिळण्याकरिता अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन :** मौजे कौलखेड म.न.पा. अकोला ता. जि., अकोला च्या हद्दीतील शेत सर्व्हे क्र. २१/२ चा उप-विभागीय अधिकारी, अकोला यांच्या फाईल वरील मह. प्र. क्र. एन. ए. ए.-४८/कौलखेड /११/२०१२-१३ आदेश दि. २१/०८/२०१२ नुसार पारित ले-आउट नकाशातील प्लॉट क्र. १-जे ज्याचे क्षेत्रफळ ९३.७५ चौ. मी. असून ज्यास चतुर्सिमा : पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : शासकीय अभियांत्रिकी साठवण गृह, ऊत्तरेस : जयारामदास खोलेश्वर यांची जागा, व दक्षिणेस : प्लॉट क्र. १-जे चा उर्वरित भाग.

वर नमुद मालमत्तेचे पुर्विचे मुळ खरेदीखत दस्त क्र. ५१९८ दि. ०१/१०/२०१२ रोजीचे जे की मालमत्तेचे साखळी मुळ दस्त आहेत ते हरविलेले/गहाळ झाले आहे. त्याकरीता पो.स्टे. खदान, अकोला येथे दि. १२/०६/२०२६ रोजी तक्रार दाखल आहे.

त्याअर्थी वरील मालमत्तेवर जर कोणाचे काही कर्ज, गहाण, बोजा, हक्क, अधिकार, ताबा अथवा आक्षेप असल्यास त्यांनी हि सुचना प्रकाशीत झाल्या पासुन ७ (सात) दिवसात खालील नमुद पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप अथवा ऊजर चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. १३/०६/२०२६

**अधिवक्ताः संजीव रा. बोचरे,**
संतोष नगर, आगाशे गुरुकुल, मलकापुर रोड,
अकोला - ४४४००४ मोबा. ८९०४४४८२४

# प्रशांत प्रतिभा पुरस्कार सोहळ्यात १८० गुणवंतांचा गौरव

## सिंधी समाजाच्या शैक्षणिक परंपरेचा उत्सव; ९८.९० टक्के गुणांसह आयुषी छाबडिया 'सुपर टॉपर'

■ प्रतिनिधी | अकोला ■

शिक्षण हीच खरी प्रगतीची गुरुकिल्ली असल्याचा संदेश देत सिंधी समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'प्रशांत प्रतिभा पुरस्कार' वितरण सोहळ्यात दहावी, बारावी व पदवी स्तरावरील तब्बल १८० गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. विद्यानगर येथील हॉटेल ग्रीनलँड कॉटेजेसमध्ये पार पडलेल्या या सोहळ्याने गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाला समाजाच्या अभिमानाचा सन्मान मिळवून दिला.



रविवारी सायंकाळी आयोजित या कार्यक्रमास अकोला लोकसभा मतदारसंघाचे खासदार अनूप धोत्रे, अकोला पूर्वचे आमदार रणधीर सावरकर, राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे, अमरावतीचे महापौर श्रीचंद तेजवानी, माजी महापौर शारदाताई खेडकर, भाजपचे जिल्हाध्यक्ष गवांडे, शहराध्यक्ष जयंत मसने, रंजीत खेडकर, देवाशीष काकड यांच्यासह विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी व समाजातील ज्येष्ठ मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा आणि विविध क्षेत्रांत यश संपादन करण्यासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. समाजातील होतकरू विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करताना शिक्षणातूनच समाजाची प्रगती शक्य असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

**आयुषी छाबडियाने पटकावला 'सुपर टॉपर'चा मान :** यंदाच्या पुरस्कार सोहळ्यात ९८.९० टक्के गुण मिळविणाऱ्या कु. आयुषी महेश छाबडिया हिने 'सुपर टॉपर'चा मान पटकावला. याशिवाय जानवी बालानी, ऋतुज जेठवानी, गीत अरोरा, दिव्या वाधवानी, दिशा विरवानी, हिमांशू खानचंदानी, प्रांशू पाहुजा, जिया राजपाल, खुशी लोकवानी, रितिका आलिमचंदानी, मंथन ग्वालनी, जिया चंदानी, सागर हरवानी, पियांशी आहुजा, जयंत बालानी, नित्या आलिमचंदानी यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात आला.

**सामाजिक संस्थांचा उत्स्फूर्त सहभाग :** अकोला पूज्य सिंधी पंचायतचे अध्यक्ष रमेशभाई जग्यासी, शहर पंचायतचे भेरूमल वाधवानी, बाबा हरदासराम नगर पंचायतचे मनोहर पंजवानी, झूलेलाल नगर पंचायतचे सुरेंद्र नागदेव, सुविचार सोनार पंचायतचे रमेशलाल आलिमचंदानी, सक्खर पंचायतचे हरीश पारवानी, बहावलपुरी पंचायतचे ओमप्रकाश लालवानी, नानक नगर पंचायतचे दीपक लिलवानी यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**१६ वर्षांची यशस्वी परंपरा :** सन २०११ पासून सातत्याने सुरू असलेल्या या उपक्रमाचे प्रमुख आयोजक हरिशभाई आलिमचंदानी असून, कांता आलिमचंदानी यांच्या प्रेरणेतून हा उपक्रम गेली १६ वर्षे यशस्वीपणे राबविला जात आहे. विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तेची प्रेरणा निर्माण करणे आणि शैक्षणिक यशाला सामाजिक सन्मान मिळवून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. सुरेश केसवानी, डॉ. प्रिया केसवानी, गौतम वाधवानी, ब्रह्मानंद वलेचा, मीरा आहुजा, ॲड. राजेश चावला, संजय मोतियानी, प्रा. सागर केसवानी, प्रा. अंकुश आहुजा, प्रा. शेखर भारती, डॉ. भावना भारती यांच्यासह समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. तसेच अरुण आलिमचंदानी, आर्किटेक्ट मधुर आलिमचंदानी आणि अभियंता संदीप आलिमचंदानी यांनी कार्यक्रमाची रूपरेषा व भोजन व्यवस्थेची जबाबदारी यशस्वीरीत्या सांभाळली.

गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, मान्यवरांचे मार्गदर्शन आणि समाजबांधवांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे यंदाचा 'प्रशांत प्रतिभा पुरस्कार' सोहळा सिंधी समाजाच्या शैक्षणिक बांधिलकीचा आणि गुणवंतांच्या सन्मानाचा प्रेरणादायी उत्सव ठरला.

**एक्साईजचा धडाका**

# अकोट ग्रामीण पोलिसांच्या नाकावर टिच्चून देशी दारूचा काळाबाजार!

## चार ठिकाणी छापे, हजारो बाटल्या जप्त ; 'सगळं आलबेल' दाखवणा-यांचे धाबे दणाणले





■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोट ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैध देशी दारूचा व्यवसाय किती खोलवर रुजला आहे, याचा धक्कादायक पर्दाफाश राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या शनिवारी झालेल्या धडक कारवाईतून झाला आहे. अकोली जहागीर, पोपटखेड, बोर्डी आणि गांधीग्राम या चार ठिकाणी एकाच दिवशी टाकलेल्या छाप्यांमध्ये मोठ्या प्रमाणात देशी दारूचा साठा आणि वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी वाहने जप्त करण्यात आली. या कारवाईनंतर अकोट ग्रामीण पोलिसांच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा संशयाची छाया पडली असून, 'इतका मोठा गोरखधंदा सुरू असताना स्थानिक पोलिसांना याची भनकही नव्हती का?' असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक पी. एस. कांबळे यांच्या नेतृत्वाखाली शनिवारी सकाळी विशेष मोहीम राबविण्यात आली. अकोली जहागीर येथील वस्तापूर रोडवर सापळा रचून दुचाकीवरून देशी दारूची वाहतूक करणाऱ्या दोघांना पकडण्यात आले. त्यांच्या ताब्यातून ९० एमएल क्षमतेच्या तब्बल ७०० देशी दारूच्या बाटल्या आणि वाहतुकीसाठी वापरलेली दुचाकी जप्त करण्यात आली.

याच कारवाईची धग ओसरत नाही तोच पथकाने पोपटखेड येथील एका पानटपरीवर धाड टाकली. तेथे देशी दारूची विक्री सुरू असल्याचे उघड झाले. त्यानंतर बोर्डी येथील एका किराणा दुकानावर छापा टाकण्यात आला. तेथूनही देशी दारूचा साठा जप्त करण्यात आला. गांधीग्राम येथे दुचाकीवरून देशी दारूची वाहतूक करणाऱ्या आणखी दोघांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यातून ९० एमएल क्षमतेच्या सुमारे ५०० बाटल्या आणि एक दुचाकी जप्त करण्यात आली. एकाच दिवशी चार वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या या कारवाईने अकोट ग्रामीण परिसरातील अवैध दारू व्यवसायाचे जाळे किती विस्तारले आहे, हे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे या सर्व घटना अकोट ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या आहेत. त्यामुळे स्थानिक पोलिसांची गस्त, माहिती यंत्रणा आणि प्रतिबंधात्मक कारवाई नेमकी कुठे अपयशी ठरली, याबाबत चर्चा रंगू लागली आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षक सीमा झावरे यांच्या आदेशानुसार पथक प्रमुख प्रमोद कांबळे व त्यांच्या पथकातील सहकाऱ्यांनी ही कारवाई केली. मात्र, या कारवाईमुळे जितका अवैध दारू व्यवसाय उघड झाला, त्याहून अधिक चर्चा आता स्थानिक पोलिसांच्या भूमिकेची सुरू झाली आहे.

### अवैध दारूचा बाजार तेजीत, तक्रारींकडे दुर्लक्ष?

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, गेल्या अनेक महिन्यांपासून अकोट ग्रामीण परिसरात देशी दारूचा काळाबाजार तेजीत सुरू असल्याच्या चर्चा सुरू होत्या. गावागावांत उघडपणे विक्री होत असल्याच्या तक्रारीही होत होत्या. मात्र, त्यावर प्रभावी आणि सातत्यपूर्ण कारवाई झाल्याचे चित्र दिसले नाही.

मागील काळात जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी अवैध धंद्यांविरोधात 'ऑपरेशन प्रहार' सुरू केले होते. त्या मोहिमेअंतर्गत गावठी हातभट्टीवर काही कारवाया झाल्या. परंतु देशी दारूच्या अवैध विक्री व वाहतुकीच्या जाळ्यावर अपेक्षित प्रहार झाला का, याबाबत आता प्रश्न उपस्थित होत आहेत. कारण एक्साईज विभागाच्या एका दिवसातील मोहिमेत जे उघड झाले, ते स्थानिक यंत्रणांना यापूर्वी का दिसले नाही, हा खरा प्रश्न आहे.

### चर्चेतील 'डीलर श्याम' पर्यंत कारवाईचा हात का पोहोचत नाही?

अकोट तालुक्यात देशी दारूच्या पुरवठा साखळीतील एका कथित ' श्याम ' नामक प्रमुख व्यक्तीच्या नावाची चर्चा वारंवार होत असते. स्थानिक पातळीवर या व्यक्तीला देशी दारू पुरवठा साखळीतील महत्त्वाचा दुवा मानले जात असल्याचे बोलले जाते. तथापि, या चर्चांनंतरही संबंधितांपर्यंत कारवाई पोहोचल्याचे चित्र क्वचितच दिसून येते. त्यामुळे अवैध व्यवसायाच्या केवळ किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई होते की संपूर्ण साखळीवर हात घालण्याची तयारी आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

### आता उत्तर कोण देणार?

एकाच दिवशी अकोली जहागीर, पोपटखेड, बोर्डी आणि गांधीग्राम येथे अवैध दारू सापडते, हजारो बाटल्या जप्त होतात, वाहतूक करणारे पकडले जातात; मग एवढे दिवस हा व्यवसाय कोणाच्या आशीर्वादाने सुरू होता, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभागाने दाखविलेली तत्परता स्थानिक पोलिस यंत्रणेला का दाखविता आली नाही, याचे उत्तर आता संबंधित अधिकाऱ्यांना द्यावे लागणार आहे. अवैध दारूच्या या जाळ्याचा केवळ शेवटचा टोक पकडण्याऐवजी त्यामागील संपूर्ण साखळी, पुरवठादार, आर्थिक हितसंबंध आणि संरक्षण देणाऱ्या घटकांचा शोध घेण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. एक्साईजच्या कारवाईने दारू माफियांचे धाबे दणाणले असले, तरी या प्रकरणाने अकोट ग्रामीण पोलिसांच्या कार्यक्षमतेवर निर्माण झालेले प्रश्न मात्र अधिक तीव्र झाले आहेत.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १८८**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com



## मेहनत, जिद्द अन् संघर्षाला यशाची सलामी

# श्रद्धा वावरकर यांची परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षकपदी नियुक्ती

**वर्धा/जनमाध्यम**
प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द, मेहनत आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर श्रद्धा राजेंद्र वावरकर यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) २०२२ च्या परीक्षेत यश संपादन करून पोलीस उपनिरीक्षक (PSI) पदाला गवसणी घातली आहे. महाराष्ट्र पोलिस अकादमी, नाशिक येथे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांची गडचिरोली येथे परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

मूळच्या पिपरी (मेघे), जिल्हा वर्धा येथील श्रद्धा वावरकर यांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण केसरिमल कन्या शाळेत पूर्ण केले. त्यानंतर आचार्य श्रीमन नारायण पॉलिटेक्निकमधून इलेक्ट्रॉनिक्स शाखेत शिक्षण घेत त्यांनी पुढे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथून बी.टेक. पदवी संपादन केली.लहानपणापासूनच स्पर्धा परीक्षांची आवड असलेल्या श्रद्धा यांनी कठोर परिश्रम, आत्मविश्वास आणि चिकाटीच्या बळावर MPSC परीक्षेत यश मिळविले. आर्थिक व कौटुंबिक अडचणींवर मात करत त्यांनी मिळविलेल्या या यशामुळे परिसरात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.श्रद्धा यांच्या आई गृहिणी असून वडील मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. अत्यंत साध्या परिस्थितीतही मुलीच्या शिक्षणासाठी आई-वडिलांनी घेतलेले कष्ट, दिलेले प्रोत्साहन आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच हे यश शक्य झाल्याची भावना श्रद्धा यांनी व्यक्त केली. आपल्या यशाचे श्रेय त्यांनी आई-वडील आणि शिक्षकांना दिले.पोलीस दलात कार्य करताना कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रामाणिकपणे सेवा देण्याचा निर्धार श्रद्धा वावरकर यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन आणि कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# आभाळा...आता तरी बरस

## रोहिणी कोरडी गेली; मृगही दगा देणार, पेरणीच्या उंबरठ्यावर शेतकऱ्यांच्या काळजाचा ठोका चुकला

**साहूर/जनमाध्यम**
शिवार तयार आहे... बियाणे घरात पडलेय... पण आभाळ काही फुटत नाही. अशा हतबल शब्दांत साहूर परिसरातील शेतकरी आपल्या मनातील वेदना व्यक्त करीत आहेत. रोहिणी नक्षत्र पूर्णपणे कोरडे गेल्यानंतर आता मृग नक्षत्राकडून मोठ्या आशा असतानाच पावसाने पुन्हा पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर चिंता, डोळ्यांत प्रतीक्षा आणि मनात भीतीचे ढग दाटून आले आहेत.

परिसरातील शेतशिवार पेरणीसाठी पूर्णपणे सज्ज झाले आहे. कापूस, तूर आणि सोयाबीन पिकांसाठी मशागतीची सर्व कामे पूर्ण झाली आहेत. मात्र दमदार पावसाअभावी शेतकरी पेरणीचा निर्णय घेण्यास धजावत नाही. पहिला पाऊस पडला म्हणून पेरणी केली आणि नंतर पाऊस गायब झाला तर दुबार-तिबार पेरणीचे संकट ओढवेल, या भीतीने शेतकरी सावध झाले आहेत.यंदा बियाणे आणि



खतांच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. त्यातच उन्हाच्या तीव्र झळांनी विहिरींची पाणीपातळी खालावली आहे. आधीच कर्ज, त्यात पाऊस नाही... मग जगायचे कसे असा प्रश्न शेतकरी उपस्थित करीत आहेत. हवामान विभागाने सुरुवातीला पाऊस कमी राहण्याचा अंदाज वर्तविल्याने शेतकऱ्यांची धाकधूक अधिकच वाढली आहे.मृग नक्षत्र हे खरीप हंगामाचे आशेचे प्रतीक मानले जाते. १५ जून ते ३० जून हा पेरणीसाठी महत्त्वाचा कालावधी असल्याने शेतकऱ्यांच्या नजरा आता आकाशावर खिळल्या आहेत. यावर्षी मृगाचे वाहन 'बेडूक' असल्याने दमदार पावसाची शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र अद्यापही पावसाने हुलकावणी दिल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.दरवर्षीच्या अनियमित पावसामुळे दुबार-तिबार पेरणीचे संकट झेललेल्या शेतकऱ्यांनी यंदा पुरेसा ओलावा निर्माण झाल्याशिवाय पेरणी न करण्याचा निर्णय घेतला आहे. तरीही मृग तरी साथ देईल या आशेवरच बळीराजा दिवस ढकलत आहे.

# रामनगर फ्री-होल्डधारकांना तातडीने मालकी हक्काची पत्रके वितरीत कराः पालकमंत्री

## महिनाभरात भूखंडधारकांना भोगवटदार वर्ग १ चे पत्रके देण्याचे निर्देश

**वर्धा/जनमाध्यम**
वर्धा शहरातील रामनगर येथील लिजधारकांचे भूखंड शासनाने फ्री-होल्ड केले आहे. याबाबत स्पष्ट शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यामुळे या सर्व फ्री-होल्ड धारकांना भूमी अभिलेख विभागाने त्यांच्या भूखंडाच्या मालकी हक्काची मालमत्ता पत्रके तातडीने वितरीत करावे, असे निर्देश पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी दिले.

रामनगर येथील लिजधारकांचे भूखंड फ्री-होल्ड करून देखील त्यांना मालमत्ता पत्रक वितरणास विलंब होत होता. त्याअनुषंगाने समन्वयासाठी पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात नगरपरिषद, महसूल, भूमि अभिलेख या विभागांच्या अधिकाऱ्यांची स्वतंत्र बैठक घेतली. त्यावेळी त्यांनी सदर निर्देश दिले. बैठकीला पालकमंत्र्यांसह वर्धा नगरपरिषदेचे



उपाध्यक्ष प्रदिपसिंह ठाकूर, निवासी उपजिल्हाधिकारी संजीव जाधवर, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विजय देशमुख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एकनाथ टिकले, भूमि अभिलेखचे उपअधीक्षक सुनील बन तसेच रामनगर येथील फ्री-होल्डधारक नागरीक उपस्थित होते.

रामनगर येथे अनेक नागरिक गेल्या कित्येक वर्षापासून लिज जमिनीवर वास्तव्य करत होते. या नागरिकांना लीज जमिनींचा कायमस्वरुपी हक्क मिळावा, त्यांना हक्काचा भूखंड उपलब्ध व्हावा म्हणून आपण शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. त्यानंतर शासनाने रामनगर येथील लिजधारक नागरिकांचे भूखंड फ्री-होल्ड केले. वर्धा नगरपरिषदेच्यावतीने या भूखंडधारकांचे फ्री-होल्डचे आदेश देखील पारीत करण्यात आले आहे, असे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर म्हणाले.फ्री-होल्डधारकांना आता त्यांच्या भूखंडाचे मालकी हक्काचे मालमत्ता पत्रके उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यामुळे भूमि अभिलेख विभागाने येत्या महिनाभरात येथील ३५० भूखंडधारकांचे भोगवटदार वर्ग-१ चे मालमत्ता पत्रके तयार करून वितरीत करावे. तसेच इतर सर्व प्रकरणे येत्या दोन महिन्यामध्ये निकाली काढून उर्वरीत भूखंडधारकांना देखील मालमत्ता पत्रके उपलब्ध करून देण्यात यावे, असे निर्देश पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी भूमि अभिलेख विभागाला दिले.रामनगर येथील नागरिकांच्या अडचणी नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांनी निकाली काढाव्या, अशा सूचना देखील पालकमंत्र्यांनी केल्या. लीज जमीन फ्री-होल्ड झाल्यानंतर भूमी अभिलेख विभागाकडून मालमत्ता पत्रके उपलब्ध व्हावी, अशी मागणी रामनगर येथील नागरिक करीत होते. पालकमंत्र्यांनी नगरपरिषद व भूमि अभिलेख विभागाची संयुक्त बैठक घेतल्याने मालमत्ता पत्रकाचा विषय मार्गी लागला आहे.

# भरधाव इनोव्हा पलटी

## महिला गंभीर जखमी, दोन चिमुकले बचावले

**वडनेर/जनमाध्यम**
हिंगणघाट तालुक्यातील पिपरी येथे शुक्रवारी सकाळी भरधाव वेगातील इनोव्हा कार पलटी होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात एका महिलेला गंभीर दुखापत झाली असून दोन लहान मुले थोडक्यात बचावली. अपघातानंतर परिसरात मोठी गर्दी जमली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, नागपूरकडून हैदराबादकडे जाणारी इनोव्हा कार क्रमांक AP 28 AY 5786 ही शुक्रवारी सकाळी पिपरी–पोहना मार्गावरून भरधाव वेगाने जात होती. पिपरी गावाजवळ अचानक गाडीचा टायर फुटल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार रस्त्याच्या कडेला पलटी झाली. अपघात इतका भीषण होता की, गाडीचा समोरील भाग पूर्णपणे चक्काचूर झाला.अपघातावेळी गाडीत चालकासह एक महिला आणि दोन लहान मुले प्रवास करीत होती. कार पलटी झाल्यानंतर काही काळ प्रवासी आत अडकून



पडले होते. घटनेची माहिती मिळताच पिपरी येथील नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. ग्रामस्थांनी गाडीच्या काचा फोडून प्रवाशांना बाहेर काढण्यात यश मिळवले.या अपघातात महिलेला पाय व हाताला गंभीर दुखापत झाली असून तिला प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी सेवाग्राम रुग्णालय येथे हलविण्यात आले. दोन लहान मुलांना किरकोळ मार लागला असून सुदैवाने मोठी जीवितहानी टळली.घटनेनंतर अपघातग्रस्त वाहन पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. भरधाव वेग आणि टायर फुटल्यामुळे हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून पुढील तपास सुरू आहे.

# सास्ती-पोहना मार्गावर मृत्यूचा सापळा

## मेन लाईनची तार तुटून रस्त्यावर; नागरिक थोडक्यात बचावले

**वडनेर/जनमाध्यम**
हिंगणघाट तालुक्यातील सास्ती ते पोहना मार्गावर शुक्रवारी सायंकाळी घडलेल्या धक्कादायक प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मेन लाईनची वीजतार अचानक तुटून रस्त्यावर कोसळल्याने मोठी दुर्घटना टळली. सुदैवाने पोहना येथील नरेश बापूराव मुनेश्वर हे थोडक्यात बचावले.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवार दि. १२ जून रोजी सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास नरेश बापूराव मुनेश्वर हे शेतातून आपल्या घरी परतत होते. सास्ती–पोहना मार्गावरून जात असताना अचानक मेन लाईनची तार तुटून त्यांच्या अगदी जवळ पडली. काही क्षणांसाठी परिसरात एकच घबराट उडाली. प्रसंगावधान राखल्याने त्यांचा जीव वाचला; अन्यथा मोठी जीवितहानी होण्याची शक्यता होती.घटनेनंतर नागरिकांनी महावितरणच्या कारभारावर संताप व्यक्त केला आहे. रस्त्यावर पडलेली वीजतार बराच वेळ तशीच असल्याने कोणत्याही क्षणी गंभीर अपघात होऊ शकतो, अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली. या मार्गावर नेहमीच वाहनांची वर्दळ असते. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने दखल घेऊन अशा जीर्ण तारांची पाहणी व दुरुस्ती करावी, अशी मागणी होत आहे.एखाद्याचा जीव गेल्यानंतरच प्रशासन जागे होणार का असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. महावितरणच्या निष्काळजीपणामुळे भविष्यात मोठी दुर्घटना घडू नये, यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



# वाघाचा तारा सावंग्यात धुमाकूळ

## गोठ्यातून ओढून नेले वासरू; शिवारात अवशेष आढळल्याने शेतकऱ्यांत दहशत

**आष्टी शहीद/जनमाध्यम**
आष्टी तालुक्यातील तारा सावंगा परिसरात वाघाच्या हल्ल्याची दहशत पसरली असून, पेठ शिवारात एका वासराला ठार मारण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. गोठ्यातून वासरू बेपत्ता झाल्यानंतर शेतकऱ्यांनी शोधमोहीम सुरू केली असता झुडपामध्ये त्याचे अवशेष आढळून आले. या प्रकारामुळे परिसरातील शेतकरी भयभीत झाले असून रात्रीच्या वेळी शेतात जाण्याचीही भीती व्यक्त केली जात आहे.

तारा सावंगा येथील शेतकरी रामेश्वर खोडे यांच्या पेठ शिवारातील शेतात गोठा असून त्यामध्ये गवळवू जातीच्या चार गायी व त्यांची वासरे बांधलेली होती. नेहमीप्रमाणे जनावरांची देखभाल करून शेतकरी घरी गेले होते. मात्र शुक्रवारी सकाळी शेतात पोहोचल्यावर एक वासरू गोठ्यातून गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

घाबरलेल्या शेतकऱ्यांनी परिसरात शोध घेतला असता काही अंतरावरील झुडपांमध्ये वासराचे अवशेष आढळून आले. वासरावर अत्यंत क्रूर पद्धतीने हल्ला करण्यात आल्याचे दृश्य पाहून परिसरात एकच खळबळ



उडाली. हा हल्ला वाघाने केल्याचा संशय व्यक्त केला जात असून, शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.घटनेची माहिती मिळताच वनपाल देविदास धुर्वे यांनी सुट्टीचा दिवस असतानाही तत्परता दाखवत घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सुरज पाटील यांच्यासह घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला. वनविभागाकडून पुढील तपास सुरू असून, परिसरात वन्यप्राण्याच्या हालचालींबाबत माहिती गोळा करण्यात येत आहे.दरम्यान, तारा सावंगा परिसरात यापूर्वीही वन्यप्राण्यांच्या हालचाली दिसून आल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये आहे. त्यामुळे शेतकरी आणि नागरिकांनी रात्रीच्या वेळी शेतात किंवा जंगलालगतच्या भागात एकटे न जाण्याचे आवाहन करण्यात येत आहे.नुकसानग्रस्त शेतकरी रामेश्वर खोडे यांना शासन नियमानुसार तातडीने आर्थिक मदत द्यावी तसेच वनविभागाने परिसरात गस्त वाढवून वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून जोर धरत आहे.

# ग्रामपंचायतीच्या आरक्षण सोडतीने राजकीय वातावरण तापले

## युवा परिवर्तनाच्या चर्चांना उधाण; नव्या चेहऱ्यांना मिळणार संधी

**मोझरी (शेकापूर)/जनमाध्यम**
आगामी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोझरी ग्रामपंचायतीच्या प्रभागनिहाय आरक्षण सोडतीकडे संपूर्ण गावाचे लक्ष लागले होते. शुक्रवारी स्थानिक ग्रामपंचायत कार्यालयात पार पडलेल्या सोडतीनंतर गावातील राजकीय समीकरणांना वेग आला असून,अनेक इच्छुकांनी निवडणुकीसाठी आतापासूनच मोर्चेबांधणी सुरू केल्याचे चित्र दिसून येत आहे.

ग्रामपंचायतीसाठी एकूण तीन प्रभाग निश्चित करण्यात आले असून त्यातून नऊ सदस्यांची निवड होणार आहे. यामध्ये अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गासह एकूण पाच जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत महिला उमेदवारांसह युवा नेतृत्वालाही मोठी संधी मिळणार असल्याची चर्चा गावात रंगू लागली आहे.जाहीर करण्यात आलेल्या आरक्षणानुसार, वार्ड क्रमांक एकमध्ये नामाप्र महिला व सर्वसाधारण महिला यांच्यासाठी प्रत्येकी एक जागा राखीव ठेवण्यात आली असून एक जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी खुली आहे. प्रभाग क्रमांक दोनमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती महिला यांच्यासाठी प्रत्येकी एक जागा राखीव ठेवण्यात आली आहे, तर एक जागा सर्वसाधारण उमेदवारासाठी आहे. वार्ड क्रमांक तीनमध्ये सर्वसाधारण महिला, अनुसूचित जाती आणि सर्वसाधारण उमेदवारांसाठी प्रत्येकी एक जागा निश्चित करण्यात आली आहे.

या आरक्षण सोडतीच्या बैठकीला वैशाली तोडासे, अलका ताल्हन, मंदा धोबे, शुभ्रबुद्ध कांबळे, राजू धोबे, प्रशांत कारंजकर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.आरक्षणाची सोडत जाहीर होताच गावातील राजकीय घडामोडींना वेग आला असून, अनेकांनी संभाव्य उमेदवारांच्या शोधाला सुरुवात केली आहे. विशेष म्हणजे यंदाच्या निवडणुकीत युवकांची भूमिका निर्णायक ठरणार असल्याची चर्चा असून युवा परिवर्तन आघाडीच्या माध्यमातून ग्रामपंचायतीत सत्तांतर घडवून आणण्याचे संकेत काही तरुणांकडून दिले जात आहेत.दुसरीकडे, विद्यमान सत्ताधाऱ्यांनी गावाचा विकास साधत विविध शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविल्याचा दावा समर्थकांकडून केला जात आहे. त्यामुळे पुन्हा जनतेचा कौल विद्यमान नेतृत्वालाच मिळेल, असा विश्वासही व्यक्त केला जात आहे. मात्र, यावेळी नव्या, तडफदार आणि सुशिक्षित युवकांना संधी देण्याचा विचार सत्ताधाऱ्यांकडून सुरू असल्याने कोणते नवे चेहरे राजकारणात झळकणार, याकडे आता संपूर्ण गावाचे लक्ष लागले आहे.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी जनजागृती मेळावा

**वर्धा-** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि आधारवड ज्येष्ठ नागरिक परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश हेमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१५ जुन रोजी ज्येष्ठ नागरिक कायदेविषयक जनजागृती मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याचा विषय वरिष्ठजन अधिकार, सक्षमीकरण आणि गरिमा असा असून जिल्ह्यातील सर्व ज्येष्ठ नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

नागरिक हा एक महत्त्वाचा घटक असून त्यांचे हक, संरक्षण, सन्मान आणि सुरक्षित जीवन याबाबत जनजागृती निर्माण करणे ही काळाची गरज आहे. या उद्देशाने सदर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आधारवड ज्येष्ठ नागरिक परिवारचे कार्याध्यक्ष गोपाळकृष्ण राऊत,ह राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव संजीव सरदार उपस्थित राहणार आहेत.दि.१५ जुन रोजी सायंकाळी ५.३० वाजता मुरारका ले आऊट नालवाडी येथील श्रध्देय अटलबिहारी वाजपेयी जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र येथे आयोजित मेळाव्यात जेष्ठ नागरिकांचे हक्क, संरक्षणाचे कायदे या विषयावर ॲड अजित सदावर्ते, सन्मानित वृध्दत्व विषयावर प्रा.डॉ. शेख हाशम व आनंदी व आरोग्य जीवन या विषयावर पांडूरंग भालशंकर मार्गदर्शन करणार आहे.

## घरकुलासोबत आता उजेडाचे स्वप्नही

# लाभार्थ्यांच्या घरावर सौरऊर्जेची मशाल; प्रत्येक युनिटसाठी शासन देणार निधी

**साहूर/जनमाध्यम**
ग्रामीण भागातील घरकुलांना आता केवळ चार भिंतींचा आधारच नव्हे, तर उजेडाची नवी ताकद मिळणार आहे. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत टप्पा क्रमांक २ आणि सन २०२४-२५ मधील लाभार्थ्यांच्या घरांवर एक किलोवॅट क्षमतेची सौर ऊर्जा प्रणाली बसविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला असून यासाठी प्रत्येक लाभार्थ्याला अतिरिक्त ५० हजार रुपयांचे अर्थसहाय्य दिले जाणार आहे. त्यामुळे साहूरसह परिसरातील शेकडो घरकुलांवर आता सौरऊर्जेची मशाल पेटणार आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त सहभागातून राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना यापूर्वीच एक लाख वीस हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. आता राज्य शासनाने यामध्ये आणखी ५० हजार रुपयांची भर घालत ग्रामीण घरकुलांना सौरऊर्जेची जोड देण्याचा निर्णय



घेतला आहे. त्यामध्ये ३५ हजार रुपये घरकुलाच्या अतिरिक्त कामांसाठी तर १५ हजार रुपये सूर्यघर योजनेंतर्गत सौर ऊर्जा प्रणाली उभारण्यासाठी खर्च करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.राज्यातील प्रत्येक घरावर सौर ऊर्जा प्रणाली उभारण्याचा निर्णय ग्रामविकास व पंचायत राज विभागाने घेतला असून सौर यंत्रणा प्रत्यक्ष सुरू झाल्यानंतरच अनुदानाची रक्कम वितरित केली जाणार आहे. यामध्ये पारदर्शकतेवर विशेष भर देण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागात वीज बचत, पर्यावरणपूरक ऊर्जेचा वापर आणि आर्थिक दिलासा मिळण्यास मोठी मदत होणार आहे.ग्रामीण भागात बहुतांश गावांमध्ये पाणीपुरवठा योजनांसाठी स्वतंत्र रोहित्र नसल्याने शेतीपंपाच्या रोहित्रावरच भार टाकला जातो. त्यामुळे रोहित्रांवर अतिरिक्त ताण येऊन ते वारंवार नादुरुस्त होणे, जळणे किंवा कमी दाबाने वीजपुरवठा होणे अशा समस्या निर्माण होत आहेत. परिणामी पाणीपुरवठा योजना विस्कळीत होऊन गावांमध्ये पाणी असूनही नागरिकांना टंचाईचा सामना करावा लागत आहे. अनेकदा थकीत वीजबिलांमुळे महावितरणकडून वीजपुरवठा खंडित केला जातो आणि महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागते.ही गंभीर समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी शासन आता पाणीपुरवठा योजनांसाठी स्वतंत्र सौर पंप योजना सुरू करण्याच्या तयारीत असल्याचेही प्रशासनाकडून सांगण्यात आले. त्यामुळे ग्रामीण भागात घरकुलासोबत आता कायमचा उजेड अशी आशेची नवी किरण निर्माण झाली आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १९७**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# किरीट सोमय्याना एमआयएमचा विरोध म्हणजे राजकीय नैराश्याचे लक्षण

## मनपा सभागृह नेता चेतन गावंडे

**अमरावती/प्रतिनिधीः-** माजी खासदार किरीट सोमय्या यांच्या अमरावती दौऱ्याला एमआयएम पक्षाने केलेला विरोध हा जनतेच्या प्रश्नांपेक्षा राजकारणाला प्राधान्य देणारा आहे. जन्म-मृत्यू दाखल्यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर चर्चा होऊ नये, प्रशासनाची जबाबदारी निश्चित होऊ नये आणि जनतेसमोर वास्तव येऊ नये यासाठी हा विरोध करण्यात आला असल्याचे दिसून येते, अशी प्रतिक्रीया मनपा सभागृह नेता चेतन गावंडे यांनी दिली.

एमआयएमकडे जनतेच्या प्रश्नांवर बोलण्यासाठी कोणतेही ठोस काम नसल्यामुळे ते केवळ विरोधाचे राजकारण करत आहेत. नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेण्याऐवजी जे लोक प्रश्न उपस्थित करतात त्यांनाच विरोध करण्याचे काम एमआयएम करत आहे. हा विरोध अमरावतीच्या जनतेचा नसून स्वतःच्या राजकीय अस्तित्वासाठी सुरू असलेल्या धडपडीचा भाग आहे. माजी खासदार किरीट सोमय्या यांनी जन्म मृत्यू दाखल्याची प्रशासनाकडून माहिती जाणून घेण्यासाठी भेट दिली होती. लोकशाही व्यवस्थेत कोणत्याही



लोकप्रतिनिधीला किंवा माजी लोकप्रतिनिधीला जनतेच्या प्रश्नांवर प्रशासनाला जाब विचारण्याचा अधिकार आहे. त्या अधिकारालाच विरोध करणे म्हणजे लोकशाही मूल्यांचा अपमान आहे. एमआयएमने विकास कामाचा प्रश्न सोडविण्याऐवजी प्रत्येक विषयाला राजकीय रंग देण्याची सवय सोडावी. अमरावतीची जनता विकास, पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाची अपेक्षा ठेवते, संघर्ष आणि दिशाभूल करणाऱ्या राजकारणाची नाही. भारतीय जनता पक्ष नागरिकांच्या हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करत राहील. जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठविणाऱ्यांना विरोध करून कोणीही सत्य दडपून ठेवू शकत नाही. अमरावतीची जनता सर्व पाहत आहे आणि योग्य वेळी अशा दुटप्पी राजकारणाला लोकशाही मार्गाने चोख उत्तर देई,असेही गावंडे म्हणाले.

# शिंदीत दरोड्याचा कट उधळला घातक शस्त्रांसह तिघे जेरबंद; दोघे अद्याप फरार

**अमरावती/प्रतिनिधीः-** ग्रामीण भागातील गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेत अंजनगाव उपविभागीय पोलिसांनी मोठी कारवाई करत दरोड्याच्या तयारीत असलेल्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. शिंदी (बु.) येथे टाकलेल्या धाडीत घातक शस्त्रांसह तिघांना अटक करण्यात आली असून एक विधीसंघर्षग्रस्त बालक आणि आणखी एक आरोपी अद्याप फरार आहेत.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या निर्देशानुसार गुन्हेगारांवर पाळत ठेवून कठोर कारवाई सुरू आहे. त्यानुसार उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अनंत वडतकर व पथकाने शिंदी (बु.) येथे संशयितांच्या घरांवर छापे टाकले. झडतीदरम्यान आरोपी शिवम उर्फ गोलू मुन्नालाल धुर्वे (वय १८) याच्या घरातून मोटारसायकलच्या चेन व्हीलचे वेल्डिंग करून तयार करण्यात आलेले लोखंडी घातक शस्त्र जप्त करण्यात आले. त्याच्याकडून चौकशी केली असता, दरोडा टाकण्याच्या उद्देशाने हे शस्त्र तयार केल्याची कबुली मिळाली. त्यानंतर आरोपी अतिक अहमद कैसर अहमद (वय २२) याच्या घरातूनही अशाच प्रकारचे आणखी एक घातक शस्त्र जप्त करण्यात आले. या प्रकरणात पोलिसांनी शिवम धुर्वे, अतिक अहमद आणि मोहम्मद शफीक मोहम्मद रफिक यांना अटक केली आहे. तर शंकर मुन्नालाल धुर्वे आणि एक विधीसंघर्षग्रस्त बालक फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन करून घरात घातक शस्त्रे बाळगल्याप्रकरणी आरोपींविरुद्ध पथ्रोट पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १८१/२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३१०(४) तसेच आर्म ॲक्टच्या कलम ४ व २५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींना न्यायालयासमोर हजर करून मध्यवर्ती कारागृहात रवाना करण्यात आले. पोलीस प्रशासनाने गुन्हेगारांना स्पष्ट इशारा देत, जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था बिघडविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नसल्याचे सांगितले आहे.

## माधवराव धंदर यांचे निधन



**कुऱ्हा :-** तिवसा तालुक्यातील तळेगांत ठाकूर येथील वयोवृद्ध जेष्ठ नागरिक माधवराव वामनराव धंदर यांचे वयाच्या ८० व्या वर्षी दि.१३ जून २०२६ ला रात्री २.४५ वा. वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुलं, एक मुलगी, स्नुषा, जावाई, नातू नातवंड असा बराच मोठा परिवार आहे. त्यांच्या अंत्यविधी करिता सर्वच स्तरावरील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते. यावेळी सामूहीक श्रध्दांजली वाहण्यात आली.

# पीएम मित्रा पार्कमधील ड्रेनेजला वर्षभरातच तडे

## अनेक ठिकाणी बांधकाम खचले, निकृष्ट कामाचा आरोप

**नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-** केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी पीएम मित्रा पार्क प्रकल्पातील विकासकामांच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, कोट्यवधी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या ड्रेनेज व्यवस्थेला अवघ्या वर्षभरातच तडे गेल्याचे समोर आले आहे. अनेक ठिकाणी ड्रेनेजच्या भिंतींना भेगा पडल्या असून काही भागात बांधकाम खचल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे या कामांमध्ये निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर झाला का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, ड्रेनेजचे बांधकाम करताना आवश्यक तांत्रिक निकष आणि गुणवत्तेची मानके पाळण्यात आलेली दिसत नाहीत. अनेक ठिकाणी ड्रेनेजच्या संरचनेला तडे गेले असून काही ठिकाणी कॉंक्रीटचे भाग उखडू लागले आहेत. एवढ्या कमी कालावधीत अशा प्रकारची स्थिती निर्माण होणे हे गंभीर बाब असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.ड्रेनेजच्या बांधकामात योग्य उतार न देण्यात आल्याचा आरोपही नागरिकांकडून केला जात आहे. पावसाळ्यात किंवा औद्योगिक सांडपाण्याचा निचरा करताना पाणी वाहून जाण्याऐवजी जागोजागी साचण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जर ड्रेनेजला आवश्यक उतारच नसेल तर भविष्यात ही संपूर्ण व्यवस्था केवळ नावापुरती राहील आणि पाणी साचून परिसरात जलमय परिस्थिती निर्माण होऊ शकते, अशी भीती व्यक्त होत आहे.

पीएम मित्रा पार्कसाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. उद्योगांना आवश्यक असलेली दर्जेदार पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या उद्देशाने हे काम सुरू करण्यात आले.

# जनगणना अभियानात पहिल्या टप्प्याचे १०० टक्के काम पूर्ण

## महापालिका आयुक्त वर्षा लड्डा यांच्या हस्ते अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेच्या जनगणना अभियानाचे उद्दिष्ट १०० टक्के पूर्ण झाल्याबद्दल आज शुक्रवार, दि. १२ जून २०२६ रोजी महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांच्या हस्ते संबंधित झोनमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

जनगणना अभियान यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या झोन क्र.१ चे सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, उपअभियंता आशिष अवसरे व त्यांच्या कर्मचारीवर्गाचा, झोन क्र. ४ चे सहाय्यक आयुक्त धनंजय शिंदे व त्यांच्या कर्मचारीवर्गाचा, झोन क्र. ५ चे सहाय्यक आयुक्त मनोज शहाळे, उपअभियंता विवेक देशमुख व त्यांच्या कर्मचारीवर्गाचा तसेच झोन क्र.३ चे उपअभियंता नितीन भटकर यांचा यावेळी गौरव करण्यात आला. यावेळी आयुक्त वर्षा लड्डा यांनी जनगणना अभियान यशस्वी करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या परिश्रमांचे कौतुक केले. जनगणना ही शहराच्या विकास आराखड्यासाठी महत्त्वाची प्रक्रिया असून सर्वांनी समन्वयाने काम करून अभियान शंभर टक्के



पूर्ण केले, ही अमरावती महानगरपालिकेसाठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जनगणना अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीत महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल शहर जनगणना अधिकारी तथा उपायुक्त योगेश पिठे यांचे विशेष कौतुक करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. त्यांच्या मार्गदर्शन, नियोजन आणि समन्वयामुळे अभियान निर्धारित वेळेत आणि प्रभावीपणे पूर्ण झाल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

सत्कार समारंभात संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पुष्पगुच्छ व प्रशस्तीपत्र देऊन अभिनंदन करण्यात आले. उपस्थितांनीही जनगणना अभियानाच्या यशाबद्दल समाधान व्यक्त करत पुढील शासकीय उपक्रमांमध्येही अशीच कार्यक्षमता दाखविण्याचा निर्धार व्यक्त केला. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, शहर जनगणना अधिकारी तथा उपायुक्त योगेश पीठे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, नितीन बोबडे, उद्यान अधिक्षक अजय विंचुरकर, सहाय्यक शहर जनगणना अधिकारी अक्षय निलंगे, कैलास कुलट, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# अतिक्रमणाविरोधात महानगरपालिकेची संयुक्त कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने पोलीस विभागाच्या सहकार्याने आज (दि.१२) सकाळी ७.३० ते ११ वाजेदरम्यान घुमंतू अतिक्रमणाविरोधात संयुक्त कारवाई राबविली.





या मोहिमेत शहरातील विविध रस्ते व सार्वजनिक ठिकाणांची पाहणी करण्यात आली. पाहणीदरम्यान कोणतेही घुमंतू अतिक्रमण आढळून आले नाही. मात्र, घुमंतूकडून सार्वजनिक जागेवर जमा करून ठेवण्यात आलेले अंदाजे १ ट्रक भंगार साहित्य जप्त करण्यात आले.

जप्त करण्यात आलेले साहित्य पुढील कार्यवाहीसाठी महानगरपालिकेच्या कंपोस्ट डेपो येथे जमा करण्यात आले आहे.

शहरातील सार्वजनिक जागा अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी महानगरपालिका सातत्याने कारवाई करत असून, आज सायंकाळी देखील अशीच संयुक्त मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

महानगरपालिकेने नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण अथवा भंगार साहित्य साठवून न ठेवण्याचे आवाहन केले आहे.

# मराठी शाळांमध्येच पाल्यांचा प्रवेश निश्चित करा

## शिक्षण विभागाचे पालकांना आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** नव्या शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीसह पालकांनी आपल्या पाल्यांना जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यम शाळांमध्ये प्रवेश द्यावा, असे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे. जिल्हा परिषदेच्या शाळा या कोणत्याही खाजगी शाळांपेक्षा कमी नाहीत. याच सरकारी शाळांनी जिल्हा आणि महाराष्ट्राला अनेक उच्चपदस्थ अधिकारी, डॉक्टर, शास्त्रज्ञ, लेखक आणि समाजसुधारक दिले आहेत.



राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP 2020) मध्येही प्राथमिक स्तरावर मातृभाषेतील शिक्षणाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. मराठी माध्यमातून शिकणाऱ्या मुलांचे आकलन, आत्मविश्वास आणि सर्जनशीलता अधिक चांगल्या प्रकारे विकसित होते. यासोबतच मुले आपली भाषा, संस्कृती आणि परंपरांशी जोडलेली राहतात.

शिक्षण विभागाने पालकांना विनंती केली आहे की, त्यांनी आपल्या परिसरातील जिल्हा परिषद शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करावी, शिक्षकांशी संवाद साधावा आणि आपल्या पाल्याच्या उज्ज्वल भविष्याचा विचार करून योग्य निर्णय घ्यावा. मराठी शाळा बळकट करणे हे मराठी भाषा, संस्कृती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संवर्धनासाठी उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल.

# कौशल्य, शिस्त आणि स्वच्छतेचे कौतुक

## नगराध्यक्षांसह नगरसेवकांची नांदगाव आयटीआयला भेट

**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** कौशल्य विकासाच्या माध्यमातून युवकांना रोजगारक्षम बनविणाऱ्या नांदगाव खंडेश्वर येथील एकनाथराव रानडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) येथे मंगळवारी दुपारी नांदगाव खंडेश्वर नगरपंचायतच्या नगराध्यक्षांसह नगरसेवकांनी भेट देत संस्थेच्या विविध विभागांची सविस्तर पाहणी केली. विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत प्रशिक्षणाच्या गुणवत्तेची माहिती घेतली तसेच संस्थेतील सुविधा, स्वच्छता आणि शैक्षणिक वातावरणाचे कौतुक केले.



नगराध्यक्षा प्राप्ती मारोटकर, उपाध्यक्षा शेख जमीर, गटनेते प्रकाश मारोटकर, आरोग्य सभापती ज्योत्स्ना धवसे, महिला व बालकल्याण सभापती कांता लोमटे, बांधकाम सभापती मोहम्मद रियाज यांच्यासह नगरसेवक शेख हारून, मोहम्मद साजिद व शेख सलाम यांनी संस्थेला भेट दिली. यावेळी प्राचार्य नंदनसिंह भुकवाल, प्रभारी प्राचार्य रा. भ. धोटे यांनी सर्वांचे स्वागत करून संस्थेच्या कार्याची माहिती दिली. सर्वांनी इलेक्ट्रिशियन, वायरमन, फिटर, कोपा, शीट मेटल वर्कर, वेल्डर, प्लंबर, बेसिक कॉस्मेटोलॉजी तसेच फॅशन डिझाईन अँड टेक्नॉलॉजी या विविध ट्रेड विभागांना भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. प्रशिक्षण पद्धती, उपलब्ध यंत्रसामग्री आणि रोजगाराच्या संधींबाबत माहिती जाणून घेतली. तसेच संपूर्ण आयटीआय परिसराची पाहणी करून विविध सुविधांचा आढावा घेतला. संस्थेतील स्वच्छता, शिस्तबद्ध वातावरण आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सोयी-सुविधांबाबत नगराध्यक्षांसह सर्व पदाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त करत प्रशंसा केली. सध्या आयटीआयची प्रवेश प्रक्रिया सुरू असून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या संस्थेत प्रवेश घ्यावा यासाठी जनजागृती करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याचे आश्वासनही यावेळी देण्यात आले. याप्रसंगी आयटीआयचे शिल्प निदेशक तुषार जैन, प्रफुल्ल कचरे, वैभव जाधव, निलेश देऊळकर, संगीता बिबेकर, दिपाली लोखंडे, रूपाली लांडे तसेच कार्यालयीन कर्मचारी निलेश खंडार, गौरव मोगरे व इतर उपस्थित होते.


सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--
(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन)** - **निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--
पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती



जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २७६**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com


# भारत विकास परिषद प्रांतीय कार्यशाळा २०२६ अमरावतीत उत्साहात

**अमरावती/प्रतिनिधीः-** हॉटेल रामगिरी इंटरनॅशनल येथे रविवारी (दि.७) भारत विकास परिषदेची प्रांतीय कार्यशाळा अतिशय उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेला महाराष्ट्र तसेच गुजरात मधून प्रांतीय तसेच केंद्रीय पदाधिकारी उपस्थित होते. याव्यतिरिक्त नागपूर विभागातील विविध शाखेचे अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व पदाधिकारी सुद्धा मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यामध्ये प्रामुख्याने नागपूर, अकोला, खामगाव, अमरावती येथील जवळपास ७० पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी कार्यशाळेला उपस्थिती नोंदविली.

यावेळी मंचावर राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉक्टर मंथा मुंबई, राष्ट्रीय सहसंयोजक सेवा गतिविधि चंद्रशेखरजी घुसे, पश्चिम क्षेत्रीय अध्यक्ष लक्ष्मी निवास जाजू मुंबई, पश्चिम क्षेत्रीय संघटन प्रमुख फाल्गुनभाई होरा गांधीनगर गुजरात, पश्चिम क्षेत्रीय सहसचिव गिरीशजी दोशी सातारा, पश्चिम क्षत्रिय महिला सहभागीता सीमा मुंशी नागपूर, पश्चिम क्षत्रिय सेवाप्रमुख तुषार तोतला जळगांव, पश्चिम क्षत्रिय पर्यावरण प्रमुख अतुल सलागरे पुणे, नागपूर शाखेचे अध्यक्ष दिलीप गूळकरी, प्रांतीय सचिव आसावरी वरकड व भारत विकास परिषद अमरावती शाखेचे अध्यक्ष प्रा. डॉ. रविकांत कोल्हे हे स्थानापन्न होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते द्वीप प्रज्वलन संपन्न होऊन, वंदे मातरम गीताने कार्यशाळेची सुरवात झाली.

कार्यशाळेमध्ये एकूण, पाच सत्रे घेण्यात आले. त्यापैकी पहिल्या सत्रामध्ये शाखा वाईज सर्व सहभागी पदाधिकाऱ्यांचा परिचय व त्यांच्या कायमस्वरूपी प्रकल्पाची माहिती घेण्यात आली. त्यानंतर नागपूर येथील भारत विकास परिषदेचे अध्यक्ष दिलीप गुळकरी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सातारा येथील गिरीश दोशी यांनी कार्यशाळा घेण्याचा उद्देश सांगितला तर लक्ष्मी निवास जाजू यांनी भारत विकास परिषदेची



आयडॉलॉजी यावर प्रकाश टाकला. त्यानंतर दुसऱ्या सत्रामध्ये नागपूर येथील चंद्रशेखर घुसे यांनी भारत विकास परिषदेचे नियम आणि प्रोटोकॉल या विषयी सविस्तर माहिती दिली. जळगाव येथून आलेले तुषार तोतला यांनी सेवा गतिविधि म्हणजे काय? याविषयी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले तर फाल्गुन वोरा यांनी संपर्कची संकल्पना सर्व सहभागी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सांगितली. सीमा मुंशी यांनी महिला सहभागीतेची संकल्पना सांगताना जास्तीत जास्त महिलांनी कसा सहभाग घेतला पाहिजे याविषयी महत्वपूर्ण मार्गदर्शन केले.

लंच ब्रेक नंतर सुरू झालेल्या तिसऱ्या सत्रा मध्ये पुणे येथील सलागरेजी यांनी पर्यावरणाचे महत्त्व सांगताना आज पर्यावरणाची किती महत्त्वाची गरज आहे? याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तर कुलपती मंथा यांनी इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ही संघटनामध्ये आणि गतिविधि मध्ये किती महत्त्वाची आहे, याविषयी महत्वपूर्ण मार्गदर्शन केले. त्यांनी भारत विकास परिषदेच्या तयार केलेल्या वेबसाईटवर आपण कशाप्रकारे विविध कार्यक्रम आणि योजना राबवू शकतो, विविध कंपन्याचे सीएसआर कशाप्रकारे मिळवू शकतो याविषयी सखोल मार्गदर्शन केले.

गिरीश दोशीजी यांनी ट्रस्ट किंवा सोसायटीमध्ये आर्थिक प्रशासन किती महत्त्वाचे आहे, याविषयी माहिती दिली. तर फाल्गुनभाई वोरा यांनी शाखेची कार्यशाळा आणि सदस्यत्व वाढविण्याविषयी चर्चात्मक मार्गदर्शन केले. त्यानंतर टी ब्रेक मध्ये अर्धा तास विविध विषयावर टेबल डिस्कशन घेण्यात आले. ज्याचे नेतृत्व फाल्गुनभाई वोरा, जाजू , जोशीजी, राहुल बजाज व सचिन धनवट यांनी केले.

शेवटच्या व अंतिम सत्रामध्ये दिवसभर झालेल्या कार्यशाळेचे परिपूर्ण असे अहवाल वाचन, नागपूर येथील प्रांतीय सचिव आसावरी वरकड यांनी अतिशय खुमासदारपणे केले.

त्यानंतर मार्गदर्शनपर भाषणात पश्चिम क्षत्रिय अध्यक्ष लक्ष्मी निवास जाजू यांनी भारत विकास परिषदेचे महत्त्व सांगताना तिच्यासाठी कशा पद्धतीने कार्य केले पाहिजे, याविषयी अतिशय मर्मस्पर्शी मार्गदर्शन केले. पुढे कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतांना कार्यकर्ता आज आहे, उद्या नाही मात्र भारत विकास परिषद जिथे आहेत तिथेच आहे, ती पूर्वीही होती व पुढेही राहील, त्यामुळे कुण्याही कार्यकर्त्यांनी, पदाधिकाऱ्यांनी आपल्यामुळे भारत विकास परिषद आहे असा गैरसमजू बाळगू नये असे आवर्जून सांगितले. भारत विकास परिषद आहे म्हणून आपली ओळख आहे, आपल्यामुळे भारत विकास परिषदेची ओळख नाही.

तेव्हा संस्थेचे महत्त्व ओळखा, तिला जपा, वाढवा, मोठे करा असे भावनात्मक आवाहन केले.

आभार प्रदर्शन करतांना भारत विकास परिषद अमरावती शाखेचे अध्यक्ष प्रा. डॉ. रविकांत कोल्हे यांनी सर्व अतिथी, पदाधिकारी व मान्यवरांचे आभार व्यक्त केले व 'आनंद हा चंदनासारखा आहे, तो दुसऱ्याच्या कपाळावर लावला की आपलीही बोटे आपोआप सुगंधित होतात' म्हणून भारत विकास परिषदेचे कार्य करत रहा, असा मौलिक विचार व्यक्त केला. कार्यक्रमाचे सुंदर संचालन नागपूर येथील प्रांतीय सचिव आशा वरकड यांनी केले तर आभार भारत विकास परिषदेच्या अमरावती शाखेच्या सचिव माया अंबाडकर तसेच सांस्कृतिक सदस्य धीरज शर्मा यांनी केले. कार्यशाळेची सांगता राष्ट्रगीताने संपन्न झाली.

वरील कार्यशाळेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अमरावती विभाग कार्यवाह दत्ता रत्नपारखी, अमरावती महानगर प्रचारक सुमधुर गोखले, अमरावती जिल्हा प्रचारक अंकुश लव्हाळे, अमरावती गुजराती समाजाचे अध्यक्ष व रघुवीर मिठाईयाचे संचालक दिलीपभाई पोपट तसेच सचिव अमृतभाई पटेल यांची उपस्थिती लाभली.


**2 BHK FLAT FOR SALE**
**भाग्य नगर**
**गणेडीवाल लेआउट**
**कॅम्प-अमरावती**
**-संपर्क-**
**9422190814**
**9518527395**

रविवार, दि. १४ जून २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम


एक प्रतिष्ठित सत्य

# यवतमाळ हादरले! रुग्णालयात घुसून परिचारिकेची निर्घृण हत्या..!

## भरदिवसा रक्तरंजित थरार,धारदार शस्त्राने सपासप वार करून परिचारिका कुसूम चांदेकर यांचा खून शहराच्या कायदा-सुव्यवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह, हल्लेखोर फरार

✦जनमाध्यम | प्रतिनिधी





**यवतमाळ, दि. १३ :** जिल्ह्यात सुरू असलेल्या खुनांच्या मालिकेत शनिवारी आणखी एका धक्कादायक घटनेची भर पडली. शहरातील तिवारी चौक परिसरातील श्रोती हॉस्पिटल (सध्या डॉ. कांबळे यांचे खासगी रुग्णालय) येथे कार्यरत परिचारिका कुसूम चांदेकर (वय ४५) यांची अज्ञात हल्लेखोराने भरदिवसा रुग्णालयात घुसून धारदार शस्त्राने सपासप वार करून निर्घृण हत्या केली.

या रक्तरंजित घटनेने संपूर्ण यवतमाळ शहर हादरून गेले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी दुपारी सुमारे ४ ते ४.३० वाजण्याच्या सुमारास एक अज्ञात व्यक्ती रुग्णालयात दाखल झाली. त्याने थेट परिचारिका कुसूम चांदेकर यांच्यावर धारदार शस्त्राने अनेक वार केले. अचानक झालेल्या या जीवघेण्या हल्ल्यात त्या गंभीर जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात कोसळल्या. घटनेची माहिती मिळताच रुग्णालय परिसरात एकच खळबळ उडाली. नागरिकांनी मोठी गर्दी केली. अवधूतवाडी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमी महिलेला उपचारासाठी हलविले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. दरम्यान, हल्लेखोर घटनास्थळावरून पसार होण्यात यशस्वी झाला. या हत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. हल्ला पूर्वनियोजित होता का, हल्लेखोर एकटाच होता की त्याला साथीदार होते, वैयक्तिक वादातून की अन्य कारणातून हा खून झाला, याबाबत विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे. पोलिस तपासानंतरच सत्य समोर येणार आहे. घटनास्थळी पोलिस उपविभागीय अधिकारी दिनेश बैसाने, अवधूतवाडीचे पोलिस निरीक्षक अजित कदम तसेच डीबी पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी भेट देऊन पाहणी केली. वृत्त लिहिपर्यंत गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू होती आणि पोलिसांकडून हल्लेखोराचा शोध सुरू होता.

### रुग्णालयाच्या भिंतींवर रक्ताचे डाग..!

**'रुग्णालयही सुरक्षित नाही का?' नागरिकांचा संतप्त सवाल**
**जीव वाचविणाऱ्या रुग्णालयातच एका परिचारिकेचा रक्तरंजित अंत झाल्याने नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. भरदिवसा घडलेल्या या घटनेमुळे शहरातील सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, "रुग्णालयही सुरक्षित राहिले नाही का?" असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे.**

**चाचा का धाबा संचालक सुनील पाली यांच्यावर प्राणघातक हल्ला :** सोन्याची अंगठी-कडे लुटले यवतमाळ शहरात शनिवारीच आणखी एक धक्कादायक घटना घडली. 'चाचा का धाबा'चे संचालक सुनील पाली यांच्यावर दोन युवकांनी चाकूने प्राणघातक हल्ला करून त्यांच्या हातातील सोन्याची अंगठी आणि मनगटातील कडे लुटल्याची घटना घडली. गंभीर जखमी झालेल्या सुनील पाली यांच्यावर प्रथम संजीवनी हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात आले. त्यानंतर त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल करून शस्त्रक्रिया करण्यात आली. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे. या प्रकरणातही पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली असून संबंधित हल्लेखोरांचा शोध सुरू आहे.

# अवैध पिवळी रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त..! चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**उमरखेड, दि. १३ :** यवतमाळ जिल्ह्यातील अवैध धंदे, अवैध उत्खनन आणि रेती तस्करीला आळा घालण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने कारवाईचा बडगा उगारला आहे. त्याअंतर्गत उमरखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध पिवळी रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त करून चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या निर्देशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक ११ जून रोजी उमरखेड उपविभागात पेट्रोलिंग करीत होते. यावेळी गोपनीय माहितीच्या आधारे उमरखेड-विडूळ मार्गावरील चुरमुरा फाटा परिसरात सापळा रचण्यात आला. त्यावेळी एका ट्रॅक्टरद्वारे विना परवाना आणि विना रॉयल्टी पिवळी रेतीची वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले. पोलिसांनी ट्रॅक्टरसह पिवळी रेती असा एकूण ४ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी बबलू मारोती देवकर (रा. भगतसिंग वार्ड, उमरखेड) याला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याविरुद्ध उमरखेड पोलीस ठाण्यात कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ४८(८) व ४७(७) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अशोक थोरात, पोलीस निरीक्षक सतीश चावरे आणि एसपीआय धीरज बांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि अमोल राठोड व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# गाळ वाहतुकीची अडवणूक करणाऱ्यांवर कारवाईचे निर्देश – मंत्री संजय राठोड

## शेतकऱ्यांना रॉयल्टीमुक्त गाळ उपलब्ध करण्यावर भर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १३ :** गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार अभियानांतर्गत तलाव व जलसाठ्यांमधून काढण्यात येणाऱ्या गाळाच्या वाहतुकीत कोणत्याही प्रकारची अडवणूक करू नये. अशा तक्रारी आल्यास संबंधितांवर तातडीने कारवाई करण्यात यावी, असे निर्देश मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी महसूल व पोलिस विभागाला दिले आहेत.

मृद व जलसंधारण विभागाच्या दि. १५ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार अभियान राज्यात कायमस्वरूपी राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील जलसाठ्यांमध्ये साचलेला गाळ काढणे व नाल्यांचे खोलीकरण करण्याची कामे जिल्हाधिकाऱ्यांच्या मंजुरीने केली जातात. ही कामे अशासकीय संस्था व लोकसहभागातून राबविली जात असून, काढण्यात आलेला गाळ शेतकऱ्यांच्या शेतात पसरविण्यात येतो. या योजनेत शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची बाब म्हणजे जलसाठ्यांतून काढण्यात येणाऱ्या गाळावरील स्वामित्व शुल्क (रॉयल्टी) माफ करण्यात आले आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या ४ ऑक्टोबर २०२४ च्या बैठकीत यास मान्यता देण्यात आली आहे. मात्र, क्षेत्रीय स्तरावर गाळ वाहतूक करणाऱ्या वाहनांना विविध विभागांकडून अडवणूक होत असल्याच्या तक्रारी शासनाच्या निदर्शनास आल्या आहेत. त्यामुळे गाळ वाहतूक व शेतात गाळ पसरविण्याच्या प्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी मृद व जलसंधारण, महसूल आणि गृह विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणांनी समन्वयाने काम करून पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन मंत्री संजय राठोड यांनी केले आहे.

# 'मटा'च्या वर्धापनदिनी पुनाजित कुळमेथे दांपत्याचा नागपुरात गौरव..!

## आदिवासी भागातील सामाजिक कार्याला मिळाली राज्यस्तरीय दाद

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**झरी, दि. १३ :** 'महाराष्ट्र टाइम्स'च्या नागपूर आवृत्तीच्या १४ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित सन्मान सोहळ्यात यवतमाळ जिल्ह्यातील झरी-जामणी तालुक्यातील बिरसाईपेठ येथील सामाजिक कार्यकर्ते पुनाजित कुळमेथे यांचा उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल नागपुरात जाहीर गौरव करण्यात आला. नागपूरच्या महापौर नीता ठाकरे यांच्या हस्ते त्यांना शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात 'महाराष्ट्र टाइम्स'चे निवासी संपादक अतुल पांडे यांनी पुनाजित कुळमेथे आणि त्यांच्या पत्नी तथा 'किसान बहुउद्देशीय संस्था'च्या सचिव सौ. वंदना कुळमेथे यांचे विशेष स्वागत केले. सत्काराला उत्तर देताना पुनाजित कुळमेथे भावूक झाले. यवतमाळच्या दुर्गम व आदिवासी भागात एकल महिला, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबे आणि कुमारी मातांच्या सक्षमीकरणासाठी गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेमार्फत आतापर्यंत ६४ महिलांना शिवणयंत्रे, शेळीपालन व शेवया निर्मिती यंत्रांचे प्रशिक्षणासह मोफत वाटप करण्यात आले आहे. तसेच ४० महिलांना ब्युटी पार्लर व शिवणकामाचे प्रशिक्षण, तर ३०० महिलांना परसबाग व्यवस्थापनाचे तांत्रिक शिक्षण देण्यात आले आहे. हा सन्मान केवळ माझा नसून संघर्षशील महिलांचा आणि माझ्या पत्नीच्या सहकार्याचा गौरव असल्याची भावना व्यक्त करत त्यांनी भविष्यात अधिक जोमाने सामाजिक कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.

## थोडक्यात



### सवना शेत शिवारात शेती साहीत्य चोरट्यांचा धुमाकूळ

✦ किरण नरवाडे

**महागाव:** मागील काही दिवसांपासून सवना शेत शिवारात शेती साहीत्य मोटर पंप, तुषार सिंचन साहीत्य इत्यादी चोरी करणारी टोळी आनेक दिवसांपासून सक्रिय झाली असून पोलीस प्रशासनाला चोरट्यांचा शोध घेण्यात अध्याप यश न आल्याने चोरटे निर्ढावले असुन आनेक शेतकऱ्यांनी पिकांना सीचंन करणे सोडून आपले साहित्य घरी आनुन ठेवले आहे. गुरवारी रात्री ला गुंज महागाव रोडवरील माणसांची वर्दळ असलेल्या कॅनाल च्या पुलावरून शेख सलीम शेख रशीद यांच्या दोन लाख किमंतीच्या मोटार पंप लंपास केला तर त्याच रात्री गोविंदराव देशमुख यांच्या गोठ्यात बांधलेल्या स्प्रेपंपाची बॅटरी व इतर साहित्य चोरून नेले हा प्रकार नेहमीचाच झाल्याने शेतकरी वैतागले असुन नवीन संकटात भर पडली आहे. तेव्हा पोलीस प्रशासनाचे आधीकार्यानी या चोरांच्या मुसक्या आवळाव्या अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. आज शनिवार १३/६/ २०२६०रोजी बिट जमादार कैलास नेवकर व त्यांचे सहकारी पोलीस पाटील निरज वानखेडे यांनी दिलेल्या माहितीनुसार तपासणी साठी मोक्यावर आले असता लवकरच याचा शोध घेतला जाईल असे उपस्थीत शेतकऱ्यांना सांगितले यावेळी. शेख सलीम, गोविंदराव देशमुख, अरविंद करोडकर, सुर्यवंशी इत्यादी शेतकरी उपस्थित होते.

### रात्रीभर सुरू बियर बार सुरू,प्रशासन झोपेत..!

**फुलसावंगीकरांचा संताप!वेळेच्या मर्यादा धाब्यावर**

**फुलसावंगी :** फुलसावंगी येथील काही बियर बारमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. विहित वेळेच्या मर्यादा धाब्यावर बसवून हे बार रात्री उशिरापर्यंत, काही ठिकाणी पहाटेपर्यंत सुरू राहत असल्याने परिसरातील शांतता, कायदा व सुव्यवस्था आणि नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या नियमांनुसार ग्रामीण भागातील बियर बार रात्री ११ वाजेपर्यंतच सुरू ठेवण्याची परवानगी आहे. मात्र, फुलसावंगीतील काही बारमध्ये या नियमांचे खुलेआम उल्लंघन होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या या बारमुळे गोंधळ, ध्वनीप्रदूषण, गैरप्रकार आणि संशयास्पद हालचालींमध्ये वाढ होत असल्याची तक्रार नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

याशिवाय, काही बियर बारमध्ये ग्राहकांसाठी आवश्यक असलेल्या स्वच्छता, मूलभूत सुविधा आणि सुरक्षिततेच्या निकषांचाही अभाव असल्याचे समोर आले आहे. परवानाधारक व्यावसायिक आस्थापनांनी नियमांचे पालन करणे अपेक्षित असताना, अनेक ठिकाणी त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसत आहे.

सर्वात गंभीर बाब म्हणजे इतक्या उघडपणे नियमभंग होत असतानाही राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई झाल्याचे दिसून येत नाही. वेळोवेळी तपासणी, नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई किंवा परवाना निलंबनाची तरतूद असतानाही संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. त्यामुळे विभागाच्या कार्यपद्धतीवर नागरिकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. स्थानिक नागरिकांनी या प्रकरणाची वरिष्ठ पातळीवर चौकशी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बियर बारवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच ग्रामीण भागातील बारसाठी निश्चित करण्यात आलेल्या वेळेचे काटेकोर पालन सुनिश्चित करण्यासाठी विशेष तपासणी मोहीम राबविण्याची मागणीही जोर धरत आहे.

# अवैध खत उत्पादन आणि साठवणुकीवर मोठी कारवाई..!

**२४.७३ लाख किमतीचा माल जप्त**




यवतमाळ: कृषी विभागाच्या तक्रारीच्या आधारे, एमआयडीसी परिसरात अवैधपणे खत उत्पादन आणि साठवणूक केल्याप्रकरणी तीन व्यक्तींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ही कारवाई अत्यावश्यक वस्तू कायदा १९५५, भारतीय दंड संहिता २०२३ आणि रासायनिक खते नियंत्रण आदेश १९८५ च्या विविध तरतुदींनुसार करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पंचायत समितीचे कृषी अधिकारी संजय अनंत पवार यांच्या लेखी तक्रारीच्या आधारे, एमआयडीसी मधील जीनियस पॉवर इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडच्या आवारात तपास करण्यात आला. तपासादरम्यान, ओम ॲग्रो सेंट्री, ए-७६ एमआयडीसी लोहारा यांच्या युनिटमध्ये वैध परवान्याशिवाय खताचे उत्पादन आणि साठवणूक केली जात असल्याचे आढळून आले. या प्रकरणात यवतमाळचे रहिवासी गजानन सुरेश टोटे (५१), अविनाश वसंतराव दुधे (३८) आणि जसवंत सिंग गिल (५०) यांच्यावर आरोप ठेवण्यात आले आहेत. पंचांच्या उपस्थितीत केलेल्या तपासणीत, मळीपासून बनवलेले पोटॅश (भूमिधन) नावाच्या खताच्या मोठ्या प्रमाणात पिशव्या आढळून आल्या. यामध्ये PDM-APR २०२६ या बॅच क्रमांकाच्या १,७२० पिशव्या (प्रत्येकी ५० किलो) आणि OP०३ या बॅच क्रमांकाच्या ४३१ पिशव्यांचा समावेश होता. एकूण २,१५१ पिशव्या (१०७.५५ मेट्रिक टन) खत जप्त करण्यात आले असून, त्याचे अंदाजित मूल्य २४,७३,४५० आहे. तपासात असे उघड झाले की, आवश्यक वैधानिक परवानगीशिवाय या खताचे उत्पादन, साठवणूक आणि विपणन केले जात होते, जे नियमांचे उल्लंघन आहे. याच्या आधारे, गुन्हा क्रमांक २५१/२०२६ नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास लोहारा पोलीस ठाण्याचे स्टेशन हाऊस ऑफिसर, सहायक पोलीस निरीक्षक रोहित चौधरी करत आहेत. पोलिसांनी जप्त केलेल्या मालाचा ताबा घेतला असून पुढील तपास सुरू केला आहे.

# महसूल विभागाच्या दिरंगाईने शेतकऱ्याची २७ आर जमीन अभिलेखातून गायब..!

## न्यायासाठी चार वर्षांची धावपळ, उपोषणाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. १३ :** केळापूर तालुक्यातील भाडउमरी येथील शेतकरी तथा शेतकरी चळवळीचे कार्यकर्ते देवानंद चन्नावार यांच्या सातबारा उताऱ्यावरून तब्बल २७ आर जमीन कमी झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी मागील चार ते पाच वर्षांपासून विविध महसूल कार्यालयांकडे अर्ज, निवेदने व तक्रारी करूनही ठोस कार्यवाही न झाल्याने महसूल प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

चन्नावार यांनी भूमी अभिलेख कार्यालय अमरावती, उपविभागीय अधिकारी कार्यालय केळापूर, तहसीलदार कार्यालय केळापूर आदी संबंधित विभागांकडे वारंवार पाठपुरावा केला. मात्र, अद्याप या प्रकरणाचा अंतिम निकाल लागलेला नसून संबंधित कार्यालयांकडून स्पष्ट अहवाल किंवा निर्णयही देण्यात आलेला नसल्याचा त्यांचा आरोप आहे. या संदर्भात देवानंद चन्नावार यांनी युवा टायगर फोर्सकडे लेखी निवेदन देऊन न्याय मिळवून देण्याची मागणी केली आहे. सातबारा उताऱ्यावरून कमी झालेल्या जमिनीचा शोध घेऊन दोषींवर कारवाई करावी आणि शेतकऱ्याला न्याय द्यावा, अशी त्यांची मागणी आहे. दरम्यान, युवा टायगर फोर्सचे संयोजक अंकित नैताम यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी केली आहे. "एका शेतकऱ्याची २७ आर जमीन अभिलेखातून गायब होऊनही त्याला चार-पाच वर्षे न्यायासाठी भटकावे लागत असेल, तर ही अत्यंत गंभीर बाब आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी जबाबदारीने काम करणे आवश्यक आहे," असे ते म्हणाले. तसेच, देवानंद चन्नावार यांना न्याय न मिळाल्यास आणि महसूल यंत्रणेच्या दिरंगाईविरोधात युवा टायगर फोर्सकडून व्यापक आंदोलन छेडण्यात येईल. आवश्यकता भासल्यास चन्नावार यांच्यासह बेमुदत उपोषण करण्याचाही इशारा संघटनेने दिला आहे.

या प्रकरणाची स्वतंत्र व उच्चस्तरीय चौकशी करून सत्य परिस्थिती स्पष्ट करावी आणि शेतकऱ्याला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी आता परिसरातून जोर धरत आहे.

# आधारच्या जाचक अटी..! दिव्यांग साक्षीला योजनाचा अद्यापही लाभ नाही

## ढाणकीतील हृदयद्रावक वास्तव; जन्मतः अंध व अपंग मुलगी शासकीय मदतीपासून वंचित, आई गंभीर आजाराने ग्रस्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ बन्टी फूलकोडवार



**ढाणकी :** "सबका साथ, सबका विकास"चा नारा देणाऱ्या व्यवस्थेत ढाणकी येथील १६ वर्षीय दिव्यांग मुलगी साक्षी सिद्धार्थ कानिंदे हिची व्यथा मात्र प्रशासनाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. जन्मतः दोन्ही डोळ्यांनी अंध आणि शारीरिकदृष्ट्या अपंग असलेल्या साक्षीला केवळ आधार कार्डाच्या तांत्रिक अटी पूर्ण होत नसल्याने शासकीय योजनांचा लाभ मिळत नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

साक्षीचे बालपणी वडिलांच्या आधारशी लिंक असलेली नोंदणी झाली होती. मात्र, स्वतंत्र आधार कार्ड काढण्यासाठी आवश्यक असलेली बायोमेट्रिक प्रक्रिया तिच्यासाठी अडथळा ठरत आहे. दोन्ही डोळ्यांनी अंध असल्याने आयरिस स्कॅन होत नाही, तर शारीरिक अपंगत्वामुळे हाताचे ठसेही मशीन स्वीकारत नाही. परिणामी, तिचे आधार कार्ड तयार होऊ शकत नसल्याने दिव्यांग प्रमाणपत्र, शासकीय मानधन, शिष्यवृत्ती आणि इतर अनेक कल्याणकारी योजनांचे दरवाजे तिच्यासाठी बंद झाले आहेत. याहूनही दुर्दैवी बाब म्हणजे साक्षीची आई सध्या लिव्हरच्या गंभीर आजाराशी झुंज देत आहे. तिच्या उपचारासाठी कुटुंबाची आर्थिक परिस्थिती पूर्णपणे कोलमडली आहे. वडील सिद्धार्थ कानिंदे हे टेलरिंगचे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मात्र, पत्नीचा उपचार आणि दिव्यांग मुलीचे भविष्य याच्या चिंतेने ते हतबल झाले आहेत. हा प्रश्न केवळ एका कुटुंबाचा नसून, तांत्रिक निकषांमुळे दिव्यांग व्यक्तींना मूलभूत हक्कांपासून वंचित ठेवणाऱ्या व्यवस्थेचा आहे. आधार प्रणालीतील जाचक अटींमुळे जर जन्मतः अंध, हातांचे ठसे न उमटणारे किंवा गंभीर दिव्यांग नागरिक शासकीय योजनांपासून दूर राहत असतील, तर शासनाच्या समावेशक विकासाच्या धोरणालाच तडा जात असल्याची भावना व्यक्त होत आहे. प्रशासनाने अशा विशेष प्रकरणांसाठी मानवी दृष्टिकोन स्वीकारून पर्यायी पडताळणी प्रक्रिया, घरपोच बायोमेट्रिक सेवा किंवा विशेष सवलतीची यंत्रणा तातडीने उपलब्ध करून द्यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांमधून होत आहे.

### दिव्यांगांना तांत्रिक अटींच्या पिंजऱ्यात अडकवू नका!"

**ज्या दिव्यांग व्यक्तींचे डोळ्यांचे स्कॅन किंवा हातांचे ठसे मशीन स्वीकारू शकत नाहीत, त्यांना शासकीय योजनांपासून वंचित ठेवणे हा अन्याय आहे. शासनाने अशा विशेष प्रकरणांसाठी जाचक अटी शिथिल करून पर्यायी ओळख पडताळणीची व्यवस्था करावी. दिव्यांगांना दारोदारी फिरवण्याऐवजी त्यांच्या दारात न्याय पोहोचवण्याची गरज आहे.**

### वडिलांची आर्त हाक

**आज मी साक्षीचा आधार आहे, पण उद्या माझ्या पश्चात तिचे काय? तिला जगण्यासाठी किमान शासनाचे मानधन तरी मिळावे. प्रशासनाने आमची अडचण समजून विशेष बाब म्हणून तिला आधार कार्ड आणि सर्व शासकीय सुविधांचा लाभ मिळवून द्यावा.**

**— सिद्धार्थ कानिंदे,
साक्षीचे वडील**

**क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/५२५/२०२६
तहसिलदार उमरखेड यांचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- २९/०५/२०२६**

**जाहीरनामा**

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार सय्यद तहजीर सय्यद हमीद रा.उमरखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की, त्यांचा स्वताचा जन्म दि-१४/०५/१९७४ मौजा उमरखेड येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्म नोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक १५.०६.२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वा/-
तालुका दंडाधिकारी
उमरखेड

# बिबट्याची कातडी बाळगणाऱ्या तीन आरोपींना अटक

**अमरावती/प्रतिनिधीः-** गुगामल वन्यजीव विभागांतर्गत वन्यजीव गुन्हे नियंत्रण कक्ष, हरिसाल वनपरिक्षेत्रातील वन कर्मचारी तसेच स्वयंसेवी संस्थेच्या संयुक्त कारवाईत बिबट्याच्या कातडीचा तुकडा बेकायदेशीररीत्या बाळगणाऱ्या तीन आरोपींना शुक्रवार, दि. १२ जून २०२६ रोजी अटक करण्यात आली.

सदर कारवाईदरम्यान आरोपीकडून बिबट्याच्या कातडीचा एक तुकडा जप्त करण्यात आला. अटक करण्यात आलेल्यांमध्ये मांगीलाल किशोरी इवणे (वय ४५ वर्ष), रा. चिरा, जि. बैतुल (म.प्र.), पोलीस स्टेशन दामजीपुरा, दिपक बाबुलाल उईके (वय २५ वर्ष), रा. ढालगाव, जि. खंडवा (म.प्र.), पोलीस स्टेशन रोशनी. कमल रतन ठाकूर (वय ३१ वर्ष), रा. धामा गोलाई,



जि. खंडवा (म.प्र.), पोलीस स्टेशन - रोशनी यांचा समावेश आहे. या प्रकरणी वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू आहे. या प्रकरणाचा अधिक तपास गुगामल वन्यजीव विभागामार्फत सुरू असून, जप्त करण्यात आलेल्या बिबट्याच्या कातडीचा उगम, त्यामागील संभाव्य वन्यजीव गुन्हेगारी साखळी, तसेच इतर संबंधित व्यक्तींचा सहभाग याबाबत सखोल चौकशी करण्यात येत आहे.

सदर कारवाई वनपरिक्षेत्र अधिकारी शुभांगी राऊत, दिनेश केंद्रे, स्वप्नील राऊत, मुकेश जावरकर, अनंता नायसे, हरिसाल वनपरिक्षेत्रातील राजेश धुमाळे, मनिषा भुसुम, ज्योती धिकार तसेच वन्यजीव प्रेमी चेतन भारती यांच्या सहभागाने पार पडली. वन्यजीवांच्या अवयवांची बेकायदेशीर शिकार, वाहतूक, ☞(पान २ वर)

# श्रोती हॉस्पिटल खून प्रकरणातील आरोपी जेरबंद

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** यवतमाळ शहरातील श्रोती हॉस्पिटल परिसरात आज दिनांक १३ जून २०२६ रोजी घडलेल्या खून प्रकरणातील आरोपीस अवधूतवाडी पोलिसांनी अवघ्या दोन तासांत ताब्यात घेतले आहे.

मृतक कुसुम महादेव चांदेकर (वय ४५ वर्षे, रा. श्रोती हॉस्पिटल परिसर, यवतमाळ) हिचा आज (दि.१३) सायंकाळी अंदाजे ४.०० ते ४.३० वाजताच्या सुमारास आरोपी हिमांशू रवींद्र भगत (वय २३ वर्षे, रा. श्रोती हॉस्पिटल परिसर, यवतमाळ) याने धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला करून खून केला.




घटनेची थोडक्यात हकीकत अशी की, मृतक व आरोपीची आई यांच्यामध्ये मागील दोन ते तीन महिन्यांपासून किरकोळ कारणांवरून वाद सुरू होता. त्याच वादाचे पर्यवसान आज गंभीर स्वरूप धारण करून सदर खूनाच्या घटनेत झाले.

घटनेची माहिती प्राप्त होताच अवधूतवाडी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथके तयार करून आरोपीचा शोध सुरू करण्यात आला. पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत विविध तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी हिमांशू रवींद्र भगत यास अवघ्या दोन तासांत शोधून ताब्यात घेतले.

सदर कारवाई कुमार चिंथा, पोलीस अधीक्षक यवतमाळ, अशोक थोरात, अपर पोलीस अधीक्षक तथा दिनेश बैसाणे, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या ☞(पान २ वर)

# तीन सराईत वाहनचोर जेरबंद

## १० दुचाकी जप्त, ९ चोरीचे गुन्हे उघड



**अमरावती/प्रतिनिधीः-** वाहन चोरीच्या गुन्ह्यांमध्ये सिटी कोतवाली पोलिसांनी मोठे यश संपादन करत तीन सराईत वाहनचोरांना अटक केली आहे. आरोपींकडून सुमारे ३ लाख ६० हजार रुपये किमतीच्या १० चोरीच्या दुचाकी जप्त करण्यात आल्या असून या कारवाईमुळे अमरावती आयुक्तालयासह इतर जिल्ह्यांमध्ये दाखल असलेले ९ वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रभात चौक परिसरातून चोरीस गेलेल्या होंडा युनिकॉर्न मोटारसायकलीच्या तपासादरम्यान ☞(पान २ वर)

# चेनुष्ठा परिसरात बिबट्याची दहशत

## दोन बिबटे असल्याचा ग्रामस्थांचा दावा

### -वनविभागाची पाहणी सुरू

**तिवसा/प्रतिनिधीः-** तिवसा तालुक्यातील चेनुष्ठा परिसरात गेल्या महिनाभरापासून बिबट्याचा वाढता वावर नागरिकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. विशेष म्हणजे, परिसरात एक नव्हे तर दोन बिबटे मुक्तपणे फिरत असल्याचा दावा ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकरी, शेतमजूर, महिला व शाळकरी विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून चेनुष्ठा येथील नाणीबाई ढोणे तसेच वसुले यांच्या शेताजवळ बिबट्याचे वारंवार दर्शन होत असल्याची ☞(पान २ वर)

> चेनुष्ठा परिसरातील नागरिकांकडून बिबट्याच्या वावराबाबत तक्रार प्राप्त झाली आहे. त्यानुसार वनविभागाचे पथक संबंधित परिसरात सातत्याने पाहणी करीत असून बिबट्याच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. पुरावे संकलित करण्यासाठी व हालचालींचा मागोवा घेण्यासाठी परिसरात ट्रॅप कॅमेरे बसविण्यात येत आहेत.
>
> **- शीतल घुटे, वनपरिक्षेत्र अधिकारी**



# मोदी सरकारच्या १२ वर्षांचा भाजपकडून गौरव..!

## ‘विश्वास, विकास आणि जनकल्याण’चा दावा



**यवतमाळ/प्रतिनिधीः-** केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यकाळानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत ‘विश्वास, विकास आणि जनकल्याण’ या त्रिसूत्रीवर आधारित कामगिरीचा गौरव करण्यात आला. पत्रकार परिषदेत राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी मोदी सरकारने देशाच्या विकासाला नवी दिशा दिल्याचा दावा केला.

यावेळी मोदी यांच्या नेतृत्वाखाली ☞(पान २ वर)

# कार वॉशिंग सेंटरमध्ये राडा

## सहा जण गजाआड, फरार आरोपींचा शोध सुरू



**अमरावती/प्रतिनिधीः-** सातुर्णा परिसरातील एका कार वॉशिंग सेंटरमध्ये घुसून कर्मचाऱ्याला मारहाण, शिवीगाळ आणि चाकूचा धाक दाखवत दहशत निर्माण करणाऱ्या सहा जणांना राजापेठ पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून इतर फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी मोहीम हाती घेतली आहे.

माहितीनुसार, १२ जून रोजी सातुर्णा येथील कार क्युरो सेंटरमध्ये ☞(पान २ वर)

# शहरातील प्रमुख भागात घुमंतू अतिक्रमणांवर कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** मनपा आयुक्त वर्षा लड्डा यांच्या निर्देशानुसार शहरातील वाढत्या अतिक्रमणांवर नियंत्रण मिळवण्यासाठी आज (दि.१३) सकाळी ७.३० ते १०.३० वाजेदरम्यान पोलीस विभाग व महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने संयुक्तपणे विशेष मोहीम राबवून मोठी कारवाई केली.






राजकमल चौक, श्याम चौक, तहसील कार्यालय परिसर, जवाहर गेट, इतवारा बाजार, शनी मंदिर परिसर आदी महत्त्वाच्या व गर्दीच्या भागांमध्ये ही मोहीम राबविण्यात आली. कारवाईदरम्यान अंदाजे २५ ते ३० घुमंतू ☞(पान २ वर)

# नेहरू चौकातील पानपट्टीवर एफडीएचा छापा

## १९ हजारांचा प्रतिबंधित सुगंधित तंबाखू जप्त

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अन्न व औषध प्रशासन (FDA) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यापासून राज्यभरात भेसळखोर आणि गुटखा विक्रेत्यांविरुद्ध मोहिमेचा धडाका लावला आहे. याच पार्श्वभूमीवर, अंजनगाव सुर्जी येथील नेहरू चौक परिसरातील एका पानपट्टीवर अन्न सुरक्षा व औषध प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत महाराष्ट्रात विक्रीस प्रतिबंधित असलेला सुगंधित तंबाखू आणि विविध प्रकारची स्वीट सुपारी जप्त करण्यात आली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, ही कारवाई ११ जून रोजी सायंकाळी नेहरू चौक परिसरातील ’बजरंग पान मटेरियल’ या दुकानावर करण्यात आली. या दुकानाचा चालक जितेंद्र ☞(पान २ वर)

# शिराळ्यात चोरट्यांचा धुमाकूळ

## एका रात्रीत दोन घरांवर डल्ला

**अमरावती/प्रतिनिधीः-** वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिराळा गावात चोरट्यांनी एका रात्रीत दोन घरांमध्ये घरफोडी करून तब्बल ४ लाख २६ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, शिराळा येथील निकेश दिलीपराव इंगोले (वय ३९) हे गुरुवारी रात्री कुटुंबासह घरात झोपले होते. शुक्रवारी सकाळी उठल्यानंतर घराच्या मुख्य दरवाज्याचा कडीकोंडा तुटलेला असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. घरातील आलमारीची पाहणी केली असता कुलूप तोडून त्यामधील सुमारे ३ लाख रुपये किमतीचे ☞(पान २ वर)

# श्री हव्याप्र मंडळाच्या समर्थ वारेला शूटिंग स्पर्धेत रौप्यपदक

## महाराष्ट्र राज्य शुटींग स्पर्धेत यश : पूर्व राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**अमरावती/प्रतिनिधीः-** मुंबई येथे ३ ते ९ जून २०२६ दरम्यान आयोजित २९ व्या कॅप्टन इझेकीएल मेमोरियल महाराष्ट्र स्टेट शूटिंग चॅम्पियनशिप-२०२६ मध्ये श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ संचालित शूटिंग रेंजच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत अमरावतीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. स्पर्धेतील २५ ☞(पान २ वर)



# स्मशानभूमी परिसरातून सराईत गुन्हेगार ताब्यात, -घातक चाकू जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात गंभीर स्वरूपाचा गुन्हा घडविण्याच्या तयारीत असल्याच्या संशयावरून गुन्हे शाखा युनिट-२च्या पथकाने एका सराईत गुन्हेगाराला ताब्यात घेतले. आरोपीकडून घातक लोखंडी चाकू जप्त करण्यात आला असून त्याच्याविरुद्ध फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, गुणवंत बाबा मंदिरासमोरील हिंदू स्मशानभूमी परिसरात एक युवक संशयास्पद हालचाली करत थांबला असून त्याच्याकडे घातक शस्त्र असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीची पडताळणी करण्यासाठी गुन्हे शाखा ☞(पान २ वर)



# ७० हजारांची लाच घेताना गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकाला अटक

## खत नमुन्यांची कारवाई टाळण्यासाठी मागितली लाच

**अमरावती/प्रतिनिधीः-** कृषी केंद्रातील खत नमुन्यांवरील कारवाई टाळण्यासाठी ७० हजार रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात पकडल्याने कृषी विभागात खळबळ उडाली आहे. आरोपीने ही रक्कम स्वतःच्या वाहनात स्वीकारताच एसीबीच्या पथकाने कारवाई करत त्याला ताब्यात घेतले.



मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराच्या कृषी केंद्रातून घेण्यात आलेल्या खत नमुन्यांवर पुढील कारवाई न करण्यासाठी तसेच भविष्यात अन्य कंपन्यांच्या खतांचे नमुने न घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्याने पैशांची मागणी केली होती. याबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर एसीबीने गोपनीय पडताळणी केली. चौकशीत दोन खत नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी न पाठविण्याच्या बदल्यात प्रत्येकी २० हजार रुपये आणि आणखी दोन कंपन्यांच्या खतांचे नमुने ☞(पान २ वर)

# शिवमंदिरातील पंचमुखी नागमूर्ती चोरीचा पर्दाफाश

## आरोपी अटकेत, मूर्ती जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** न्यू पुष्पक कॉलनी येथील शिवमंदिरातून चोरीस गेलेल्या अष्टधातूच्या पंचमुखी नागमूर्ती प्रकरणाचा खोलापुरी गेट पोलिसांनी अवघ्या एका दिवसात छडा लावत आरोपीला अटक केली आहे. आरोपीकडून चोरीस गेलेली नागमूर्ती हस्तगत करण्यात आल्याने भाविकांनी समाधान व्यक्त केले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, न्यू पुष्पक कॉलनीतील शिवमंदिरात शंकराच्या पिंडीवर स्थापित असलेली सुमारे ७ हजार रुपये किमतीची अष्टधातूची पंचमुखी नागमूर्ती



११ जून रोजी सकाळपर्यंत मंदिरात होती. मात्र सायंकाळी ☞(पान २ वर)

# हरवलेले १३३ मोबाईल मालकांना परत

## सायबर तंत्रज्ञानाच्या जोरावर ग्रामीण पोलिसांची कामगिरी

**अमरावती/प्रतिनिधीः-** हरवलेला मोबाईल परत मिळणे अनेकांसाठी अशक्यप्राय वाटत असते. मात्र अमरावती ग्रामीण पोलिसांनी आधुनिक सायबर तंत्रज्ञानाच्या मदतीने तब्बल १३३ हरवलेले मोबाईल शोधून काढत १८ लाख १८ हजार रुपयांचा मुद्देमाल मूळ मालकांच्या ताब्यात दिला आहे. या कामगिरीमुळे नागरिकांमध्ये पोलिसांविषयी विश्वास अधिक दृढ झाला आहे.

जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये मोबाईल हरवल्याच्या तक्रारींची दखल घेत अमरावती ग्रामीण पोलिसांनी विशेष शोधमोहीम हाती घेतली. सीईआयआर पोर्टल आणि तांत्रिक विश्लेषणाच्या साहाय्याने हरवलेल्या मोबाईलचा मागोवा घेण्यात आला. सायबर पोलिसांनी मोबाईलचे लोकेशन शोधून विविध ठिकाणांहून ते हस्तगत केले. या मोहिमेत शोधण्यात आलेल्या सर्व मोबाईलची एकत्रित किंमत १८ लाख १८ हजार रुपये इतकी असून ते संबंधित मालकांच्या स्वाधीन करण्यात आले. दीर्घकाळानंतर आपले मोबाईल परत ☞(पान २ वर)



# तृणमूलमधील बंड

**तृणमूल हा ममताबाईंच्या कुटुंबाचा खासगी मालकीचा पक्ष बनल्याने त्या आपल्या भाच्याशिवाय अन्य कोणाही नेत्याच्या हातात पक्षाची सूत्रे देण्यास तयार नाहीत, हे दिसल्याने तृणमूल आमदारांना बंडाचा झेंडा फडकावण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही.**

पश्चिम बंगालमधील भारतीय जनता पार्टीच्या दणदणीत विजयामुळे राष्ट्रीय राजकारणाला बसलेल्या हादऱ्याचे धक्के अजूनही जाणवताहेत. सलग १५ वर्षे पश्चिम बंगालची सत्ता निरंकुश पद्धतीने भोगलेल्या तृणमूल काँग्रेसमध्ये मोठी फूट पडली आहे. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीचे ४ मे रोजी निकाल लागले आणि अवघ्या महिन्याभरात तृणमूल काँग्रेसमध्ये घडलेल्या घडामोडी पाहिल्यावर हा पक्ष किती भुसभुशीत पायावर उभा होता हे दिसून आले आहे. तृणमूल काँग्रेसचे ८० आमदार या वेळच्या निवडणुकीत निवडून आले आहेत. त्यातील ६० आमदारांनी एकत्र येऊन आमचाच पक्ष खरा तृणमूल असल्याचा दावा करीत ममता बॅनर्जींनी निवडलेल्या गटनेत्याची नियुक्ती अमान्य केली. याचा सरळसरळ अर्थ असा आहे की निवडून आलेल्या आमदारांनी आता ममताबाईंचे नेतृत्व झुगारून दिले आहे. ममताबाईंच्या नेतृत्वाखाली आणि ममतांचा भाचा अभिषेक बॅनर्जी याच्या छत्रछायेखाली काम केल्यास आपल्याला भवितव्य नाही असे लक्षात आल्यामुळेच या आमदारांनी पक्षाच्या नेतृत्वाविरोधात बंडाचा झेंडा फडकावला आहे. या घडामोडीमुळे ममता बॅनर्जी यांच्या राजकीय अस्तित्वाचाच प्रश्न उभा राहिला आहे. सलग १५ वर्षे सत्ता भोगलेल्या पक्षाचे दोन तृतीयांश संख्येपेक्षा अधिक आमदार एका झटक्यात पक्षाच्या सर्वोच्च नेतृत्वाचा निर्णय झुगारून देतात त्यावेळी या पक्षाचा संघटनात्मक आधार किती पोकळ होता हेच दिसते. भारतीय जनता पार्टीच्या विजयानंतर पश्चिम बंगालमध्ये तृणमूलच्या राजवटीविरोधात असलेला असंतोष प्रचंड प्रमाणात उफाळून येत आहे. अभिषेक बॅनर्जी यांना झालेली मारहाण राष्ट्रीय पातळीवरील बातम्यांचा विषय ठरली. पण त्याखेरीज तेथे घडलेल्या अनेक घटना तृणमूलच्या दडपशाही राजवटीविरोधात सामान्य माणसाच्या मनात किती संताप खदखदतो आहे, याचे प्रतीक आहेत. तृणमूलच्या पदाधिकाऱ्यांच्या घरात घुसून जनतेकडून त्यांनी वसूल केलेली खंडणी, हप्त्याची रक्कम वसूल केली जात आहे. पश्चिम बंगालमध्ये सरकारच्या नावावर गुंडपुंडांचे, जिहाद्यांचेच राज्य चालत होते हेच दर्शविणाऱ्या या घटना आहेत. याविरोधातील उद्रेक हळूहळू राज्यभरात होतो आहे. या उद्रेकाचा फटका आपल्याला बसू नये म्हणूनच तृणमूलच्या अनेक आमदारांनी स्वतःला ममता, अभिषेकपासून दूर ठेवण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. विधानसभा निवडणुकीत एवढा मोठा फटका बसूनही ममताबाई आपला भाचा अभिषेक याच्याकडेच पक्षाची सूत्रे पुन्हा देताहेत हे अनेक आमदारांना पसंत पडलेले नाही. तृणमूल हा ममताबाईंच्या कुटुंबाच्या खासगी मालकीचा पक्ष बनल्याने त्या आपल्या भाच्याशिवाय अन्य कोणाही नेत्याच्या हातात पक्षाची सूत्रे देण्यास तयार नाहीत, हे दिसल्याने या आमदारांना बंडाचा झेंडा फडकावण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही.

या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीचा आजवरचा प्रवास आठवतो. १९७९ मध्ये जनता पक्षातील जनसंघाच्या नेत्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंध ठेवू नयेत, अशी मागणी जनता पक्षातील समाजवादी विचाराच्या मंडळींनी केली. ही मागणी अमान्य करत अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी या मंडळींनी जनता पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही आमची मातृसंस्था असून सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या विचारधारेवर आम्ही ठाम आहोत, अशी भूमिका घेत अटलजी आणि अडवाणी यांनी भारतीय जनता पार्टीची स्थापना करण्याचा निर्णय जाहीर केला.

१९८० ते २०२५ या ४५ वर्षांच्या इतिहासात भारतीय जनता पार्टीने अनेक खाचखळगे अनुभवले, टिंगलटवाळी सहन केली. मात्र अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत पक्ष वाढवताना पक्षाच्या विचारधारेशी कधीच तडजोड केली नाही. भारतीय जनता पार्टीची स्थापना होत असताना भारतीय लोकदल, पूर्वाश्रमीच्या समाजवादी विचारधारेच्या मंडळींचा जनता पक्ष, दोन्ही कम्युनिस्ट पक्ष हे प्रमुख विरोधी पक्ष म्हणून राष्ट्रीय राजकारणात काँग्रेसला आव्हान देत होते. यातील जनता पार्टी आणि लोकदलाने जनता दलाच्या रूपाने १९८० च्या उत्तरार्धात आणि १९९० च्या पूर्वार्धात राष्ट्रीय राजकारणात लक्षणीय स्थान मिळवले होते. जनता दलाने काही काळ आघाडीच्या रूपाने केंद्रातील सत्ताही काही काळ उपभोगली. मात्र हे सर्व पक्ष आता राष्ट्रीय राजकारणात नगण्य ठरले आहेत. समाजवादी विचारधारेचे समाजवादी पार्टी आणि राष्ट्रीय जनता दल हे दोन पक्ष उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये आपले अस्तित्व राखून आहेत. मात्र हे दोन्ही पक्ष एकेका कुटुंबापुरते मर्यादित झाले आहेत. कम्युनिस्ट पक्षाचे केरळबाहेर अस्तित्वही दिसत नाही. भारतीय जनता पार्टी मात्र या ४६ वर्षांत सातत्याने वाढत जाणारा पक्ष ठरला आहे. याचे कारण भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाने प्रखर राष्ट्रवादाची विचारसरणी सत्तेसाठी कधीच सोडली नाही. त्या आधी जनसंघाने १९५१ पासून राष्ट्रीय राजकारणात पाऊल ठेवल्यानंतर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत पक्ष संघटनेची बांधणी केली. सत्ता मिळण्याची दूरदूर शक्यता दिसत नसतानाही जनसंघाने आपली निष्ठावान कार्यकर्त्यांची फौज देशभर निर्माण केली. १९८४ मध्ये अटलबिहारी वाजपेयींसह पक्षाचे अनेक वरिष्ठ नेते पराभूत झाले तरी पक्षाचा एकही कार्यकर्ता सत्तेच्या वळचणीला गेला नाही. २०२१ मध्ये पश्चिम बंगालमध्ये भाजपाचे ७७ आमदार निवडून आले होते. यापैकी काही आमदार वगळता अन्य सर्व आमदारांनी पक्षात राहून तृणमूलविरोधात लढा दिला. २०२१ पासून ३०० पेक्षा अधिक भाजपा कार्यकर्त्यांच्या हत्या झाल्या तरी ममतांच्या दहशतीविरोधातील भाजपाचा आवाज बुलंदच राहिला.

त्यामुळेच यावेळच्या निवडणुकीत मतदारांनी भाजपाला तृणमूलचा सशक्त पर्याय म्हणून निवडले. प्रखर राष्ट्रवादाची विचारसरणी हाच भाजपाचा भक्कम वैचारिक पाया आहे. असा पाया अन्य पक्षांकडे नसल्याने राष्ट्रीय राजकारणात असे पक्ष कसेबसे टिकून आहेत. भाजपच्या या यशोगाथेतून बोध घेणे दूरच राहिले, पण विरोधी पक्ष केवळ भाजपला दूषणे देण्यात धन्यता मानतात हे दुर्दैवी आहे.

# ही अस्थिरता अराजकतेकडे नेऊ शकते?

**महाराष्ट्रात या निवडणुकीमुळे आचारसंहिता लागल्यामुळे सर्व कामे ठप्प झाली आहेत. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीला खीळ बसली असून महाराष्ट्रात अस्थिरता निर्माण करण्याचे प्रयत्न वेगवेगळ्या घटकांकडून सुरु आहेत.**

**अरविंद भानुशाली**



राज्यात सध्या निवडणुकीचे वारे वाहत असून पहिल्या राउंडमध्ये महायुती वरचढ ठरली आहे. तर महाविकास आघाडीचा पाला-पाचोळा झाल्याचे चित्र समोर आले आहे. महाविकास आघाडीने दिलेले उमेदवार पळून गेल्याने सहा ठिकाणी महायुतीचे उमेदवार निवडणूक न लढवता विजयी झाले आहेत. महाराष्ट्रात या निवडणुकीमुळे आचारसंहिता लागल्यामुळे सर्व कामे ठप्प झाली आहेत. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीला खीळ बसली असून महाराष्ट्रात अस्थिरता निर्माण करण्याचे प्रयत्न वेगवेगळ्या घटकांकडून सुरु आहेत. पुणे व नाशिक हे दोन जिल्हे विविध विषयाने सध्या महाराष्ट्राच्या गुन्हेगारीमध्ये गाजत आहेत.

महायुतीमध्ये रस्सीखेच सुरु असून तीच परिस्थिती महाविकास आघाडीमध्ये दिसत आहे. मित्र पक्ष परस्परांवर चिखलफेक करत आहेत. बंडखोरी शमविण्यात महायुतीला ५० टक्के यश आले आहे. त्यामुळे महायुतीबाबतही निराशा झाली आहे. या निवडणुकीमुळे महत्वाचे विषय बाजूला पडले आहेत. अशोक खरात या भोंदू बाबाने तंत्र-मंत्राच्या आधारावर कोट्यवधींची संपत्ती राजकारण्यांच्या आशीर्वादाने जमा केली आहे. तर इकडे नीट पेपर फुटीमुळे शिक्षण क्षेत्रात गोंधळ झाला आहे. तर तिकडे राहुल गांधी मोदीसरकार हे वर्षभरात पडणार अशी भविष्यवाणी व्यक्त करीत आहेत.

महायुतीमधील घटक पक्षात आता स्थिरता राहिली नसून आरोप प्रत्यारोप आता सुरु आहेत. संभाजीनगर जिल्ह्यातील शिवसेनेचे अब्दुल सत्तार यांनी भाजप विरोधात आघाडी उघडली आहे. तर इकडे संजय राऊत यांनी दोन्ही शिवसेना एकत्र येणाची चर्चा सुरु केली आहे. ज्यांना पश्चाताप होत असेल त्यांना मातोश्रीचे दरवाजे उघडे आहेत. गेल्या काही महिन्यात उद्धव ठाकरे यांनी गद्दारांना आमच्याकडे थारा नाही असे वक्तव्य केले आहे. विरोधकांमध्ये फूट पाडण्याचे उद्योग मोठ्या प्रमाणात सुरु आहेत. राष्ट्रवादीचे विलीनीकरण बाजूला पडले असतांना दोन्ही शिवसेना एकत्र येणाचे राजकारण सुरु आहे. राज्यात एकूण सर्वत्र गोंधळ सुरु आहे. राज्यात पुन्हा कायदा सुव्यस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

पुणे पिंपरी चिंचवड आदी भागात विषारी दारूने माणसे मरत आहेत. २१ पोलिसांना व वरिष्ठांना निलंबित केले असले तरी मुख्य प्रश्न सुटत नाहीत. नीट पेपर फुटीमुळे तर केंद्र व राज्य सरकारची अब्रू चव्हाट्यावर आली आहे. याच बरोबर नाशिकचे टीसीएस कंपनीतील धर्मांतर प्रकरण गाजत आहे. याप्रकरणीचा तपास सीआयडी सीबीआय क्राईम ब्रांच करीत असले तरी अजून ते कोणत्याही निष्कर्षापर्यन्त आले नाहीत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृह खात्याचा कारभार आहे. सध्या कायदा सुव्यवस्था या बाबतच चर्चा सुरु आहे. पोलिसांचा धाक राजकारणाच्या हस्तक्षेपामुळे राहिला नाही ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. परिस्थिती अशीच राहिल्यास अराजकसदृश्य परिस्थिती निर्माण होण्यास वेळ लागणार नाही. एका बाजूला निवडणुकीचे राजकारण तर दुसऱ्या बाजूला महाराष्ट्रात प्रक्षोभ निर्माण करण्याचे वातावरण हे चिंताजनक आहे.

जरांगे - पाटील यांच्यापुढे राज्य सरकारने लोटांगणंच घातले असल्याचे दृश्य गेले काही दिवस दिसून येत आहे. मंत्री व नेते आपली आसने सोडून जरांगे पाटील यांच्यामागे धावत असल्याचे दृश्य गेले आठवड्याभरात दिसून येते. त्यामुळे मोठा घटक असलेला ओबीसी समाज हाही संतप्त होऊन रस्त्यावर उतरण्याची भाषा करीत आहे. राज्य सरकारच्या विरोधात विरोधकांनी दंड थोपटले आहेत.

देशात शिक्षण क्षेत्रात आज जो सावळा गोंधळ चालू आहे. त्यामुळे विद्यार्थी, तरुण मंडळी संतापली आहे. आधार म्हणून त्यांनी कॉक्रोच पार्टीचा हात धरला तर त्यात नवल नाही. कॉक्रोच जनता पार्टीचे मोहोळ येत आहे. तरुणांमध्ये अस्थिरता असल्याने यापैकी काही तरुण कॉक्रोच पार्टीकडे वळले आहेत. पेपर फुटीचे हे आंदोलन आज कॉक्रोच पार्टीने हाती घेतले आहे तर दुसऱ्या बाजूला शरद पवार राष्ट्रवादीचा काही संबंध नसतांना रोहित पवार हे अस्थिरता निर्माण करत असल्याचे चित्र समोर येत आहे. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी कॉक्रोच पार्टीला समर्थन देण्याचे जाहीर केले. १४० कोटी भारतीय जनतेच्या पुढे २५ ते ३० लाख तरुणांचा सोशल मीडिया पॉवरफुल ठरल्याच्या आरोळ्या मारल्या जात आहेत. यापूर्वी या देशाने जनता राजवटीचा अनुभव घेतला आहे. काँग्रेसच्या विरोधात १९६६ मध्ये सर्व विरोधक एकत्र आले होते. त्यामध्ये बिहारमध्ये कर्पुरी ठाकूर, मध्यप्रदेशमध्ये वीरेंद्रकुमार सकलेचा, उत्तरप्रदेशमध्ये जे बी कृपलानी यांच्या पत्नी मुख्यमंत्री झाल्या होत्या. १९७५ची आणीबाणी आजही डोळ्यसमोरून जात नाही. इंदिरा गांधींचे सरकार पाडून जनता पार्टीच्या हाती सत्ता आली होती. परंतु आपापसातील मतभेदामुळे ही जनता पार्टी लयाला गेली.

इंदिरा गांधी मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्या आणि शरद पवारांचे पंतप्रधान पदाचे स्वप्न हे स्वप्नच राहिले. शरद पवारांनी तर सोनिया गांधी ह्या परदेशी आहेत म्हणून दुसरं बंड केले होते, परंतु पुढे हे बंडही टिकले नाही. आता पवारांना बुद्धी सुचली आहे की, त्यावेळी आपण सोनिया गांधींवर जे बोललो ते बोलून चूक केली. शरद पवारांचे हातपाय चालत नसतांना ते राज्यसभेची शपथ घेण्यासाठी व्हीलचेयरवरून गेले हे राज्यातील जनतेने पाहिले आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात पवार कुटुंब कधीच मागे पडले नाही. एका बाजूला मराठा समाजाला पाठिंबा देऊन आर्थिक मदत करायची तर दुसऱ्या बाजूला ओबीसी घटकांना मदत करून त्यांनाही धरून ठेवण्याची कसरत त्यांनी केली. त्यातूनच शरद पवार विरुद्ध अजित पवार असा वाद झाला. पवारांचे कुरघोडीचे राजकारण आता समोर येत आहे. त्याची परिणती विधान परिषदेत दिसून आली. त्यांनी दिलेल्या उमेदवारांना रणांगणातून पळ काढावा लागला.

भारत देशावर सध्या युद्धाचे ढग दिसत असून त्यामुळे डिझेल, पेट्रोल, गॅस व त्यावर अवलंबून असणारे उद्योग डबघाईस आले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही उपाययोजना सुचविल्या आहेत. त्याची अंमलबजावणी करण्यापेक्षा त्याच्यावरही वार केले जात आहेत. महाराष्ट्रात तर काल पक्षांतर करून आलेल्यांना उमेदवारी दिली जाते. हा निकषच चुकीचा आहे. अहिल्यानगरचे प्राजक्त तनपुरे काल शरद पवार गटातून महायुतीकडे आले त्यांना ४८ तासात विधान परिषदेची उमेदवारी दिली. तर इकडे राष्ट्रवादीमध्ये काकडे बंधू भाजपला सोडून अजित पवार गटात गेले. त्या काकडेंना राष्ट्रवादीची उमेदवारी दिली. मित्र पक्षच एकमेकांचे पाय ओढत असल्याचे दिसत आहे. संभाजी नगरमध्ये शिंदे यांच्या शिवसेनेला जोरदार धक्का बसला आहे. शिवसेनेचे मंत्री भाजपा नेत्यांवर आरोप करत आहेत. नुसतेच आरोप नाहीत तर बंडाची भाषा केली जात आहे. असे किती दिवस चालणार? विरोधक महायुतीमध्ये मिठाचा खडा टाकत असले तरी प्रत्यक्षात महायुतीमध्ये काही आलबेल नाही. विधान परिषद निवडणुकीत त्याची प्रचिती समोर येत आहे. तिकडे डोंबिवलीमध्ये भाजपाच्या माजी नगरसेवकांना शिवसेनेत घेतले जात आहे. महायुती म्हणून याला काही अर्थ राहिला आहे असे दिसत नाही. एकूणच राज्यात सर्वत्र कुणाचा पायपोस कुणाच्यात राहिलेला नाही असे दिसून येते. सध्या महाराष्ट्रात रोज नवीन विषय समोर येत आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील जनतेला काटकसरीचे सल्ले द्यावे त्यावरही राजकारण केले जात आहे. यापूर्वी काँग्रेसचे सरकार असतांना याहीपेक्षा कडक निर्बंध घातले जात होते. उदाहरण द्यायचे म्हटल्यास स्व. लाल बहादूर शास्त्री यांनी जनतेने एक दिवस बुधवारी उपवास करावा असे म्हटले होते तर भारत चीन युद्धानंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांनी देशाची आर्थिक परिस्थिती बिघडल्याने हजारो क्विंटल सोन जमा केल होते.

त्याचबरोबर १९७१ च्या बांगलादेश भारत युद्धात इंदिरा गांधी यांनी आवाहन केले होते त्याला जनतेने प्रतिसाद दिला होता.

सध्या देश प्रथम ही भावना पुसण्याचे राजकारण चालू आहे. यातूनच अराजकाची स्थिती निर्माण होण्याची धास्ती आहे. विविध पक्षाचे प्रवक्ते हे स्वतःच्या पक्षबद्दल काही बोलत नाहीत, मात्र देशात व जगात काय चालले आहे यावर शेरेबाजी करत आहेत. पूर्वी असे होत नव्हते.

महाराष्ट्रात काँग्रेसच्या काळात विरोधक नगण्य होते, परंतु त्यांनी कधी राष्ट्रविरोधी भूमिका घेतली नाही. सध्या सोशल मीडियाला हाती धरून महाराष्ट्र पेटवण्याची भूमिका चालू आहे.



# तप विश्वास, विकास आणि जनसहभागाचे !

तब्बल १२ वर्षे म्हटले की आपण सवयीने एक तप असे म्हणतो. तप या शब्दातच तावून-सुलाखून निघण्याचा संघर्ष आहे, ध्येयपूर्तीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आणि लक्ष्यप्राप्तीसाठीचा संकल्प. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाचे एक तप पूर्ण झाले, असे म्हणतो तेव्हा तिन्ही कसोटींवर परीक्षण केले जाणे आवश्यक आहे.

तपश्चर्येला दोन बाजू असतात. ही तपश्चर्या समाजासाठी असली तर त्याचे फळ समाजालाच मिळते, समाजातील अनेक घटकांना त्याचा लाभ होतो. मोदीजींच्या या तपश्चर्येचे फळ म्हणजे भारतातील सर्वसामान्य माणसाच्या जीवनात आलेली अभूतपूर्व क्रांती आहे. मोदीजींची २०१४ ते २०२६ ही १२ वर्षांची वाटचाल अशाच एका परिवर्तनकारी युगाची साक्ष देणारी आहे. ही केवळ सत्तेची बारा वर्षे नसून विश्वास, विकास, सुशासन, सांस्कृतिक पुनर्जागरण आणि जनकल्याण यांचा अभूतपूर्व संगम आहे.

आज आणखी एक विशेष बाब आहे, निर्वाचित पंतप्रधान म्हणून सलग ४३९९ दिवस मोदीजींनी पूर्ण केले. असे करताना त्यांनी पं. नेहरू यांचा विक्रम मोडला. नेहरूजी आणि मोदीजी यांची तुलनाच होऊ शकत नाही अशी वल्गना काही लोक करतील. नेहरूजी ज्या काळात प्रधानमंत्री झाले तेव्हा नेहरूजींना पर्याय नाही अशीच काहीशी भारतीय समाजाची मानसिकता होती, पण मोदीजी जेव्हा प्रधानमंत्री झाले तेव्हा लोक संवैधानिकदृष्ट्या प्रगल्भ झाले होते. त्यांना मतदानाचा अधिकार, त्याचे महत्त्व समजले होते. आपल्या आशा, आकांक्षा काय आहेत, याची जाणीव स्पष्ट झाली होती. सरकार लोककल्याणासाठीच आहे, हे त्यांना माहिती होते. अशा काळात मोदीजी यांचे सरकार आले होते, त्यामुळे जे काँग्रेसला ५०-६० वर्षांत जमले नाही ते करून दाखवण्याचे आव्हानच जनतेने त्यांच्या नेतृत्वाला भरभरून मते देऊन २०१४ मध्ये दिले आणि त्या आव्हानाला शिरोधार्य मानत मोदीजींचा 'सब का साथ-सब का विकास' हा प्रवास सुरू झाला. मग 'सब का विश्वास-सब का प्रयास' असे वेळोवेळी जोडले गेले. २०१४, २०१९ आणि २०२४ असे यशाचे टप्पे पार करीत ते आज भारताला वैश्विक नेतृत्व प्रदान करीत आहेत.

२०१४ आणि २०१९ मधील सुस्पष्ट जनादेशानंतर २०२४ मधील विजय हे केवळ निवडणुकीतील यश नव्हते, तर जनतेने विकास, सुशासन आणि स्थिर नेतृत्वावर व्यक्त केलेला पुनर्विश्वास होता. १९६२ नंतर सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपद मिळवणारे नरेंद्र मोदी हे देशातील पहिले नेते ठरले. जगातील अनेक लोकशाही व्यवस्था राजकीय अस्थिरतेशी झुंज देत असताना भारताने स्थैर्य, सातत्य आणि निर्णायक नेतृत्वाचा मार्ग निवडला. गेल्या दशकात मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने राजकीय स्थैर्याला विकासाची जोड दिली. आर्थिक सुधारणा, सामाजिक परिवर्तन, पायाभूत सुविधा विकास, राष्ट्रीय सुरक्षा आणि प्रभावी परराष्ट्र धोरण यामुळे भारत आज जागतिक स्तरावर अधिक सक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि प्रभावी राष्ट्र म्हणून उदयास आला आहे. २४ हून अधिक राष्ट्रांनी त्यांना दिलेले सर्वोच्च सन्मान ही त्याची पावती आहे.

हा फक्त एक नेतृत्वाचा प्रवास नव्हता, यामध्ये भारतीय जनता सहभागीदार होती हेच या प्रवासाचे वैशिष्ट्य आहे आणि फलित म्हणाल तर भारताची अर्थव्यवस्था दोन ट्रिलियन डॉलरवरून ४.१८ ट्रिलियन डॉलर! जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था. जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था. सामाजिक न्यायाची स्थापना करायची असेल तर आधी आपली आर्थिक बाजू समृद्ध असली पाहिजे, ही मोदीजींनी फक्त जाणले नाही तर त्यासाठी त्यांनी सर्व स्तरावर प्रयत्न केले. मेक इन इंडिया असो किंवा आत्मनिर्भर भारत असो, यांनी भारतीयांना आत्मविश्वास तर दिला पण भारतीय वस्तूंबद्दल जगामध्ये विश्वास जागवला. आज स्वदेशी शस्त्रास्त्रांची मागणी इतकी वाढली आहे की, पुढील दहा वर्षांचे उत्पादनही अपुरे पडेल. हीच आत्मनिर्भर भारताची खरी ताकद आहे.

देशातील १२ राज्यांमधून नक्षलवादाचा प्रभाव कमी करणे ही मोदी सरकारची ऐतिहासिक उपलब्धी आहे. अनेक दशकांपासून विकासापासून वंचित असलेल्या भागात आता विकासाची गंगा पोहोचत आहे. देशभरात २० कोटी लोक भीती आणि गरिबीच्या सावटाखाली जगत होते. नक्षलवादामुळे विकास पोहोचत नव्हता. हजारो युवकांचे जीवन उद्ध्वस्त झाले. पण आज परिस्थिती बदलत आहे. गडचिरोलीसारख्या भागात स्टील उद्योग उभे राहत आहेत. विद्यापीठे, मेडिकल कॉलेज, मोठ्या शैक्षणिक संस्था सुरू होत आहेत. कारण बंदुकीच्या आवाजावर विकासाच्या आवाजाने विजय मिळवला आहे.गेल्या १२ वर्षांत भारताने पायाभूत सुविधांच्या विकासात अभूतपूर्व झेप घेतली आहे. राष्ट्रीय महामार्गांचे जाळे ९१ हजार किलोमीटरवरून सुमारे १.४६ लाख किलोमीटरपर्यंत विस्तारले. दररोज सरासरी ३४ किलोमीटर महामार्ग बांधले जात आहेत. ग्रामीण भारताच्या विकासासाठी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत लाखो किलोमीटर रस्त्यांची उभारणी करण्यात आली.या रस्त्यांमुळे शेतकरी, विद्यार्थी आणि ग्रामीण नागरिकांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला आहे. रेल्वे क्षेत्रात ब्रॉडगेज विद्युतीकरण गतीने होत असून वंदे भारत एक्स्प्रेस, अमृत भारत स्टेशन योजना आणि आधुनिक रेल्वे स्थानकांमुळे भारतीय रेल्वेची ओळख बदलली आहे.

# चहा करताना आधी दूध घालावं की पाणी?



बऱ्याच लोकांची सकाळची सुरूवात चहा पिऊनच होते. काहीजण दिवसातून तीन ते चार वेळा चहा घेतातच घेतात तर काहीजण दिवसभरातून २ वेळा आवडीनं चहा पितात. चहा प्यायल्यानं मूड चांगला राहतो याशिवाय फ्रेशही वाटते. चहा करण्याची पद्धत प्रत्येक घरात वेगवेगळी असते.

काही लोक आधी दूध उकळवून घेतात नंतर त्यात पाणी, चहा पावडर आणि इतर मसाले घालतात. तर काहीजण उकळत्या पाण्यात चहा पावडर, साखर घालून नंतर शेवटी दूध घालतात. या दोन्हींपैकी चहा करण्याची योग्य पद्धत कोणती हे समजून घेणं फार महत्वाचं आहे. चहा करताना आधी दूध घालायचं की पाणी ते समजून घेऊ.

एक्सपर्ट्स सांगतात की चांगला चहा करण्यासाठी सगळ्यात आधी पाणी उकळवून घ्या. नंतर पाण्यात चहा पावडर, आलं, वेलची आणि बाकीचे खडे मसाले घालून शिजवून घ्या. त्यामुळे यातून सुगंध आणि चव पाण्यात उतरते. यामुळे चहाची ओव्हर ऑल चव चांगली लागते. नंतर लो ते मीडियम फ्लेमवर ४ ते ५ मिनिटं व्यवस्थित शिजवून घ्या. नंतर यात गरजेनुसार दूध घाला. ज्यामुळे चहा एकदम सुगंधित आणि स्वादीष्ट होईल. आलं, वेलची, लवंग व्यवस्थित कुटून पेस्ट तयार करून घ्या. ही पेस्ट पाण्यात घाला. यामुळे मसाल्यांचा अर्क व्यवस्थित पाण्यात उतरतो. ज्यामुळे चहा एकदम स्वादीष्ट आणि चवदार होतो.

जर तुम्ही चहात आधी दूध घातलं तर चहा अजिबात बिघडत नाही. ज्यांना दुधाचा चहा आवडतो ते लोक दुधात चहा पावडर, साखर आणि आवडीचे मसाले घालून चहा उकळवतात. यामुळे चहा क्रिमी बनतो पण मसाल्यांचा फ्लेवर थोडा कमी लागतो. तुम्हाला कडक आणि मसाला चहा प्यायचा असेल तर आधीच पाण्यात मसाले उकळवून नंतर दूध घाला.

तुम्ही पाण्यात इतर मसाले आणि चहा पावडरसोबत साखर मिसळू शकता. पण अनेकदा साखरेचा योग्य अंदाज येत नाही. म्हणून लोक दूध मिसळल्यानंतर लगेच साखर घालतात. ही पद्धत योग्य असून यामुळे चहाच्या चवीवर काही परिणाम होत नाही.

जर तुम्हाला घट्ट, क्रिमी चहा हवा असेल तर तुम्ही दूधाचं प्रमाण जास्त ठेवू शकता. बऱ्याच लोकांना फक्त दुधाचा चहा प्यायला आवडतो. साधा करायचा असेल तर २ कप चहासाठी १ कप दूध

# कधी जिभेवर फोड तर कधी हिरड्यांवर



तोंड येणे किंवा जिभेवर फोड येणे ही अनेकांना वारंवार भेडसावणारी समस्या आहे. जिभेवर, ओठांच्या आतील बाजूस किंवा हिरड्यांवर छोटे पांढरे किंवा लालसर फोड येतात. त्यामुळे खाणे-पिणे, बोलणे आणि अगदी पाणी पिणेसुद्धा त्रासदायक होऊ शकते. शरीरातील उष्णता वाढणे, तणाव, झोपेची कमतरता, पोषणतत्त्वांची कमतरता किंवा तिखट पदार्थांचे जास्त सेवन यामुळे ही समस्या उद्भवू शकते. तुम्हालाही जर सतत असे होत असेल तर आहारात काही पदार्थांचा समावेश करा.

तोंड आल्यावर सर्वप्रथम भरपूर पाणी पिण्याकडे लक्ष द्या. शरीर हायड्रेटेड राहिल्यास फोडांची जळजळ कमी होण्यास मदत होते. थंड पाणी किंवा नारळपाणीही आराम देऊ शकते. थंडावा देणारे आणि पाणीयुक्त पदार्थ आहारात घ्यायला सुरवात करा. कोमट पाण्यात थोडे मीठ घालून दिवसातून दोन ते तीन वेळा गुळण्या केल्यास फोडांमधील वेदना आणि सूज कमी होण्यास मदत होते. हा सर्वात सोपा आणि प्रभावी घरगुती उपाय मानला जातो. थेट मीठ लावणे टाळा. प्रचंड आग होते. मात्र मीठातील गुणधर्म जंतूनाशक असतात त्यामुळे जास्त पाणी - थोडे मीठ हे प्रमाण ठेवा आणि गुळण्या करा.

तुळशीची काही पाने चावून खाल्ल्यानेही फायदा होऊ शकतो. तुळशीमध्ये असलेले गुणधर्म तोंडातील संसर्ग कमी करण्यास मदत करतात. पाने चघळून खा आणि नंतर थोडे पाणी प्या. पानाचा प्रत्येक भाग पोटात जाईल आणि त्याआधी रस तोंडात फिरेल याची काळजी घ्या.

मधाचा वापरही उपयुक्त ठरू शकतो. फोडांवर थोडासा शुद्ध मध लावल्यास जळजळ कमी होण्यास मदत होते आणि फोड लवकर भरून येण्यास सहाय्य मिळते. मात्र मध उष्ण असते त्यामुळे कमी प्रमाणातच लावा. तोंड आले असताना खूप तिखट, आंबट, गरम किंवा मसालेदार पदार्थ खाणे टाळावे. अशा पदार्थांमुळे फोड अधिक दुखू शकतात. त्याऐवजी मऊ, साधे आणि थंडसर पदार्थ खाण्यावर भर द्यावा.

तोंड वारंवार येत असेल, फोड दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ टिकत असतील किंवा खूप वेदना होत असतील तर डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. काही वेळा व्हिटामिन बी१२, फॉलिक ॲसिड किंवा लोहाच्या कमतरतेमुळेही ही समस्या उद्भवू शकते. साध्या घरगुती उपायांमुळे बहुतांश वेळा तोंड आलेले फोड काही दिवसांत बरे होतात. मात्र

# सोशल मिडियात 'या' ५ वस्तूंचीच चर्चा

अनुवंशिकता किंवा आरोग्याशी संबंधित कारणे यामागे असू शकतात, पण अनेकदा आपल्या रोजच्या काही सव्आयुष्यात वेळ वाचवणे, सोय वाढवणे आणि दैनंदिन कामे अधिक स्मार्ट पद्धतीने करण्यासाठीही मदत करणाऱ्या वस्तू घरात असतील तर कामं अगदी सोपी होतात, त्यामुळे रोजच्या कामांमध्ये गती आणणाऱ्या या वस्तू नक्की विकत घ्या. सध्या सोशल मिडियावर चांगल्याच ट्रेंडीग आहेत.

**सेल्फ-हीटिंग लंच बॉक्स**

ऑफिस, कॉलेज किंवा प्रवासात घरचे गरम जेवण खायला मिळावे अशी अनेकांची इच्छा असते. सेल्फ-हीटिंग लंच बॉक्स ही समस्या सोडवतो. हा डबा इलेक्ट्रिक पॉवरला जोडला की काही मिनिटांत अन्न गरम होते. त्यामुळे मायक्रोवेव्ह शोधण्याची गरज पडत नाही. विशेषतः काम करणाऱ्या महिलांसाठी ही वस्तू खूप उपयुक्त आहे. बाजारात याची किंमत साधारण १,००० ते ३,००० रुपयांपर्यंत असते.

**पोर्टेबल मेकअप मिरर**

दिवसभरात अनेकदा मेकअप टच-अप करण्याची गरज भासते. अशावेळी [illegible] लाईट असलेला छोटा पोर्टेबल आरसा खूप कामी येतो. कमी प्रकाशातही चेहरा स्पष्ट दिसतो आणि मेकअप नीट करता येतो. हा आरसा हँडबॅगमध्ये सहज मावतो. ऑफिस, लग्न समारंभ किंवा प्रवासासाठी तो विशेष उपयुक्त आहे. याची किंमत साधारण ५०० ते २,००० रुपयांदरम्यान असू शकते.



# दात पिवळे झाले म्हणून

चेहऱ्यावरील सुंदर हास्य अधिक खुलवण्यासाठी स्वच्छ आणि चमकदार दात महत्त्वाचे असतात. मात्र अनेकांना दात पिवळे पडण्याची समस्या जाणवते. काही वेळा वाढते वय, आनुवंशिकता किंवा आरोग्याशी संबंधित कारणे यामागे असू शकतात, पण अनेकदा आपल्या रोजच्या काही सवयीही त्यासाठी जबाबदार असतात. नकळत केल्या जाणाऱ्या या चुका दातांवर डाग पडण्यास आणि त्यांचा नैसर्गिक पांढरेपणा कमी होण्यास कारणीभूत ठरू शकतात. सुरवात हळूहळू होते आणि नंतर ते डाग कायम राहतात. किंवा म्हणून बराच खर्च करावा लागतो. रोजच्या काही चुका टाळा आणि दात छान शुभ्र ठेवा.

दात व्यवस्थित आणि पुरेसा वेळ घासले नाही तर त्यावर प्लाक जमा होऊ लागतो. कालांतराने हा प्लाक दातांना पिवळसर दिसू लागण्यास कारणीभूत ठरतो. दिवसातून दोन वेळा दात स्वच्छ करणे आणि योग्य पद्धतीने ब्रश करणे महत्त्वाचे आहे. तसेच झोपण्याआधी दात घासा. दिवसभरात अनेक अन्न कण त्यावर चिकटले असतात.

चहा, कॉफी आणि काही रंगीत पेये यांचे जास्त सेवन केल्यानेही दातांवर डाग पडू शकतात. या पेयांमधील रंगद्रव्ये दातांच्या बाह्य थरावर साचत जातात आणि दातांचा रंग हळूहळू बदलू लागतो. जास्त प्रमाणात रंग वापरले जाणारे पदार्थ खाणे टाळा. धूम्रपान किंवा तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन हे दात पिवळे पडण्यामागील प्रमुख कारणांपैकी एक मानले जाते. तंबाखूमधील घटक दातांवर हट्टी डाग निर्माण करू शकतात, जे सामान्य ब्रशिंगने सहज निघत नाहीत.

जेवल्यानंतर तोंड स्वच्छ न करणे हीदेखील एक सामान्य चूक आहे. अन्नकण आणि साखरेचे अंश तोंडात राहिल्यास जिवाणूंची वाढ होते आणि दातांवर थर जमा होऊ लागतो. त्यामुळे प्रत्येक जेवणानंतर तोंड पाण्याने स्वच्छ धुण्याची सवय ठेवावी. अतिप्रमाणात गोड पदार्थ खाल्ल्यानेही दातांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. साखरेमुळे जिवाणू वाढतात आणि दातांवरील संरक्षणात्मक थर कमकुवत होऊ शकतो. यामुळे दातांचा रंग बदलण्याची शक्यता वाढते.

अनेकजण दातांची नियमित तपासणी टाळतात. दातांवर जमा झालेला टार्टर किंवा डाग काढण्यासाठी दंतचिकित्सकांकडून वेळोवेळी स्वच्छता करून घेणे आवश्यक असते. याकडे दुर्लक्ष केल्यास दात अधिक पिवळे दिसू शकतात. काही ठराविक महिन्यांनी एकदा दातांची तपासणी करणं बंधनकारक आहे. तरच दात चांगले राहतात. दातांचा नैसर्गिक रंग टिकवून ठेवण्यासाठी तोंडाची योग्य स्वच्छता, संतुलित आहार आणि काही साध्या सवयी महत्त्वाच्या ठरतात.

रोजच्या छोट्या चुका टाळल्यास दात अधिक निरोगी आणि आकर्षक राहण्यास मदत होऊ शकते.

# पाणी पिऊनही उचक्या थांबतच नसतील तर.....


उचकी येणं ही एक नैसर्गिक प्रक्रिया. आपल्या घरी असल्यावर किंवा आपल्या आसपास कोणी नसताना उचक्या आल्या तर काही वाटत नाही. पण जेव्हा आपण चारचौघांमध्ये बसलेलो असतो किंवा ऑफिसमध्ये शांत ठिकाणी बसलेलो असतो तेव्हा जर उचक्या आल्या तर मात्र खूप अवघडल्यासारखं होतं. कारण एकतर त्यामुळे आपल्याला तर त्रास होतोच, पण त्यासोबतच त्या आवाजाने आजुबाजुचे लोकही वैतागून जातात. त्यामुळे खूप कसंतरी होतं आणि उचक्या येणं कधी एकदा बंद होईल असं वाटतं. पण बऱ्याचदा पाणी पिऊनही उचक्या येणं कमी होत नाही. अशावेळी पुढे सांगितलेले काही उपाय करून पाहा यामुळे उचक्या येणं अगदी पुढच्या मिनिटाला बंद होईल.

उचक्या येणं थांबविण्यासाठी उपाय

. साधं पाणी पिऊन उचक्या येणं थांबत नसेल तर फ्रिजमधलं थंडगार पाणी प्या. थंडगार पाणी प्यायल्यानेही उचक्या येण्याचं प्रमाण खूप कमी होतं. थंड पाणी एकदम मात्र पिऊ नये. हळूहळू एकेक घोट घेत पाणी प्यावं.. पाणी पिण्याचा उपाय करूनही जर उचकी येणं थांबत नसेल तर सावकाशपणे एक दिर्घ श्वास घ्या. त्यानंतर १५ ते २० सेकंदासाठी श्वास तसाच रोखून धरा आणि नंतर सावकाशपणे सोडा. असं साधारण ४ ते ५ वेळा केलं तरी उचक्या येणं कमी होईल.. उचक्या चटकन थांबविण्याचा आणखी एक सोपा उपाय म्हणजे मध खाणे.



# कोल्ड ड्रिंक प्यायल्यानंतर येणारे ढेकर....



जेवल्यानंतर बऱ्याच लोकांना थम्सअप किंवा स्प्राईट असे पेय पिण्याची सवय असते. आपण जेव्हा ते पेय पितो तेव्हा आपल्याला लगेच ढेकर येतात आणि थोडं हलकं वाटू लागतं.

आपल्याला वाटतं की आपण खाल्लेल्या अन्नाचे पचन झाले त्यामुळे ढेकर आले आहेत.पण वास्तविकता ही आहे की स्प्राईट किंवा थम्सअपमुळे खाल्लेल्या अन्नाचे कधीही पचन होत नाही.

मग ढेकर का येतो?

स्प्राईट किंवा थम्सअप अशा पदार्थांमध्ये ण्द२ म्हणजेच कार्बन डाय ऑक्साईड हा गॅस मिसळलेला असतो. जेव्हा आपण ही पेय पितो तेव्हा हा गॅस आपल्या पोटात जातो. हा अतिरिक्त गॅस ढेकरच्या स्वरूपात बाहेर पडतो आणि आपल्याला वाटतं की ढेकर आला.

कोल्ड ड्रिंकची बॉटल उघडल्यानंतर आपल्याला जे बबल्स दिसतात ते यात गॅसमुळे असतात. पण यामुळे पोट फुगणं, अस्वस्थता, मग त्यावर एसिडीटी अशा समस्या उद्भवू शकतात. यात साखर, आर्टिफिशिअल फ्लेवर्स असतात.

भारतात डायबिटीसच्या रुग्णांमध्ये वाढ होण्यामागे कोल्डड्रिंक हे सुद्धा एक कारण आहे. अतिथंड जास्त गोड पेय पचनकशक्ती कमजोर करतात. यामुळे वात आणि कफ दोषही वाढतो.


कोल्डड्रिंक प्यायल्यामुळे येणारा ढेकर तुम्हाला फक्त मानसिक समाधान देतो.पण शरीराची जास्त प्रमाणात हानी होते. म्हणून कोल्ड ड्रिंक्स पिणं शक्यतो टाळा. कधीतरी प्यायल्यास काही समस्या नाही.

हे ढेकर शरीरासाठी वाईट आणि निरूपयोगी असतात. हा ढेकर केवळ शरीरात गेलेला अतिरिक्त गॅस बाहेर टाकण्याची प्रक्रिया आहे. याचा अन्नाचे पचन होण्याशी काहीच संबंध नाही.

वारंवार असे कृत्रिम ढेकर आल्यामुळे अन्ननलिका आणि पोटाला जोडणारे स्नायू कमकुवत होतात. ज्यामुळे भविष्यात गॅस्ट्रिक रिफ्लेक्सचा त्रास होऊ शकतो.

# कॅल्शियमच्या सप्लिमेंट्स घेता?

लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सगळ्यांनाच कॅल्शियमची खूप गरज असते. कॅल्शियम पुरेशा प्रमाणात मिळालं नाही तर मग इतर अनेक दुखणी डोकं वर काढू लागतात त्यामुळेच तर हल्ली कित्येकजणांना कमी वयातच गुडघेदुखी, पाठदुखी, मानदुखी असे त्रास होत आहेत. हे सगळे त्रास कमी करायचे असतील तर काही पदार्थ तुमच्या आहारात नियमितपणे असायलाच हवे . कारण शरीरातलं कॅल्शियम नैसर्गिकपणे वाढविण्यासाठी हे पदार्थ खूप उपयुक्त ठरतात.



त्यापैकी पहिला पदार्थ आहे अळीव. आपल्याकडे बाळंतिणीलाही अळिवाचे लाडू किंवा अळिवाची खीर दिली जाते. कारण तिच्या हाडांची झालेली झीज भरून काढण्यासाठी ते खूप उपयुक्त ठरतात. त्यामुळे आठवड्यातून एकदा किंवा दोनदा अळिवाचे पदार्थ खायला सुरुवात करा.

भरपूर कॅल्शियम देणारा दुसरा पदार्थ आहे नाचणी. नाचणीचे वेगवेगळे पदार्थ तुम्ही नाश्त्यामध्ये घेऊ शकता. नाचणीची भाकरी, डोसा, इडली, नाचणी सत्त्व असे वेगवेगळे पदार्थ आहारात नियमितपणे असायलाच हवे.

कॅल्शियमचा आणखी एक चांगला स्त्रोत म्हणजे राजगिरा. पण तो आपण फक्त उपवासापुरताच मर्यादित ठेवला आहे. शरीराची कॅल्शियमची गरज भागवायची असेल तर राजगिऱ्याचे लाडू, चिक्की, थालिपीठ आपल्या आहारात नेहमीच असायला हवे.ही माहिती डॉ. मानसी यांनी इंस्टाग्रामवर शेअर केली आहे.

# चव एक नंबर! मैद्याला म्हणा बाय-बाय

पिझ्झाचं नाव ऐकताच लहानांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकाच्या तोंडाला पाणी सुटतं. मात्र सामान्यतः पिझ्झाचा बेस मैद्यापासून बनवला जातो, जो आरोग्यासाठी हानिकारक मानला जातो. याच कारणामुळे अनेक जण पिझ्झा खाणं टाळतात. अशा परिस्थितीत जर तुम्हालाही पिझ्झा आवडत असेल, पण आरोग्याशी तडजोड करायची नसेल, तर मूग डाळ पिझ्झा तुमच्यासाठी एक उत्तम पर्याय ठरू शकतो.

मूग डाळीपासून बनवलेला पिझ्झा खाण्यासाठी अत्यंत चविष्ट असण्यासोबतच प्रोटीन आणि फायबरने परिपूर्ण असतो. सर्वात चांगली गोष्ट म्हणजे हा घरी अतिशय सोप्या पद्धतीने तयार करता येतो. कसा बनवायचा हे जाणून घेऊया...

साहित्य -

१ कप मूग डाळ (रात्रभर भिजवलेली)

१ इंच आलं (बारीक चिरलेले)

२ हिरव्या मिरच्या (बारीक चिरलेल्या)

१ चिमूट बेकिंग पावडर थोडं तेल गरजेनुसार पिझ्झा सॉस शिमला मिरची (बारीक चिरलेली) उकडलेला मका पनीरचे छोटे तुकडे कांदा (बारीक चिरलेला) चवीनुसार मीठ मशरूम (स्लाईस) १-२ जॅलेपिनो स्लाईस गरजेनुसार मोझरेला चीज (किसलेले) गार्निशिंगसाठी रेड चिली फ्लेक्स गार्निशिंगसाठी ड्राय ऑरेगॅनो

मूग डाळ पिझ्झा बनवण्यासाठी सर्वात आधी मूग डाळ स्वच्छ धुवून रात्रभर पाण्यात भिजत ठेवा. दुसऱ्या दिवशी भिजलेली डाळ आलं, हिरवी मिरची, मीठ आणि गरजेनुसार पाणी घालून मिक्सरमध्ये वाटून घ्या. हे मिश्रण व्यवस्थित ब्लेंड करून मऊ आणि घट्ट बॅटर तयार करा.

तयार झालेले बॅटर एका भांड्यात काढून घ्या आणि त्यात एक चिमूट बेकिंग पावडर घालून व्यवस्थित मिक्स करा.

आता नॉन-स्टिक तवा किंवा पॅन गरम करा.

त्यावर थोडे बॅटर टाकून जाड पॅनकेकसारखं पसरवा. वरून थोडं तेल सोडा आणि एका बाजूने व्यवस्थित शेकून घ्या.

आता तो बेस (पॅनकेक) उलटून घ्या. त्यावर पिझ्झा सॉस चांगला पसरवून लावा. त्यानंतर शिमला मिरची, स्वीट कॉर्न, कांदा, मशरूम, पनीरचे तुकडे आणि जॅलेपिनो टाका. शेवटी वरून मोझरेला चीज टाका. आता पॅनवर झाकण ठेवा आणि चीज वितळेपर्यंत मंद आचेवर शिजवून घ्या.चीज नीट वितळल्यावर पिझ्झा एका प्लेटमध्ये काढून घ्या. वरून रेड चिली फ्लेक्स आणि ऑरेगॅनो घालून गरमागरम सर्व्ह करा.





# पॉपकॉर्न ब्रेन

**जगदिश काबरे**

सोशल मीडिया आणि स्मार्टफोनच्या प्रभावामुळे आजचा माणूस 'पॉपकॉर्न ब्रेन' या नव्या मानसिक स्थितीचा सामना करत आहे. या डिजिटल युगातील हा सतत उडणारा, विचलित होणारा मेंदू आणि त्याचे मानवी आरोग्यावर होणारे खोल परिणाम उलगणारा हा वैचारिक उहापोह...

मानवी मेंदू हा जगातील सर्वात गुंतागुंतीचा आणि अद्भुत अवयव मानला जातो. त्यानेच माणसाला इतर सर्व प्राण्यांपेक्षा वेगळे ठरवले आहे. हजारो वर्षांच्या उत्क्रांतीनंतरही हा मेंदू बदलत्या जगाशी जुळवून घेत राहतो. परंतु गेल्या दोन दशकांत झालेल्या तंत्रज्ञानक्रांतीने या मेंदूवर इतका वेगाने आणि तीव्रपणे परिणाम केला आहे की आता मेंदूच्या नैसर्गिक कार्यप्रणालीवरच प्रश्न उपस्थित होत आहेत. सोशल मीडिया, मोबाईल फोन, इंटरनेट आणि सतत वाहणारी माहिती या सगळ्यामुळे आजचा माणूस एका नव्या मानसिक स्थितीचा अनुभव घेत आहे. ही स्थिती म्हणजेच 'पॉपकॉर्न ब्रेन'. एक असा मेंदू जो सतत उडणाऱ्या, फुटणाऱ्या, चमकणाऱ्या माहितीच्या फटकाऱ्यांना इतका सरावलेला आहे की शांतता, एकाग्रता आणि स्थिरता यांची क्षमता हरवू लागली आहे.

'पॉपकॉर्न ब्रेन' हा शब्द प्रथम सुमारे २०११ च्या सुमारास अमेरिकेतील मानसशास्त्रज्ञ डॉ. डेव्हिड लेव्हिन यांनी वापरला. त्या काळात स्मार्टफोनचा प्रसार झपाट्याने होत होता, आणि लोक सतत ऑनलाइन राहण्याची सवय लावत होते. लेव्हिन यांनी निरीक्षण केले की डिजिटल साधनांचा अतिरेकी वापर करणाऱ्यांचा मेंदू जणू पॉपकॉर्नच्या दाण्यासारखा सतत उड्या मारत असतो.

एका क्षणात एका विचारातून दुसऱ्या विचारात, एका माहितीपासून दुसऱ्या सूचना, एका व्हिडिओपासून दुसऱ्या पोस्टमध्ये उडी घेणारा हा मेंदू स्थिर राहू शकत नाही. जसे गरम तेलात टाकलेले दाणे फुटत राहतात, तसेच या युगातील मेंदूही सतत 'फुटत' आणि 'उडत' राहतो. म्हणूनच या अवस्थेला 'पॉपकॉर्न ब्रेन' असे नाव देण्यात आले.

या संकल्पनेचा वैज्ञानिक पाया मेंदूतील न्यूरोट्रांसमिटर 'डोपामिन'मध्ये आहे. डोपामिन हे 'रिवॉर्ड केमिकल' मानले जाते. जेव्हा आपण काही सुखद अनुभव घेतो, काही नवीन माहिती मिळवतो, लाइक किंवा नोटिफिकेशन पाहतो, तेव्हा डोपामिनची पातळी वाढते आणि आपल्याला आनंदाची लहर जाणवते. या आनंदाचा शोध मेंदू पुन्हा पुन्हा घेत राहतो, त्यामुळे आपण वारंवार फोन तपासतो, सोशल मीडिया स्क्रोल करतो, व्हिडिओवरून व्हिडिओकडे जात राहतो. कालांतराने ही सवय इतकी दृढ होते की मेंदू सतत नवीनतेची मागणी करू लागतो. त्यामुळे जेव्हा एखाद्या शांत वातावरणात बसावे लागते, जसे की पुस्तक वाचणे, संवाद साधणे, किंवा फक्त शांतपणे विचार करणे इ. तेव्हा मेंदू अस्वस्थ होतो, लक्ष केंद्रित करणे अवघड जाते, आणि आपोआप हात पुन्हा मोबाईलकडे जातो. हीच 'पॉपकॉर्न ब्रेन'ची मूळ मानसिक यंत्रणा आहे.

मानसशास्त्रज्ञांच्या मते, या स्थितीत मेंदूतील 'अटेंशन नेटवर्क' आणि 'डीफॉल्ट मोड नेटवर्क' या दोन भागांमधील समतोल बिघडतो. अटेंशन नेटवर्क हे कामावर लक्ष केंद्रीत ठेवते, तर डीफॉल्ट मोड नेटवर्क हे विश्रांतीच्या अवस्थेत कार्यरत असते, जिथे कल्पनाशक्ती, सर्जनशीलता आणि आत्मचिंतन घडते. सततच्या डिजिटल उत्तेजनामुळे अटेंशन नेटवर्क थकते आणि डीफॉल्ट मोड नेटवर्कला पुरेशी संधी मिळत नाही.

परिणामी, माणूस सतत काहीतरी करण्याच्या धावपळीत असतो पण प्रत्यक्षात काही खोल विचार करू शकत नाही. ही स्थिती एखाद्या संगणकावर हजारो टॅब उघडे ठेवून एकाच वेळी सर्व वापरण्याच्या प्रयत्नासारखी आहे. शेवटी संपूर्ण प्रणाली हळूहळू अडकते, मंदावते आणि क्रॅश होते.

पॉपकॉर्न ब्रेनचा सर्वाधिक परिणाम तरुण पिढीवर होत आहे. इंटरनेटसह वाढलेली ही पिढी सतत बदलणाऱ्या डिजिटल जगाशी इतकी जुळलेली आहे की, वास्तव जग त्यांना बोअर वाटते. वर्गात शिकवले जाणारे धडे, लांब व्याख्याने किंवा पुस्तकातील मोठे परिच्छेद वाचणे त्यांना कठीण जाते कारण त्यांच्या मेंदूला १० सेकंदांच्या रील्स, २० शब्दांच्या ट्विट्स आणि सततच्या नोटिफिकेशनच्या जगाशी सवय झाली आहे. परिणामी, एकाग्रतेचा कालावधी लक्षणीयरीत्या कमी झाला आहे. अमेरिकन नॅशनल सेंटर फॉर बायोटेक्नॉलॉजीने केलेल्या संशोधनानुसार २००० साली मानवाची सरासरी एकाग्रता सुमारे १२ सेकंदांची होती, तर २०२० पर्यंत ती फक्त ८ सेकंदांवर आली, म्हणजेच सोनमाश्याच्या एकाग्रतेपेक्षा कमी.

पॉपकॉर्न ब्रेन केवळ लक्ष केंद्रीत होण्यावर परिणाम करत नाही, तर भावनिक आणि सामाजिक आयुष्यावरही खोल परिणाम घडवतो. जेव्हा मेंदू सतत उत्तेजनांना सरावतो, तेव्हा तो शांततेत असहाय होतो. अशा व्यक्तींना एकांतात राहणे, एखाद्या मित्राशी खोल संवाद साधणे, किंवा दीर्घ काळ एकाच कामावर लक्ष ठेवणे जड जाते. त्यांना लगेच कंटाळा येतो आणि नवीन उत्तेजनाची भूक लागते. या प्रक्रियेला मानसशास्त्रात 'डिजिटल रिवॉर्ड सर्किट' म्हणतात.

जणू मेंदूला सतत साखर मिळत आहे आणि एकदा साखरेचा पुरवठा थांबला की तो थरथर कापतो. म्हणूनच लोक मोबाईल हातात नसला तरी नकळत तो हातात शोधतात, नोटिफिकेशनचा आवाज नसतानाही 'फँटम वायब्रेशन' अनुभवतात.

पॉपकॉर्न ब्रेनचे शारीरिक परिणामही लक्षणीय आहेत. झोपेची गुणवत्ता घटते, डोळ्यांवर ताण येतो, मेंदू सतत सतर्क राहिल्यामुळे शरीराचा जैविक घड्याळ बिघडतो. सततच्या स्क्रीन एक्स्पोजरमुळे मेलाटोनिनचे स्राव कमी होते, त्यामुळे झोप येण्यास उशीर होतो आणि सकाळी थकवा जाणवतो.

या स्थितीला 'डिजिटल इनसॉम्निया' म्हटले जाते. दीर्घकाळात ही समस्या नैराश्य, चिंता, आणि आत्मसन्मानाच्या कमीपणाशी जोडली जाते कारण सोशल मीडियावरील सततची तुलना, लाईक्स आणि फॉलोअर्सची गणना मेंदूवर दडपण आणते. व्यक्तीला स्वतःचे अस्तित्व इतरांच्या मान्यतेवर अवलंबून असल्यासारखे वाटते.

वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहता, पॉपकॉर्न ब्रेन ही एका प्रकारची 'न्यूरोप्लॅस्टिक ॲडॅप्टेशन' आहे. म्हणजेच मेंदू स्वतःला नवीन परिस्थितीशी जुळवून घेतो. परंतु ही जुळवणूक नैसर्गिक नाही, तर तात्पुरती आणि कृत्रिम आहे. मेंदूतील 'सिनॅप्सेस' म्हणजे न्यूरॉन्समधील जोडणी सतत बदलणाऱ्या उत्तेजनांशी जुळवून घेतात, त्यामुळे हळूहळू 'डीप फोकस' करणे कठीण बनते. संशोधन दर्शवते की ज्यांच्या जीवनात स्क्रीन टाइम जास्त आहे त्यांच्यात 'प्रि-फ्रंटल कॉर्टेक्स' (निर्णय घेण्याचा भाग) आणि 'हिप्पोकॅम्पस' (स्मरणशक्तीचा भाग) यांची क्रियाशीलता कमी होत जाते. त्यामुळे दीर्घकाळात विचारशक्ती, तार्किक निर्णय क्षमता आणि आत्मनियंत्रण या सर्व गोष्टींवर परिणाम होतो.

इतिहासाच्या दृष्टीने बघितले तर प्रत्येक तांत्रिक क्रांतीने मेंदूवर परिणाम केला आहे. मुद्रणयंत्राच्या काळात वाचनसवयींनी मेंदूच्या भाषिक भागाचा विकास केला, औद्योगिक क्रांतीने यांत्रिक विचार वाढवला, पण डिजिटल क्रांतीने पहिल्यांदाच मेंदूला बाह्य जगाशी सतत जोडून ठेवले आहे.

हा जोड अखंड आहे, त्यामुळे मेंदूला विश्रांती मिळत नाही. आधीच्या युगात एक दिवस संपला की संवाद थांबत असत, परंतु आता रात्री झोपेतही नोटिफिकेशन येत राहतात. अशा परिस्थितीत मेंदूचा 'रेस्ट मोड' जवळजवळ नाहीसा झाला आहे. काही न्यूरोसायंटिस्ट्स तर म्हणतात की आजचा माणूस 'पॉज' बटण विसरला आहे.

औद्योगिक युगाने शरीरावर परिणाम केला, तर डिजिटल युगाने मेंदूवर. पण माणसात आत्मपरीक्षण करण्याची एक विलक्षण क्षमता आहे. हीच क्षमता आज पुन्हा जागवण्याची वेळ आली आहे. मेंदूला पुन्हा शांततेचा, शून्यतेचा, आणि विचाराच्या गाभ्याचा अनुभव द्यावा लागेल.

जेव्हा आपण स्वतःच्या विचारांवर पुन्हा नियंत्रण मिळवू, तेव्हाच आपण 'पॉपकॉर्न ब्रेन'मधून मुक्त होऊ. मानवाच्या उत्क्रांतीचा पुढचा टप्पा कृत्रिम बुद्धिमत्तेशी एकरूप होण्याचा नसून- सजग बुद्धिमत्तेशी परत एकरूप होण्याचा आहे. माहितीचा ओघ थांबवणे शक्य नाही, पण त्यात वाहून जाणे टाळणे शक्य आहे.

म्हणूनच, या युगात सर्वात क्रांतिकारी कृती म्हणजे थांबणे. थांबून विचार करणे आणि थांबून स्वतःला पुन्हा शोधणे. 'पॉपकॉर्न ब्रेन' आपल्याला शिकवतो की सतत उडत राहणारा मेंदू चमकदार असू शकतो, पण विचारशील मेंदूच खऱ्या अर्थाने प्रकाशमान असतो.

### पेडल नसलेल्या 'हॉबी हॉर्स' ते आजच्या स्मार्ट 'इलेक्ट्रिक' रूपापर्यंतचा सायकलचा अत्यंत रंजक प्रवास...

# हॉबी हॉर्स ते बायसिकल!



सायकल या वाहनाची सगळ्यात भारी गोष्ट कोणती माहिती आहे का?- तर ना आरटीओ मध्ये जाऊन ड्रायव्हिंग लायसन्स काढण्याची कटकट, ना महागड्या पेट्रोल, डिझेल किंवा गॅसची गरज! बस, दोन्ही चाकांमध्ये गच्च हवा भरली की निघाली आपली स्वारी! यामुळे एकीकडे पैशांची मोठी बचत होते, तर दुसरीकडे पर्यावरणाचं रक्षण होतं. कसलंही प्रदूषण न करता धावणारं हे एकमेव वाहन आहे.

सायकल चालवण्यामुळे आपल्या शरीराचा उत्तम व्यायाम होतो, पाय मजबूत होतात आणि तब्येत एकदम झकास राहते. शिवाय, घराबाहेर पार्किंगसाठी खूप जास्त जागाही लागत नाही आणि तिची किंमतही आपल्या खिशाला परवडणारी असते. पण मित्रांनो, आज आपण जी भारी, रंगीबेरंगी आणि स्टायलिश सायकल चालवतो, ती शेकडो वर्षांपूर्वी अशी नव्हती हं!

सुरुवातीची लाकडाची सायकल, पेडल नसलेली सायकल, मग चक्क चार फूट उंच चाकावर बसवलेली पेडल असलेली सायकल ते आताची आधुनिक गियरची सायकल... असा या दोन चाकांचा प्रवास मोठा मनोरंजक आणि थरारक आहे. अशी ही बहुपयोगी सायकल नक्की कोणी शोधून काढली, असा प्रश्न तुम्हाला कधी पडला आहे का?

सुमारे दोनशे वर्षांपूर्वी, म्हणजे १८१७-१८ च्या काळात पहिल्यांदा जर्मनीच्या कार्ल ड्रिस या माणसाने एक सायकल तयार करून पाहिली. पण त्या काळी या प्रकाराकडे फक्त 'हौस' किंवा एक 'हॉबी-हॉर्स' (खेळण्यातील घोडा) आणि 'रनिंग मशीन' म्हणूनच पाहिलं गेलं. कारण काय तर, या सायकलला पेडलच नव्हते! कार्लने सायकलचा शोध हा चक्क एक साहसी खेळ म्हणून लावला होता. काहीतरी भन्नाट करायचं म्हणून त्याने एका भल्या मोठ्या चाकाची सायकल तयार केली. आता हिला पेडल नसल्यामुळे सायकलवर बसून पायानेच जमिनीला मागे ढकलत, धावत धावत तिला चालवावं लागायचं. लोकांना सुरुवातीला ही धमाल वाटली. कार्लच्या आधी तर लोकांनी लाकडाची सायकल बनवण्याचा प्रयत्न केला होता, पण तिचे अपघात वाढल्यामुळे लाकडाची सायकल गायब झाली. कार्लची सायकल अनेकांनी हौसेनं चालवली, पण खूप कष्ट पडत लागत असल्याने लोकांनी तिचा नाद सोडला. कार्ल ड्रिसला या सायकलवरून अवघे ७ किलोमीटर अंतर पार करायला चक्क एक तास लागला होता!

त्यानंतर काही फ्रेंच संशोधकांनी यात आपलं डोकं चालवलं आणि १८६०-७० च्या काळात एक नवीन सायकल आणली. हिला एक भलं मोठं चाक आणि एक छोटं चाक होतं, आणि मोठ्या चाकाला पेडल जोडले होते. ही खऱ्या अर्थाने 'बायसिकल' होती. पण तिची रचना अशी होती की चालवताना माणसाची हाडं खिळखिळी व्हायची! आणि चार फुटांच्या उंचीवर बसून चालवताना भयंकर थरकाप उरायचा. म्हणून लोकांनी तिचं नावच 'बोनशेकर' (हाडे हलवणारी) ठेवून दिलं! या सायकलची लोकप्रियता हळूहळू वाढू लागली आणि चक्क 'बायसिकल क्लब' सुरू झाले.

थॉमस स्टीव्हनने तर ही सायकल घेऊन जगप्रवास करण्याचा धाडसी प्रयत्न केला. आतापर्यंत सायकल फक्त खेळ म्हणून वापरली जात होती, पण तिचा वापर रोजच्या प्रवासासाठी करता येईल का, असा विचार संशोधक करू लागले. तो काळ घोड्यांचा वापर करण्याचा होता. घोड्यांच्या जागी सायकल येईल का, या विचाराने मोठी क्रांती झाली! शेवटी १८८५ च्या आसपास जेम्स स्टारली यांच्या भाच्याने आजच्या सारखी अत्यंत सुरक्षित सायकल तयार केली. दोन्ही चाकं सारख्या आकाराची, कमी उंचीची, मजबूत चेन आणि पेडल असलेली ही सायकल खूप गाजली. आज आपण जी सायकल वापरतो, ती हीच आहे!

सायकलच्या काही भन्नाट आणि रंजक गोष्टी- सायकल चालवणारे लोक जगात 'कूल ड्युड्स' म्हणून प्रसिद्ध आहेत, कारण ते नेहमी हसतमुख असतात. २०१५ साली ऑस्ट्रेलियामध्ये चक्क १३५ फूट लांबीची सायकल बनवली गेली होती, तिची नोंद गिनीज बुकमध्ये झाली आहे. तर जगातील सर्वात महागडी सायकल तब्बल ५ लाख डॉलर्सची आहे! जर्मनीच्या एका पठ्ठ्याने तर १० फूट ९ इंच व्यासाच्या चाकाची सायकल बनवून ती चालवून दाखवली.

सायकलिंग करणं हे साध्या चालण्याच्या व्यायामापेक्षा तिप्पट वेगाने शरीराला फायदा करून देते. कोपनहेगन, टोकियो आणि बर्लिन या शहरांमध्ये लोक रोज सायकलनेच ऑफिसला जातात.

तिथे सायकलींगसाठी ८ मजली पार्किंग आणि स्वतंत्र ट्रॅक आहेत. भूतानसारख्या डोंगराळ देशात सायकल चालवणाऱ्याला विशेष मान दिला जातो.

आपल्या भारतातील नागपूरचे डॉ. अमित समर्थ हे जगातील सर्वात कठीण 'ट्रान्स सायबेरियन सायकल स्पर्धा' पूर्ण करणारे आशियातील एकमेव सायकलपटू आहेत.

# वृक्षवल्ली आम्हा परके वनचरे

विकास आणि विनाश यातील संघर्षात होरपळणाऱ्या निसर्गाचा मूक आक्रोश मांडणारा, झाडाशी असलेले आपले मखमली नाते उलगडणारा हा एक संवेदनशील ललित आविष्कार.

काही दिवसांपूर्वी एक बातमी वाचली नि मी अस्वस्थ झालो. आमच्या भागातील सुमारे दीडशे वर्ष जुन्या वडाच्या झाडावर महापालिकेनं आणि कंत्राटदार कंपनीनं कुऱ्हाड चालवण्याचं ठरवलेलं होतं. का? तर रस्ता रुंदीकरणात ते झाड मध्ये येतंय म्हणून. परंतु खऱ्या अर्थानं आपणच झाडांच्या वस्तीमध्ये बेकायदेशीरपणे घुसलो आहोत. पर्यावरणप्रेमींनी नेहमीप्रमाणे निषेध नोंदवला, आंदोलनं केली परंतु या बहिऱ्या व्यवस्थेला निसर्गाचा आक्रोश मुळीच ऐकू येत नाही. ती तर विकासाचं गाजर दाखवून तुम्हाला विनाशाकडे ढकलण्यासाठी तयारच बसलेली असते.


नाशिकमध्ये आगामी कुंभमेळ्याच्या नियोजनासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड आणि मुळासकट झाडे उखडण्याचे प्रकार घडले, ज्यामुळे पर्यावरण व वन्यजीवांचे मोठे नुकसान झाले. पर्यावरणप्रेमींचा विरोधही या प्रशासकीय दबावापुढे फसला. एकीकडे कोट्यवधी वृक्षलागवडीच्या जाहिराती (उदा. सरकारी योजना किंवा आयपीएलचे डॉट बॉल अभियान) केल्या जातात, मात्र प्रत्यक्षात या झाडांचे अस्तित्व कुठेच दिसत नाही. याउलट, विकासाच्या नावाखाली आहे तीच जंगले व निसर्ग नष्ट करण्याची वृत्ती व्यवस्थेमध्ये दिसून येत आहे.

भारतात विकासाच्या नावाखाली झाडांचे अशास्त्रीय पद्धतीने पुनर्रोपण केले जाते, ज्यामुळे बहुतांश झाडे जगत नाहीत. याउलट, जपानमध्ये 'नेमावाशी' (नर्सेप) या शास्त्रशुद्ध प्रक्रियेद्वारे शेकडो वर्षांची झाडे सुरक्षितपणे स्थलांतरित केली जातात. या पद्धतीत मुळांना कापडात बांधून, झाडाला नवीन वातावरणासाठी मानसिकदृष्ट्या तयार होण्यास वेळ दिला जातो आणि नंतर क्रेनच्या सहाय्याने त्याचे पुनर्रोपण होते. जपानमधील 'शिंतो' धर्मानुसार झाडांमध्ये देवत्व मानले जात असल्याने तिथे झाड तोडणे हा निसर्गाचा अपमान समजला जातो; कारण झाड केवळ फांद्या-मुळांचा संच नसून ते निसर्गाचे एक जिवंत महाकाव्य आहे.

कुठेतरी, कधीतरी एका अंधाऱ्या मातीच्या कुशीत एक छोटंसं बी विसावलेलं असतं. ते बी म्हणजे पृथ्वीचं एक सुप्त स्वप्न असतं. वरून पावसाचा पहिला थेंब त्या मातीला स्पर्श करतो, आणि जमिनीच्या पोटात एक अनामिक हुरहूर सुरू होते. ते बी स्वतःचा अहंकार, स्वतःचं कठीण कवच विरघळवून टाकतं. कारण त्याला माहीत असतं, स्वतःला संपवल्याशिवाय नवा जन्म घेता येत नाही. मग मातीची कूस उजळून निघते आणि एक मऊ, कोवळा, फिकट हिरवा अंकुर डोकं वर काढतो. दोन पानांची ही इवलीशी अंजली थेट आकाशाकडे पाहत असते. हा अंकुर म्हणजेच निसर्गानं पृथ्वीवर उमटवलेलं पहिलं कौतुक असतं. झाड निसर्गाच्या दरबारातील असा एक नर्तक आहे, जो काळाच्या तालावर आपले रंग बदलत फांद्यांच्या हस्तमुद्रांनी आपल्या मनातील भाव व्यक्त करत असतो.

उन्हाळ्यात सूर्य आग ओकत असताना वाराही तप्त झालेला असतो. अशा वेळी झाडं स्वतःला जाळून घेतात, पण जगाला सावली देण्याचं व्रत सोडत नाहीत. अशाच एका तप्त दुपारी, गुलमोहर आपल्या अंगावर लालभडक रक्तासारखी फुलं पांघरून उभा राहतो, जणू काही तो निसर्गाचा क्रांतीवीर आहे! या वृक्षतोडीविरोधात तो पेटून उठलाय. तर दुसरीकडे बहावा आपल्या पिवळ्याधमक फुलांची झुंबरं अशा प्रकारे मिरवत उभा असतो, जणू काही धरित्रीच्या गळ्यात सोन्याचे हार घातले आहेत. कधी कधी भर उन्हात बहाव्याकडे पाहिलं तरी मनात गोडवा निर्माण होतो. त्यावेळी त्याची पिवळी फुलं म्हणजे पिवळ्या रंगाचे बत्तासे असल्याचा गोडसर भास होतो. मला या झाडांच्या फांद्या म्हणजे निसर्गाच्या धमन्याच असल्यासारख्या वाटतात. या फांद्यांवर उन्हाच्या जणू धामणी खेळत असतात. पानांच्या गाळणीतून ऊन गाळल्यावर मातीवर ऊन ठिपक्यांची जाळीदार रांगोळी काढलेली दिसते. त्या सावलीत ऊन स्वतःचं अस्तित्व शोधू लागतं. त्याचा दंभ मोडून पडतो आणि ते स्वत्त्व हरवून बसतं. खोडाकडे पाहिलं तर कळतं की त्याच्या रंगात मातीचा रंग आपसूकपणे मिसळला गेलाय. झाडाचा देह जरी रापलेला असला तरी उन्हानं त्याची संपूर्ण कांती उजळून निघालेली असते, जणू काही साक्षात्कारानं झाड अंतर्मुख झालेलं असतं. पण याच झाडाच्या एखाद्या फांदीत त्याचा सर्वनाश करण्याची ताकद असते. कारण शेवटी कुऱ्हाडीचा दांडाही लाकडाचाच बनलेला असतो ना! यावरून माझ्याच एका कवितेच्या ओळी मला आठवल्या,

**कोण्या फांदीत दडली,**
**शोधा उन्हाची कुऱ्हाड**
**घाव घालण्याच्या आधी,**



**उगवावे नवे झाड...**

पण हीच झाडं पावसात अभ्यंगस्नान करतात. पहिल्या पावसानंतर झाडांची अवस्था एखाद्या विरहातून मुक्त झालेल्या प्रेयसीसारखी होते. मेघांचे ताशे वाजतात, विजांच्या नृत्यासोबत कोसळणाऱ्या जलधारा जेव्हा झाडाच्या पानांवर पडतात, तेव्हा पानावरांवरून पडणारा प्रत्येक थेंब एक नवीन चाल रचतो. 'टपष्ठ टपष्ठ टपष्ठ' झाडाचं हे संगीत मनाला तृप्त करून जातं. वारा येतो आणि झाड आपल्या अथांग बाहूंनी त्यास कवेत घेतं. तेव्हा त्याची गदगद ही पागोळ्यांमधून व्यक्त होते. पानांची ती सळसळ म्हणजे जणू काही निसर्गानं गायलेली एक सुमधूर अंगाई असते. मला मात्र सर्वात जास्त भुरळ पाडते ती झाडाची पानगळ. हिवाळ्याच्या अखेरीस झाडावरची पानं पिवळी पडू लागतात. ती झाडाचा निरोप घेतात. एक-एक करून पान जमिनीवर पडतं, तेव्हा तो मृत्यू नसतो, तो एक शांत, संथ सोहळा असतो. झाडावरून गळणाऱ्या पानातही एक नजाकत असते. ते हवेत तरंगत, लयबद्ध गिरक्या घेत मातीच्या कुशीत विसावतं. सर्व पानं झडून गेल्यावर झाड उघडं पडतं, पण ते रडत नाही; कारण त्याला माहीत असतं, शून्यातूनच पुन्हा नव्या सृष्टीची सुरुवात होते. तो पाचोळाच अशावेळी झाडाचं खत ठरतो आणि नव्या सर्जनासाठी त्यास इंधन पुरवतो. या उघड्याबोडक्या, ध्यानस्थ उभ्या असलेल्या झाडाकडे पाहिलं की वाटतं, हा कोणीतरी हिमालयातला ऋषी आहे, जो केवळ आत्मज्ञानाच्या शोधात शांत उभा आहे.

झाडाची सावली म्हणजे निसर्गानं माणसासाठी विणलेला एक मखमली पडदा होय. तो केवळ प्रकाशाचा अभाव नाही, तर ती मायेची ऊब आहे. रणरणत्या उन्हात, सिमेंटच्या रस्त्यावरून चालताना जेव्हा पाय पोळू लागतात, अंगाची लहिलाही होते, तेव्हा लांबूनच वडाची किंवा पिंपळाची सावली दिसल्यावर पोळलेल्या मनावर फुंकर घातल्यासारखं वाटतं. त्या सावलीत पाऊल ठेवलं, की असं वाटतं जणू आईनं आपल्या उन्हानं तापलेल्या कपाळावर थंड पाण्याचा हात ठेवला आहे. त्या गारव्यात एक अद्भुत शांतता असते. तिथे पक्षी किलबिलत असतात, वाटसरू विसावा घेत असतात, आणि झाड मात्र वरून शांतपणे पाहत असतं— कोण आलं, कोण गेलं, याच्याशी त्याला काही देणंघेणं नसतं. कारण त्याचे हात फक्त देण्यासाठीच पसरलेले असतात.

प्रत्येक झाडाचं एक वेगळं व्यक्तिमत्त्व असतं, एक वेगळी कविता असते. पिंपळाच्या पानाचा टोकदार आकार आणि वारा नसतानाही डोलण्याची त्याची सवयष्ठ असं वाटतं की पिंपळ चोवीस तास विश्वाशी गुंजन करत असतो. त्याच्या पानाच्या शिरांकडे पाहिलं की वाटतं, निसर्गाच्या हस्तरेषा जणू त्यावर उमटल्या आहेत. तर वडाचं झाड म्हणजे घरातील एखादा पांढऱ्या दाढीचा, प्रेमळ आजोबा. त्याच्या त्या जमिनीपर्यंत पोहोचलेल्या पारंब्या म्हणजे काळाच्या पाऊलखुणा आहेत. ज्या प्रत्येक क्षणी तुम्हाला आधार देतात. मागे एका कवितेत मी लिहिलं होतं,

सुरकुत्याच सुरकुत्या जाळीदार
पानाला
पारंब्यांचा आधार होतो वटवृक्षाला
भिरभिरतेय माथ्यावर उन्हाची घार
अंगा-अंगाची काहिली सृष्टी
बेजार
अशा वेळी होते मग झाडाची छत्री
उन्हाला कातरते फांद्यांची कात्री...

कित्येक पिढ्या या वटवृक्षानं खेळताना, हसताना, रडताना पाहिल्या आहेत.

तो भूतकाळ आणि भविष्यकाळाला जोडणारा एक जिवंत पूल आहे. आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात एक तरी असं झाड असतं, जे आपल्या बालपणीचा साक्षीदार असतं. कोणाच्या अंगणात शेवग्याचं झाड असतं, कोणाच्या पाठीमागचं पेरूचं झाड, तर कोणाच्या शाळेच्या मैदानातला तो अवाढव्य वडाचा पारंब्यांचा गोतावळा. मला आठवतो माझ्या आजोळच्या घरासमोरील तो जुना, डेरेदार आंबा. उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागल्या की आमचं हक्काचं घर म्हणजे तो आंबा असायचा. त्याच्या खांद्यावर (फांदीवर) पाय देऊन वर चढणं, एखादी कच्ची कैरी पाडून, ती शर्टालाच पुसून दातानं कुरतडण्यात जी मजा होती, ती आजच्या कोणत्याही महागड्या मॉलमध्ये नाही. झाडावर चढताना हाताला लागणारा त्याचा खडबडीत पापुद्रा, त्यातून निघणारा तो चिकाचा उग्र पण हवाहवासा वाटणारा सुवासष्ठ हे सगळं माझ्या मनात कुठेतरी खोलवर रुजलंय. त्या काळी झाडंच आपले खेळगडी होते. वडाच्या पारंब्यांना धरून झोके घेताना आपण हवेत झेपावायचो, तेव्हा तो वडाचा म्हातारा आजोबा आपल्याकडे पाहून पानांच्या टाळ्या वाजवून हसायचा. झाड आपल्याशी बोलायचं. वारा आला की त्याची होणारी सळसळ म्हणजे जणू काही बासरी वाजवत ते आपल्यालाच साद घालत असायचं.

झाडाचं आयुष्य हे परोपकाराची परिसीमा असतं. जिवंत असताना ते फुलं, फळं, सावली आणि श्वास देतंच; पण जेव्हा त्याचं आयुष्य संपतं, तेव्हाही ते आपली साथ सोडत नाही. वाळलेलं झाड कुणाच्या तरी घरात चूल पेटवून भूक भागवतं, कुणाच्या तरी घराची चौकट होऊन त्या घराचं रक्षण करतं, तर कधी एखाद्या कलावंताच्या हातात जाऊन एका सुंदर मूर्तीचं रूप घेतं. अगदी शेवटी, माणसाच्या अंतिम यात्रेतही लाकूडच माणसाला आपल्या कवेत घेऊन पंचतत्त्वात विलीन करतं. जन्मल्यापासून ते मृत्यूपर्यंत, माणसाच्या आयुष्याची प्रत्येक ओळ झाडाच्या लाकडानंच लिहिलेली असते. आपण सिमेंट-कॉंक्रीटची घरं बांधतो, त्यावर हक्क सांगतो.